असतो मा सद्गमय।

सत्यनिकेतन संचालित

**ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख**
**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**
राजूर, ता. अकोले, जि. अहमदनगर

वार्षिक नियतकालिक

# रतनगड

सन २०१९-२०



स्थापना : १९९३

नॅक मानांकन : 'अ'

# ादिवासी भागातील शिक्षणाचा आधारवड

) रा. वि. पाटणकर, (कै.) बापूसाहेब शेंडे, (कै.)
ीबाई मदन या ध्येयवादी जीवनव्रतींची प्रेरणा व
र्शनातून राजूर येथे सत्यनिकेतन संस्थेचे काम उभे
. अकोले तालुक्याच्या दुर्गम आदिवासी भागात
णक सुविधा निर्माण करून परिसराचा शैक्षणिक
स करण्याच्या उद्देशाने सत्यनिकेतन संस्थेची
ना पाटणकर व शेंडे यांनी केली. आदिवासी माणूस
ावा व गावातच काम करत राहावा, या भूमिकेतून
निकेतन संस्थेने आदिवासी भागात ठिकठिकाणी
ा सुरू केल्या. शिक्षणापासून पिढ्यान् पिढ्या वंचित
लेल्या तालुक्यातील आदिवासी भागात शिक्षणाची
मेढ रोवण्याचे, शिक्षणप्रसाराचे काम सत्यनिकेतन

**» माझी संस्था**


ॲड. एम. एन. देशमुख


टी. एन. कानवडे

ाध्यमिक विद्यालय, तसेच कातळापूर येथे (कै.) नानासाहेब विठोबा देशमुख सर्वोदय विद्यामंदिर या शाळा सुरू केल्या. या विद्यालयांत आज तीन हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत



## ॅड. देशमुख पर्यावरण त्र पुरस्कार सन्मानित

लोकवेध 31-8-2018

र । मुंबई येथील पर्यावरण वैद्यकीय संघटना
्या वतीने देण्यात येणारा अतिवैशिष्ट पर्यावरण



मित्र पुरस्कार सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख यांना प्रदान करण्यात आला. मुंबई येथे पार पडलेल्या २४ व्या नेसकॉन २०१८ मध्ये सत्यनिकेतन संस्थेचे
ध्यक्ष ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख यांना
ामाजिक न्याय आणि सार्वजनिक व शैक्षणिक
त्रातील विशेष योगदानाबद्दल देण्यात आला. जे.
. हॉस्पिटल मुंबई येथील संचालक डॉ. के. सी.
हन यांच्या अध्यक्षतेखाली इंटरनॅशनल हॉटेल
बई येथे नुकताच संपन्न झाला. यावेळी मुंबईतील
मवंत डॉक्टर्स व सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील
क्ती उपस्थित होते. देशमुख यांना मिळालेल्या
रस्काराबद्दल सत्यनिकेतन संस्थेचे सचिव माजी
ाचार्य टी. एन. कानवडे, [illegible]
[illegible] तसेच सर्व सदस्य, [illegible]
[illegible] यांचे अभिनंद[illegible]

## ेशमुख विद्यालयात चंदनाच्या रोपांचे वाटप



दै युवावार्ता 07-9-2018

तिनिधी) [illegible]
थिल ॲड. एम. एन. देशमुख
ात मंगळवार दिनांक ४/९/२०१८
चंदन वृक्ष रोपे वाटप कार्यक्रम
करण्यात आला होता. विद्यार्थी
[illegible]
आला.

या वेळी पुणे येथील हरीत मित्र परिवार चे अध्यक्ष व सां. फु. पुणे विद्यापिठाचे पर्यावरण सदस्य डॉ महेंद्र घागरे यांनी हे १०००० चंदन रोपे मोफत दिले. डॉ महेंद्र घागरे हे स्वखर्चाने हजारो कि. मी. चा प्रवास करून चंदन लागवडी बाबत प्रचार प्रसार व मार्गदर्शन करतात. आजपर्यंत त्यांनी लाखो चंदन रोपांचे मोफत वाटप केले आहे. या त्यांच्या कार्याबद्दल तयांना अनेक शासकीय व खाजगी पुरस्कार मिळाले आहेत. चंदनाचे महत्त्व व किंमत आणि चंदन लागवड कशी करावी या विषयी मार्गदर्शन करतात. हवामानातील बदल अतिवृषटी दुष्काळ या सारख्या समस्यांचा सामना करण्यासाठी चंदन शेती शेतकरयाना उत्पन्न मिळवून देंणारी आहे. या चंदन लागवड शेतीतुन उत्पन्न तर वाढेलच परंतु [illegible]

## ा.वि.पाटणकर यांची पुण्यतिथी साजरी

पुण्यनगरी, 14-11-2018

पुण्यनगरी वृत्तसंस्था/राजूर
सत्यनिकेतन संस्थेचे संस्थापक सेक्रेटरी
गांधीवादी कार्यकर्ते कै.रा.वि.पाटणकर
१४ वी पुण्यतिथी सोमवार दि.१२ नोव्हेंबर
८ रोजी सकाळी ९ वाजता सत्यनिकेतन
त दीपप्रज्वलन करून साजरी करण्यात
. पाटणकर यांचे मूळ जन्मगाव अरवली,
ागिरी हे होते. त्यांचे शिक्षण,एम.ए,बी.
णे) विद्यापिठामध्ये पूर्ण झाले.
ा कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहुणे
लाभलेले संगमनेर येथील शांताराम
अकोले येथील विठ्ठलराव शेवाळे,
सचिव टी.एन कानवडे, सहसचिव
उमराणी, महाविद्यालयाचे प्राचार्य
.एन.देशमुख, एस.टी.येलमामे, प्राचार्य
ोहर लेंडे, उपप्राचार्य डॉ.लहानू परबत,
र, उन्नती सेवा मंडळाचे भवारी,
ा गुजराथी जे.डी.आरोटे,एच.एम.
डे,राऊत, बेल्हेकर, घुमाळ, राष्ट्र सेवा
या कार्यकर्त्या टिभे, सामाजिक कार्यकर्ते
[illegible]



राजुर-गांधीवादी रा.वि.पाटणकर यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करताना प्रा.बाबासाहेब देशमुख, सचिव कानवडे, मिलिंद उमराणी. (छाया-विनायक घाटकर)

आदींसह शिक्षक,शिक्षकेतर, कर्मचारी वर्ग [illegible]

सावंत व आभार प्रदर्शन मिलिंद उमराणी [illegible]

## संस्कृती हंगेकरची विभागीय स्पर्धेसाठी निव



प्रति,

मा. ...............................................

......................

सत्यनिकेतन संचलित ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे एक हक्काचे व्यासपीठ म्हणजे 'रतनगड' नियतकालिक. या नियतकालिकेच्या माध्यमातून राजूर व येथील चाळीसगांव डांगाण परिसरातील आदिवासी भागाची, येथील विविधरंगी संस्कृती व लोकपरंपरेची ओळख करून देण्याचा प्रयत्न आम्ही नेहमी करत आहोत.

अतिशय तीव्र गतीने परिवर्तित होणारी लोकसंस्कृती, परंपरा व जनमानस यांच्या अंतर्मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न या नियतकालिकेच्या माध्यमातून केला आहे.

'रतनगड' या वार्षिकाचा अंक आपणांस सादर करीत आहोत. वाचून आपला अभिप्राय नक्की कळवा. आपल्या अभिप्रायाच्या प्रतिक्षेत ....

स्नेहांकित,

प्रा. डॉ. भरत शेणकर
संपादक

डॉ. बाबासाहेब देशमुख
प्राचार्य

'असतो मा सद्गमय।'

'सत्यनिकेतन' संचलित

# ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर

ता. अकोले, जि.अहमदनगर - ४२२६०४
दूरध्वनी (०२४२४) ५११०८० (कार्यालय ) ०२४२४ ) २५१५८९ (निवास)
फॅक्स : (०२४२४) ५११०८०, २५१५८९
*Email : mndcollegerajur@gmail.com* Website : www.mndcollegerajur.org

वार्षिक नियतकालिक

# रतनगड

सन २०१९-२०

: प्रकाशक :
प्राचार्य डॉ. बाबासाहेब देशमुख

: संपादक :
प्रा. डॉ. भरत शेणकर

: सहसंपादक :
प्रा. डॉ. द.के. गंधारे

वार्षिक नियतकालिक

# रतनगड

सन २०१९-२०

## संपादक मंडळ

प्रकाशक

**प्राचार्य डॉ. बाबासाहेब देशमुख**

ॲड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर

●●●

संपादक

**प्रा. डॉ. भरत शेणकर**

●●●

सहसंपादक

**प्रा. डॉ. दत्तात्रय गंधारे**

●●●

संपादक मंडळ सदस्य

**प्रा. अरूण सातपुते**

**प्रा. बबन थोरात**

**श्री. उत्तम पवार**

●●●

कार्यालयीन व्यवस्थापक

**श्री.रविंद्र देशमुख**

●●●

संगणकीय अक्षररचना

**श्री. मिलिंद उमराणी**

●●●

कव्हर व रंगीत पेजेस डिझाइनींग

**श्री. मिलिंद उमराणी**

●●●

छायाचित्रण व मुखपृष्ठ

**श्री. विलास तुपे**

●●●

मुद्रक

**श्री. मिलिंद उमराणी**

समर्थ प्रिंटर्स, राजूर

भ्रमणध्वनी : ९४२३४६४६२७

वार्षिक नियतकालिक

# रतनगड

## सन २०१९-२०

दी प्रेस ॲन्ड रजिस्ट्रेशन बुक ॲक्ट
नियम २ फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती
(वार्षिक नियतकालिक)

| | |
|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : सत्यनिकेतन संचलित<br>ॲड मनोहरराव नानासाहेब देशमुख<br>कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर<br>ता. अकोले, जि.अहमनगर |
| **प्रकाशन काळ** | : वार्षिक |
| **प्रकाशक** | : मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब देशमुख |
| **पत्ता** | : ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख<br>कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर<br>ता. अकोले, जि. अहमदनगर |
| **संपादकाचे नाव** | : प्रा. डॉ. भरत शेणकर |
| **राष्ट्रीयत्व** | : भारतीय |
| **मालकी** | : ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख<br>कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर<br>ता. अकोले, जि. अहमदनगर |

मी प्राचार्य डॉ. बाबासाहेब देशमुख जाहीर करतो की,
वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्राचार्य डॉ. बाबासाहेब देशमुख**

प्रकाशक

या अंकात पसिध्द करण्यात आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

हा अंक फक्त खाजगी वितरणासाठी आहे.

प्रती : १०००

# भावपूर्ण श्रध्दांजली!

या शैक्षणिक वर्षात संस्थेतील
कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी,
हितचिंतक, तसेच भारतातील शैक्षणिक,
सामाजिक, राजकीय, सहकार, कला,
क्रीडा, साहित्य, विज्ञान इ. क्षेत्रातील
महाविद्यालयाशी संबंधित ज्ञात, अज्ञात
व्यक्ती तसेच देशासाठी लढणारे वीर
जवान तसेच मृत्यूमुखी पडलेले निरपराध
नागरिक या सर्वांना महाविद्यालयाचे
प्राचार्य, प्राध्यपक वर्ग, शिक्षकेतर
कर्मचारी व विद्यार्थी यांची
विनम्र श्रध्दांजली .... !!!



वार्षिक नियतकालिक

# रतनगड

सन २०१९-२०

अंतरंग

१) संपादकीय

२) प्राचार्यांचे मनोगत

३) सत्यनिकेतन कार्यकारी मंडळ, विश्वस्त

४) महाविद्यालय विकास समिती

५) मान्यवरांचे अभिप्राय

६) मराठी विभाग

७) हिंदी विभाग

८) इंग्रजी विभाग

९) वार्षिक अहवाल

१०) वैयक्तिक अहवाल : प्राध्यपक व शिक्षकेतर कर्मचारी

११) मान्यवरांनी महाविद्यालयास दिलेल्या भेटी

१२) विद्यार्थी मंडळ यादी

१३) परितोषिकांचे मानकरी

१४) विद्यापीठ गीत

१५) पसायदान



## संपादकीय ...

रसिक वाचक हो,

महाविद्यालयाचा रतनगड या नियतकालिकाचा २४ वा अंक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. सत्यनिकेतन ही सेवाभावी संस्था राजूर सारख्या आदिवासी व अतिदुर्गम भागात शिक्षण प्रचार व प्रसाराचे महत्वपूर्ण काम करत आहे. शिक्षणाबरोबर आदिवासी समाजाच्या उन्नती–साठी सत्यनिकेतन संस्थेचे योगदान खूप मोलाचे आहे. समाजाचा सर्वांगिण विकासासाठी सर्व प्रकारचे शिक्षण महत्वाचे आहे. याच उदात्त हेतूने सत्यनिकेतन संस्थेचे उच्च शिक्षणाच्या दृष्टीने या आदिवासी व अतिदुर्गम भागात महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. महाविद्यालयाच्या सुरुवातीच्या काळात स्व.रा.वि.पाटणकर, स्व.बापूसाहेब शेंडे व स्व.सावित्रीबाई मदन यानी केलेले मार्गदर्शन व योगदान न विसरण्यासारखे आहे. या त्रयींच्या आशीर्वादाने आज महाविद्यालयाचे एका विशाल वृक्षात रुपांतर झाले आहे. सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष मा.ॲड मनोहरराव नानासाहेब देशमुख साहेब यांचे योगदान व मार्गदर्शन सतत होत असल्याने महाविद्यालयाची यशस्वी घोडदौड होत आहे.

संस्थेचे सचिव मा.टी.एन.कानवडे व सहसचिव मा. मिलिंद उमराणी यांच्या कल्पकतेचा व अनुभवाचा फायदा निश्चितच महाविद्यालय प्रशासनाला होत आहे. दिवसेंदिवस महाविद्यालयाची होत असलेली प्रगती, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा वाढता आलेख सुखावणारा आहे. सत्यनिकेतन संस्थेचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाच्या विकासात्मक व रचनात्मक कार्यासाठी योगदान देत आहेत.

'सहितस्य भाव: साहित्यम।' या संस्कृत उक्ती च्या अनुषंगाने ज्यामध्ये सर्व समाजाचे हित सामावले असते ते साहित्य असते. समाजाच्या जडणघडणीचे प्रतिबिंब साहित्यातून व्यक्त होत असते. साहित्य हे समाज

मनाचा कानोसा घेत समाज परिवर्तनाचे कार्य अखंड करत असते तसेच समाजाला दिशा देण्याचे कार्यसुध्दा करत असते. याच जाणिवेतून महाविद्यालयाच्या सुरूवाती पासून विद्यार्थ्यांच्या साहित्यिक प्रतिभेला वाव देण्यासाठी रतनगड हे वार्षिक नियतकालिक प्रकाशित होत असते. आजच्या काळात विद्यार्थी साहित्यापासून दूर जातांना दिसत आहे. विद्यार्थ्यांमध्ये साहित्याभिरूची निर्माण व्हावी या उदात्त हेतुने महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना रतनगड चे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. या नियतकालिकाच्या माध्यमातून विद्यार्थी लेखकांनी आपल्या स्वलिखित साहित्यातून समाज मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. याचे प्रत्यंतर आपणास निश्चितच येईल.

रतनगड या वार्षिक नियतकालिकासाठी संपादक मंडळ, सत्यनिकेतन संस्थेचे सर्व पदाधिकारी, अध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वांनी आपापल्या परीने सहकार्य केले या सर्वांचा संपादक या नात्याने मी आभारी आहे.

धन्यवाद !

**प्रा. डॉ. भरत शेणकर**

संपादक, रतनगड





## प्राचार्यांचे मनोगत ...

प्रिय वाचक मित्र हो,

शैक्षणिक वर्ष २०१८ – १९ या रतनगड नियतकालिकाचा अंक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. राजूर सारख्या आदिवासी व अतिदुर्गम भागात आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द असलेली, सत्य निकेतन संस्था व या संस्थेच्या माध्यमातून येथील विद्यार्थ्यांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य महाविद्यालय आहोरात्र करत आहे. येथील युवक सुसंस्कृत व सर्जनशील बनावा या उद्देशाने महाविद्यालयाची नेहमी धडपड असते. मुळात येथील विद्यार्थी हा प्रामाणिक व कष्टाळू असल्याने त्याला त्याच्या जीवनाची दिशा निश्चितच प्राप्त होत आहे. या विद्यार्थ्यांच्या उज्वल यशासाठी महाविद्यालयात सतत नामवंत व्याख्यात्यांची व्याख्याने व प्रशिक्षणे आयोजित करण्यात येतात.

महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने स्थापन झालेली सत्यनिकेतन संस्था गांधीजीच्या सत्य, अहिंसा, स्वावलंबन, आत्मनिर्भरता या तत्वांच्या आधारे आपले शैक्षणिक व सामाजिक कार्य करत आहे. संस्था अनेक उपक्रमांच्या माध्यमातून येथील आदिवासी व गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे काम विगत सत्तर वर्षापासून करत आहे. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा. ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख साहेब यांच्या आर्थिक योगदानामुळे महाविद्यालयाची भौतिक प्रगती होत आहे. संस्थेचे सचिव मा. टी.एन.कानवडे व सहसचिव मा. मिलिंदजी उमराणी यांचे मार्गदर्शन महाविद्यालयाला वेगळी उंची प्राप्त करून देत आहे. सत्यनिकेतन संस्थेचे सर्व पदाधिकारी यांची साथसुध्दा तितकीच मोलाची आहे.

विगत चोवीस वर्षापासून महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज त्यांच्या पायावर उभे राहिलेले दिवस आहेत हे महाविद्यालयाचे यश आहे असे मला वाटते. महाविद्यालयाला नॅकने प्रदान केलेला 'अ' दर्जा ही आमच्यासाठी महत्वाची व भूषणावह बाब आहे. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध मंडळे कार्यरत आहेत. गरीब व होतकरू विद्यार्थ्यासाठी 'कमवा व शिका योजना' कार्यरत असून अनेक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ होत आहे.

नियमित शिष्यवृत्तीबरोबरच महाविद्यालयाच्या प्रयत्नांतून हुशार विद्यार्थ्यांना 'हिंदुस्थान पेट्रोलियम' तर्फे विशेष शिष्यवृत्ती मिळाली आहे. विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम व राष्ट्रसेवेचा मंत्र मिळावा यासाठी रा.से.यो. व राष्ट्रीय छात्र सेनेचे युनिट महाविद्यालयात कार्यरत आहे.

चार भिंतींच्या बाहेरचे जग विद्यार्थ्यांना कळावे या उद्देशाने महाविद्यालयात विविध विभागामार्फत चर्चासत्रांचे व परिषदांचे आयोजन केले जाते. जीवन गतिमान आहे, या गतिमान जीवनात आपला विद्यार्थी कोठेही कमी पडू नये यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक नेहमीच प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौध्दिक विकासासाठी तसेच यांच्यात साहित्याभिरूची निर्माण व्हावी या साठी 'रतनगड' या नियतकालिकेचे व्यासपीठ महाविद्यालयाने उपलब्ध करून दिले आहे. विद्यार्थी लेखक आपले विचार व जाणिवा यातून मांडत असतात. आपल्याला हे विचार निश्चित भावतील, अशी आशा मी बाळगतो या अंकासाठी संपादक मंडळ, सहकारी प्राध्यापक व ज्ञात अज्ञात अशा सर्वांनी जे सहकार्य केले त्यांचा प्राचार्य या नात्याने मी आभारी आहे.

धन्यवाद!

**प्राचार्य डॉ. बाबासाहेब देशमुख**





## मुखपृष्ठाविषयी ...

अकोले तालुक्याला ऐतिहासिक, धार्मिक व पौराणिक परंपरा लाभलेली आहे. तसा हा तालुका पुरोगामी विचारांचा म्हणून ओळखला जातो. राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात येथील अनेक वीरांनी बलिदान दिले आहे. प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने पुनित झालेली ही भूमी आहे. याच भूमीत हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे काही दिवस वास्तव्यसुध्दा होते. ज्या किल्यावर छत्रपती शिवाजी महाराज १७ दिवस वास्तव्यास होते अशा पट्टाकिल्ला अर्थात विश्रामगडाचे छायचित्र या वर्षीच्या 'रतनगड' नियतकालिकासाठी आम्ही निवडले आहे. या मुखपृष्ठाविषयी थोडेसे..

विश्रामगडाचे अर्थात पट्टाकिल्ल्याचे बांधकाम बहामनी सल्तनत काळात इ.स.१३४७ मध्ये झाले. नंतर या किल्याचा ताबा येथील आदिवासी महादेव कोळी जमातीकडे गेला. त्यानंतर त्याचा ताबा निजामशाहीकडे गेला. इ.स.१६२७ मध्ये मुघलांनी हा किल्ला परत जिंकला. समुद्र–सपाटीपासून हा किल्ला ८८२ मीटर उंचीवर आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी कुर्डाई देवीचे मंदिर आहे. किल्याच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर एका वास्तूचा चौथरा दिसतो. त्याच्या समोर साधारणत: एक मीटर उंचीची हनुमान मूर्ती आहे. या मूर्तीपुढे एक निसर्ग निर्मित १०० ते १५० माणसे सहज बसू शकतील एवढी मोठी जागा आहे. किल्ल्यावर भले मोठे दोन सुळके आहेत आणि हा भला मोठा सुळका म्हणजेच गड माथा आहे. गडाला तटबंदी असून ती चांगल्या स्थितीत आहे.

इ.स. १६७१ मध्ये पट्टा किल्ला मोरो त्र्यंबक पिंगळे यांनी शिवाजी महाराजांकरिता जिंकला व हा किल्ला स्वराज्यात सामील झाला. इ.स.१६७९ मध्ये आपल्या दक्षिण मोहिमेच्या अंतिम टप्प्यात महाराजांनी जालनापूरची लूट केली. सोने–नाणे, जडजवाहिर घेऊन महाराज रायगडाकडे निघाले. दरम्यान ही खबर मुघल सरदार रमणस्तखान याला लागली दहा हजाराची मोठी फौज घेऊन तो महाराजांच्या मागावर निघाला.

संगमनेर जवळील रायतेवाडी इथे दोन्ही सैन्यांची गाठ पडली दि. १८, १९ व २० नोव्हेंबर असे तीन दिवस दोन्ही सैन्यांत तुंबळ युध्द झाले. रणमस्तखानाला औरंगाबादेहून मोठी कुमक रवाना झाल्याची खबर आली. युध्द सुरू असतानाच महाराज निवडक ५०० घोडेस्वारांसह पट्टा किल्ल्याकडे रवाना झाले. रायतेवाडी येथील आपल्या आयुष्यातील शेवटची लढाई जिंकून महाराज २१ नोव्हेंबर १६७९ या दिवशी अहमदनगर – नाशिक जिल्ह्यांच्या हद्दीवर असलेल्या अकोले तालुक्यातील पट्टा किल्ल्यावर आले. या ठिकाणी महाराज १७ दिवस मुक्कामी होते. ते विश्रांतीसाठी या किल्ल्यावर थांबले म्हणून या किल्ल्याचे नांव 'विश्रामगड' असे पडले, विश्रांती घेऊन महाराजपुढे कल्याण मार्गे रायगडावर पोहचले.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक जडणघडणीचा साक्षी हा किल्ला अकोले तालुक्याचे भूषण आहे. आज या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आलेला असून शिवसृष्टीचे निर्माण करण्यात आली आहे. शिवछत्रपतींच्या वास्तव्याने पुनित झालेल्या या किल्ल्याला भेट देणे आपणांस निश्चितच आवडेल.

**प्रा. डॉ. भरत शेणकर**

संपादक, रतनगड



## सत्यनिकेतन कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| मा. ॲड्. मनोहरराव देशमुख | - | अध्यक्ष |
| मा. श्री. विवेक मदन | - | कोषाध्यक्ष |
| मा. श्री. टी. एन. कानवडे | - | सचिव |
| मा. श्री. मिलिंद उमराणी | - | सहसचिव |

## विश्वस्त

मा. ॲड्. श्री. मनोहरराव नानासाहेब देशमुख

मा. श्री. प्रकाश सुमतीलाल शहा

मा. श्री. विवेकजी मदन

## महाविद्यालय विकास समिती

| | | |
|---|---|---|
| मा. ॲड्. मनोहरराव देशमुख | - | अध्यक्ष |
| मा. श्री. टी. एन. कानवडे | - | सदस्य |
| मा. श्री. पी. एस. शहा | - | सदस्य |
| मा. श्री. एम. एम. उमराणी | - | सदस्य |
| मा. श्री. व्ही. बी. नवले | - | सदस्य |
| मा. श्री. एम. एम. भवारी | - | सदस्य |
| मा. श्री. एस. टी. येलमामे | - | सदस्य |
| मा. श्री. एस. डी. पन्हाळे | - | सदस्य |
| मा. श्री. एस. बी. ओहरा | - | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. बी. एस. देशमुख | - | सचिव |
| प्रा. डॉ. बी. टी. शेणकर | - | शिक्षक प्रतिनिधी |
| प्रा. एस. के. थोरात | - | शिक्षक प्रतिनिधी |
| प्रा. डॉ. आर. ए. कढणे | - | शिक्षक प्रतिनिधी |
| प्रा. डॉ. डी. बी. तांबे | - | शिक्षक प्रतिनिधी |
| प्रा. डॉ. बी. के. टपळे | - | नॅक समन्वयक |
| श्री. यु. ए. पवार | - | शिक्षकेतर प्रतिनिधी |

## महाविद्यालय उच्चशिक्षण समिती

| | | |
|---|---|---|
| मा. श्री. मधुकररावजी पिचड | - | राजूर |
| मा. ॲड्. मनोहरराव देशमुख | - | मुलुंड |
| मा. आ. वैभवराव पिचड | - | राजूर (पदसिद्ध) |
| मा. श्री. अशोकराव भांगरे | - | शेंडी |
| मा. श्री. प्रकाशशेठ शहा | - | राजूर |
| मा. श्री. एम. एल. मुठे | - | नाशिक |
| मा. श्री. यमाजी लहामटे | - | राजूर |
| मा. श्री. विलास नवले | - | नवलेवाडी (अकोले) |
| मा. श्री. श्रीनिवास येलमामे | - | राजूर |
| मा. श्री. मिलिंद उमराणी | - | राजूर |
| मा. श्री. श्रीरामशेठ पन्हाळे | - | राजूर |
| मा. श्री.रमाकांत डेरे | - | राजूर |
| मा. श्री. मुरलीधर का. बारेकर | - | राजूर |
| मा. श्री. शशिकांत बाबुलाल ओहरा | - | राजूर |
| मा. श्री. एम. एम. भवारी | - | राजूर |
| मा. श्री. मधुकरराव नवले | - | नवलेवाडी (अकोले) |
| मा. श्री. राजेंद्रप्रसाद सोमाणी | - | संगमनेर |
| मा. श्री. भाऊसाहेब मंडलिक | - | अकोले |
| मा. प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र. राजूर | - | राजूर (पदसिद्ध) |
| मा. जि. प. सदस्य (राजूर गट) | - | शेंडी (पदसिद्ध) |
| मा. सरपंच, ग्रामपंचायत (राजूर) | - | राजूर (पदसिद्ध) |

## - मान्यवरांचे अभिप्राय -

The college has been progressive and academically vibrant. It nurtures unique social outlook. It highly deserves 'A' grade by naac. The conference organized is on relevant topic & has been organized with utmost care.

(P.B. Vidyasagar)
18/1/19

your colleage is very Bealtiful & many important Things are seen in our College. and I hope this will be Continue with your College.

On the occasion of National conference I had been here in the college, Really the college is organizing very good activities and the infrastructure & other facilities are very nice. Appreciable. I congrats the Principal & Institute

19/1.

Remarks

अकोले तालुक्यात आदिवासी लोकसंख्या बहुल क्षेत्रात ॲड एम. एन. देशमुख महाविद्यालय हा निश्चितपणे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरत आहे. शिक्षणच नव्हे तर शिक्षण-व्यतिरिक्त क्षेत्रातही सदर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिली आहे ज्याने त्यांच्या एक पूर्ण व्यक्तिमत्व २ विकसित होत आहे. सदर कॉलेजला पुढच्या वाटचालीकरिता माझी शुभेच्छा.

15/06/2018

| | |
|---|---|
| 15/06/2018 | Rahul Dwivedi, Collector Ahmednagar |

It is very much. beutiful event, Nice coordination. very, very. great event for Researches and studets. campus is very clean and neatful. wish you all. the best. for such wonderful event.

19.1.19.

## - मान्यवरांचे अभिप्राय -

It is very much. beutiful event. Nice coordination. very. very. great event for Researches and studets. campus is very clean and neatful. wish you all. the best. for such. wonderful event.

Shinde
19.1.19.

Prof. Dr. B. M. Gaykar
Dept. of Botany
Ahmednagar College, Ahmednagar
BOS Chairman, Botany

### Remarks

उच्च माध्यमिक विभागाच्या या वर्षीच्या 12 वीच्या निकाल 76% लागल्याबद्दल प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन!

03/06/2018
दहिफळे बी.के.
वि. सचिव SSC board
Pune.

It is a great feeling to the place where one's career started and I am proud that I was a student of this college. The College has evolved from nothing to the great institution/academic institute with great infrastructure, facilities. I wish all the best to students of this college for their future endeavours & also faculties for their sincere and great efforts towards produce students with high moral, ethics & knowledge. Thank you & lot of love to College!!

An excellent college in an interior region of Maharashtra. Principal has taken great care and pain in developing infrastructure and nature around the campus. Great achievements are to the credit of college. I wish him and the college everybest.

# आदिवासी सेवक



**मा. ॲड्. मनोहररावजी देशमुख साहेब**

अध्यक्ष, सत्यनिकेतन

# आमचे भूषण



मा. डॉ. नितीन करमाळकर

कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

# आमचे मार्गदर्शक



**मा. विवेकजी मदन**

कोषाध्यक्ष तथा विश्वस्त, सत्यनिकेतन



**मा. प्रकाशशेठ शहा**

अध्यक्ष, उच्चशिक्षण समिती तथा विश्वस्त, सत्यनिकेतन

# सत्यनिकेतन पदाधिकारी





मा. ॲड्. श्री. मनोहरराव देशमुख
अध्यक्ष, सत्यनिकेतन





मा. श्री. टी. एन. कानवडे
सचिव, सत्यनिकेतन



मा. श्री. विवेकजी मदन
कोषाध्यक्ष, सत्यनिकेतन



मा. श्री. मिलिंद उमराणी
सहसचिव, सत्यनिकेतन



मा. श्री. प्रकाशशेठ शहा
विश्वस्त, सत्यनिकेतन

# आमचे मार्गदर्शक





**मा. टी. एन. कानवडे**
सचिव, सत्यनिकेतन





**मा. मिलिंद उमराणी**
सहसचिव, सत्यनिकेतन

# महाविद्यालय विकास समिती



मा.ॲड्.श्री.मनोहरराव देशमुख
अध्यक्ष, सत्यनिकेतन



मा.श्री.टी.एन. कानवडे
सचिव, सत्यनिकेतन



मा.श्री.विवेकजी मदन
कोषाध्यक्ष, सत्यनिकेतन



मा.श्री.मिलिंद उमराणी
सहसचिव, सत्यनिकेतन



मा.श्री.प्रकाशशेठ शहा
विश्वस्त, सत्यनिकेतन



मा.श्री.शशिकांतशेठ ओहरा



मा.श्री.एम.एम. भवारी



मा.श्री.श्रीरामशेठ पन्हाळे



मा.श्री.श्रीनिवास येलमामे



मा.श्री.विलास नवले



प्राचार्य डॉ. बी. एस. देशमुख



मा. डॉ. सौ. आर. ए. कढणे



मा. डॉ. बी. टी. शेणकर



प्रा. एस. के. थोरात



प्रा. डॉ. सौ. डी. वी. तांबे



प्रा. डॉ. बी. के. टपळे



श्री. यु. ए. पवार

# महाविद्यालयाचे प्राचार्य




## प्राचार्य डॉ. बी. एस. देशमुख

एम.एस्सी., एम.फिल., पीएच. डी.



प्राचार्य डॉ.बी.एस. देशमुख
प्रकाशक



प्रा.डॉ.बी.टी. शेणकर
संपादक



प्रा.डॉ.द.के. गंधारे
सहसंपादक



प्रा.ए.डी. सातपुते
सदस्य



प्रा.बी.के. थोरात
सदस्य



श्री.यु. ए. पवार
सदस्य

## रतनगड संपादक मंडळ

## Vision Statment

असतो मा सद्गमय "Asto ma sadagamaya"

It means from ignorance. lead me to truth.

## ♥ Vision ♥

To uplift downtrodden, backward, tribal, rural and weaker section of Rajur region and to motivat, bring out change in the social, educational and economic status and inspire them to uplift their intellectual, moral, scientific and educational level.

## ♥ Objectives of the Institution ♥

- To implement the academic curriculum as per the Savitribai Phule University, Pune.
- To make availabel opportunities for tribal and rural students to accquire their goal.
- Nurturing emerging disciplines in responseto rapidly changing the world.
- Impart higher education curriculum to trabal and rural students in the Rajur town and nearby rural tribal villages.

## ♥ Mission ♥

- To provide an open acces to learning, irrespective of cast, relligion and colour to the tribal and rural community.
- To empower the illiterate, ignorant, uneducated masses by educating them and by creating in them the social, political, cultural and scientific awareness.
- To devlop leadrship qualities and democratic values among students and thus effect their holistic development.
- To focus on the all round development of all students; spiritual, moral, intellectual, social, educational, emotional and physical.
- To make them think that knowlege is power and help them in creating their future.
- To be a centre of excellence in teaching, reserarch and extension activities.

# मराठी विभाग

## गद्य

### अनुक्रमणिका


| लेख | लेखक | पान नं. |
|---|---|---|
| १. आई | अविनाश गायकवाड | १८ |
| २. हुंडाबळी | देवानंद कुलकर्णी | १९ |
| ३. रमाकांत आचरेकर | देवानंद कुलकर्णी | २० |
| ४. मिठाचा सत्याग्रह | अमित सुरेश फटांगरे | २२ |
| ५. प्रातिनिधीक शासनाच्या प्रगल्भतेसाठी जॉन स्टुअर्ड मिल यांचे विचार | कु. अश्विनी सीताराम बांडे | २३ |
| ६. समाजजीवनाचे सहसंबंध व पर्यावरण | गिरीश बाळू मेंगाळ | २७ |
| ७. ॲथेन्सची लोकशाही आणि सॉक्रेटिस | कु. पुष्पा इंद्रभान धिंदळे | ३० |
| ८. माझी पंढरीची वारी | धनंजय रमेश मोहिते | |
| ९. अकोले तालुक्यातील पर्यटनस्थळे | सतीश अनिल जगदाळे | ३२ |
| १०. शेतकरी आत्महत्यांची कारणे व उपाययोजना | कु. वैष्णवी रावसाहेब वाकचौरे | ३५ |
| | | ३६ |
| ११. पालक व पाल्य यांतील दुरावत चाललेला संवाद | कु. वैष्णवी रावसाहेब वाकचौरे | ३९ |
| १२. वनसंरक्षण काळाची गरज | आदेश जनार्धन कर्पे | ४० |

# आई

**अविनाश गायकवाड**
द्वितीय वर्ष कला



'हाडाचा केला पेन, रक्ताची केली शाई त्यातून एकच शब्द निघे आई !'

जीवनातील सर्व पदव्यांनी गुच्छ होऊन स्वागताला जावे, इतकी आई ही पदवी सर्वश्रेष्ठ आहे असे म्हटले जाते, आई म्हणजे वात्सल्याचा अविरत वाहणारा झराच साऱ्या दैवतात आई हे दैवत थोर आहे प्रत्येक व्यक्तीच्या ह्रदयाच्या मखमली पेटीत 'आई' ही दोन अक्षरे कोरलेली असतात. आईचे प्रेम तिच्या हळूवार स्मृती आपण सर्वजणच जपत असतो. बालपणी मुलांना मायेचा पदर, पाठीवर जीर्ण हात फिरवणारी आई..

जीवनातील आई हा पहिला गुरू असतो. जसं साने गुरूजी नेहमी म्हणतात,'आई माझा गुरू! आई माझा कल्पतरू !' आई म्हणजे ममतेच्या महन्मंगल नदीवर गजबलेल पवित्र तीर्थक्षेत्र आहे असे म्हणतात. ते योग्य आहे ना ! आई आपल्या मुलांसाठी काय करत नाही? अक्षरश: स्वत: तप्त उन्हाचे चटके सहन करते पण मुलांसाठी मात्र मायेची सावली देते. आपली मुले चांगली व्हावीत म्हणून ती त्यांच्यावर शिक्षणाचे, सद्गुणांचे चांगले संस्कार करते. त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपते. डोळ्यात तेल घालून त्यांच्या प्रकृतीची काळजी घेते. स्वत:ची हौसमौज बाजूला ठेवून ती आपल्या मुलांचे हट्ट पूर्ण करत असते. मुलांचे काही चुकले तर ती रागवते, वेळप्रसंगी कठोरही बनते. परंतु आईच्या रागामागे वात्सल्याचा सागरच दडलेला असतो.

आपल्या मुलांनी चांगले शिकावे, मोठे व्हावे एवढीच तिची माफक अपेक्षा असते. त्यामुळे एका क्षणी मुलांना रागवणारी,मारणारी आई व त्याच क्षणी त्यांना प्रेमाने जवळ करणारी अशी ही माझी प्रेमळ आई. म्हणूनच थोर कवी मोरोपंत म्हणतात, 'प्रसादपद झाकती परि परा गुरूंचे थिटे म्हणूनी म्हणती भले न ऋण जन्मदेचे फिटे!' आईच्या प्रेमाची तुलना कशाशीही करता येणार नाही, तिचे प्रेम म्हणजे शुध्द गंगेचे उदक! त्यात कोणताही स्वार्थ नसतो. आपल्या बाळासाठी स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता अवघड, बिकट रायगड उतरणारी हिरकणी काय? व आपल्या २ ते ३ महिन्याच्या मुलाला पाठिशी घेऊन इंग्रजांविरूध्द कडवी झुंज देणारी झाशीची राणी काय, त्यांची तुलना तुम्ही कशाशी करणार?

आईचे मन म्हणजे ब्रह्मांडातील सगळ्या प्रेमाचे आगर! सात जन्म घेतले तरीही आईचे अनंत उपकार आपण फेडू शकत नाही. म्हणूनच आईची महती आपण सर्वांनी ओळखली पाहिजे. जसं आचार्य अत्रे म्हणतात, "आई असेपर्यंत आपल्याला तिची किंमत ओळखता येत नाही आणि ती गेली की जगात कशाचीही किंमत वाटत नाही !" खरंच आपल्याला मोठेपणी मानवरातव पैसा-अडका,प्रतिष्ठा अशा सर्व सुखसोयी मिळाल्या आणि हे सर्व यश बघण्यासाठी जर आपली प्रेमळ आई नसेल तर, विचार करा काय किंमत असेल या सर्व मोठेपणाला. काय अवस्था असेल त्या व्यक्तिची ? किंमत तर शून्य असेल ना! त्या सगळ्या सुखसोयी आपल्याला काट्याप्रमाणे आयुष्यभर बोचत राहतील.

'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी!' अशीच आपली दुर्दैवी अवस्था होईल ना! 'प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई, बोलाऊ तुज आता मी कोणत्या उपायी', अशी मनाची तडफड होईल. म्हणूनच आपल्यासाठी चंदनाप्रमाणे झिजणाऱ्या आईचे मन दुखऊ नका. मातापित्यांची अहोरात्र सेवा करणारा भक्त पुंडलिक आणि श्रावणबाळ यांच्या गोष्टी तर सर्वश्रुतच आहेत. अशा थोर पुरूषांना देखील माझा कोटी कोटी प्रणाम. म्हणतात ना, आईसारखे दैवत साऱ्या जगात नाही ही पद्यपंक्ती अगदी सार्थ आहे. असे दैवत आपल्या सानिध्यात राहून मार्गदर्शन करत असेल तर चिंता कशाला!

माझी आई शिक्षिका आहे, तिने उच्चशिक्षण घेतले आहे, पण शिक्षकी पेशा स्वीकारायचा हेच तिचे स्वप्न होते. आणि तिने ते आज सर्वार्थाने पूर्ण केले आहे. त्यामुळे ती शिस्तप्रिय आहे. सगळ्या गोष्टी वेळेत व नीटनेटक्याच व्हाव्यात असा तिचा आग्रह असतो. पण तिला हे शब्दातून चुकूनही सांगावे लागत नाही. ती कृतीतूनच बोलत असते. शिक्षिका असल्याने ती माझ्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देते. शिवाय ती मला सोपे पदार्थ कसे करावेत हे शिकवणारी अशी माझी प्रेमळ आई छान गप्पा मारते. बारीकसारीक बाबींचे महत्व तिच्या सहवासात मी कधी आत्मसात केले हे कळलेच नाही. आई म्हणजे होम मिनिस्टर आहे. एकाच वेळी अनेक आघाड्या सांभाळणारी आई माझी गुरू आहे असे म्हणेपर्यंत ती क्षणात आजची नर्स झालेली असते. पाहुण्यांशी गप्पा मारत-मारत स्वयंपाक करत असते. इतकी सारी कामे गोंधळ न करता कशी करते ते तिलाच ठाऊक ! बाबा तर नेहमी म्हणतात. ती आहे म्हणूनच मी निर्धास्त राहू शकतो. एवढ्या साऱ्या आघाड्या सांभाळूनही तिचे विद्यार्थीपण सतत जागृत असते. नव्या तंत्रज्ञानाशी तिने खूप छान जमवून घेतले आहे. ती इंटरनेटवरून सतत माहिती मिळवत असते व मुलांपर्यंत पोहचवित असते. शैक्षणिक परिषदांमधे तिचा नेहमी सहभाग असतो. तिचे अनेक लेखही मासिकामधून येत असतात. खऱ्या अर्थाने ती झाशीची राणी, हिरकणी आहे. साधी वेशभूषा पण मराठी संस्कृतीतील माझी आई शांतपणे, ठामपणे एखाद्याला एखादा मुद्दा पटवून कसा द्यावा हे आईकडूनच व बाबांकडूनच शिकावे. अडचणीत सापडलेल्या प्रत्येकाला तिचा सल्ला हवा असतो. ती अत्यंत निरपेक्षपणे सल्ला देते. त्यामुळे मुलांच्या समस्यांबाबत भेटायला येणाऱ्या पालकांच्या मनात तिच्याबद्दल अतिशय आदराचे स्थान आहे. या तिच्या सर्वच गुणांचा मला प्रचंड अभिमान आहे आणि तिला हे सांगायलामला 'मदर्स डे' ची वाट पाहण्याची आवश्यकता चुकूनही लागत नाही. धन्यवाद !

# हुंडाबळी

**देवानंद कुलकर्णी**
प्रथम वर्ष वाणिज्य



हुंडाबळी ही भारताची एक समस्या आहे. हुंड्यामुळे अनेक स्त्रियांचा बळी जात असतो ह्याची कल्पना देखील नसते. मात्र ह्याचे प्रमाण भारतात जास्त मोठ्या प्रमाणावर दिसून येते. अशा जीव घेण्या प्रथेमुळे स्त्रियांचा बळी जातो. प्रत्येक वेळा सर्व प्रथाना स्त्रियांनाच सामोरी जावे लागते. हुंडाबळी मध्ये सामाजिक आर्थिक, आणि धार्मिक कारणे आहेत, जसे समाजात हुंडा द्यावा लागत असतो, त्याच्या वर तिचे घर उभे राहत असते का? असा प्रश्न मला पडतो. स्त्रियांना समाजात नेहमी दुय्यम स्थान मिळत आलेले आहे. इतिहास काळापासून हुंड्याच्या प्रथेमुळे स्त्रियांना या प्रश्नाला सामोरे जावे लागते. जर हुंडा दिला नाही तर मुलीला नांदवलेच जात नाही. हुंड्यासाठी मुलीला वारंवार मानसिक त्रासाला सामोरं जावं लागतं.

भारतासारख्या प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेल्या देशात हुंडाबळी ह्या सारख्या घटना घडाव्यात हे लाच्छनास्पद वाटते हे प्रकार का होतात आणि याला जबाबदार कोण आहे आणि ही प्रथा रोखण्यासाठी कायदे केले आहेत. याचा विचार केला पाहिजे. त्याची सुरवात समाजातून न करता घरातून केली गेली पाहिजे. ही बाब आपण आचरणात आणली पाहिजे. हुंडा देवालासुध्दा चुकला नाही, आपण तर मानव आहोत ना ? मुलगी होते आणि ती मोठी झाली कि तिला हुंडा द्यावा लागतो, म्हणून तिचा जन्मच नाकारणारे आई-वडील मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहेत. मुलीला जन्म नाकारणे आणि तिची गर्भातच हत्या करणे अत्यंत घृणास्पद आहे. याला जबाबदार कोण याचा गांभिर्याने विचार केला पाहिजे. हुंडाबळी हा प्रकार खेडेगावात विशेषत: आदिवासी भागात जास्त प्रमाणात आढळतो. आपण पाहतो की पूर्वी न शिकलेल्या लोकांमध्ये हुंड्याची प्रथा होती, पण आता सुशिक्षित लोक सुध्दा हुंड्याची मागणी करतात. हुंडा आज शिकणाऱ्याला सुध्दा हवा आहे आणि अशिक्षित मुलाला सुध्दा हवा आहे.

मुलीला हुंडा द्यावा लागतो म्हणून जेव्हा स्त्रिया गर्भपात करतात, त्यावेळी कित्येक मातांचा मृत्यू झालेला आहे, अशा बातम्या आपण बऱ्याच वेळा ऐकत असतो. हे सर्वांना माहिती असते पण याच्या मुळापर्यंत कोणतीही यंत्रणा जात नाही. आणि गर्भपात करणाऱ्या डॉक्टराला सुध्दा जाब विचारला जात नाही. गर्भवती मातांचा त्यात मृत्यू झाला तरी चालेल पण मुलगी कोणालाच नको असते.

आपल्या भारत देशामध्ये अशा घटना घडाव्यात या सारख्या दुसरे दुर्दैव कोणतं? मुलगी असावी असे वाटणारे समाजात कमी प्रमाणात दिसून येतात. हुंडा द्यावा लागतो म्हणून मुलीला जन्मच नाकारणारे काही महाभाग समाजात दिसून येतात.

१) हुंडा द्यावा लागतो म्हणून वंशाची ज्योत विजवणे. २) मुलगी उत्पन्नात घट करणारी असते. ३) मुलीला हुंडा द्यावा लागतो खर्च करावा लागतो. ४) मुलीच्या शिक्षणावर केलेला खर्च वाया जात असतो, त्याचा फायदा होत नसतो. ५) मुलगा सशक्त आणि मुलगी अशक्त असते. समाजातील माणसांची समजूत आहे. मुलगी हुंडा द्यावा लागतो म्हणून डोक्याला ताप मानला जातो. हुंड्यासाठी होणारा छळ, मुलीची घ्यावी लागणारी काळजी ह्या कारणामुळे मुलीला जन्माला घालण्याचे नाकारले जाते. सासरी होणाऱ्या मानसिक, शारीरिक त्रासाला कंटाळून कित्येक नवविवाहिता मृत्यूला कवटाळतात. हुंडाबळी रोखण्यासाठी अनेक सामाजिक संस्था कार्यरत आहेत. हे थांबवयाचे असेल तर त्याची सुरुवात घरातूनच व्हायला हवी. जो पर्यंत मुलगी नको फक्त मुलगाच पाहिजे ही मानसिकता बदलत नाही, तो पर्यंत हा प्रकार थांबणार नाही. मुलीचा जन्म म्हणजे हुंडाबळी हा दोष देऊन उपयोग होणार नाही. हुंडाबळी ही समस्या रोखण्यासाठी लोकांच्या मानसिकतेत बदल होणं गरजचे आहे. हा बदल जो पर्यंत समाज स्वीकारत नाही तो पर्यंत मुली जन्माला येण्यापूर्वीच त्यांना संपवण्याचा प्रकार थांबणं अवघड आहे. कारण सर्वांना मुलगाच हवा आणि फक्त मुलीला हुंडा द्यावा लागतो, म्हणून ती नकोशी वाटत असते. मुलीचा जन्मदर वाढला पाहिजे नाही तर आपल्याला आई, बहीण, बायको कुठून मिळणार याचा विचार होणं गरजेचं आहे. त्यामुळे मुलगी नको ही मानसिकता बदलणे समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे.



## रमाकांत आचरेकर



देवानंद कुलकर्णी
प्रथम वर्ष वाणिज्य

रमाकांत विठ्ठल आचरेकर यांचा जन्म १९३२ साली सिंधूदुर्ग जिल्हातल्या मालवण या गावामध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांनी १९४३ सालापासून क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. मात्र ते मैदानात प्रत्यक्षात उतरले नाहीत, पण त्यांनी आपल्या मार्गदर्शनाखाली खेळाडू घडविण्यात रस दाखवला.

आचरेकर सर यांनी दादरला यांनी शिवाजीपार्क येथे कामत मेमोरियल क्रिकेट क्लबची स्थापना केली. त्यांनी आपल्या प्रशिक्षकपदाच्या कारकिर्दीत अनके क्रिकेटपटू घडवले. यात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर, चंद्रकांत पंडित, जलदगती गोलंदाज अजित आगरकर, डावखुरा फलंदाज विनोद कांबळी, प्रवीण आमरे यासारख्या क्रिकेटपटुंनी आचरेकर सरांकडून क्रिकेटचे धडे घेतले. हा क्लब आणि याचे कार्य आता त्याची मुलगी कल्पना सरकार हिने सुरू ठेवले आहे. १९९० मध्ये क्रीडा क्षेत्रातला मानाचा द्रोणाचार्य पुरस्कार त्याना प्रदान करण्यात आला होता. तर २०१० मध्ये पद्मश्री पुरस्कारांने त्यांना गौरवण्यात आले होते. महाराष्ट्रात शासनातर्फे क्रीडामहर्षीचा गौरव करण्यासाठीचा दिला जाणारा शिवछत्रपती जीवन गौरव पुरस्कारही त्यांना २००३ मध्ये जाहीर करण्यात आला.

सचिनच्या लहानपणी जेव्हा त्याच्या भावाने त्याची क्रिकेटमधील गोडी ओळखली तेव्हा अजित तेंडुलकरने सचिनची गाठ आचरेकर गुरूजींशी घालून दिली. सचिनच्या कारकीर्दीच्या सुरूवातीला आचरेकर सर त्याला प्रॅक्टिससाठी मुंबईतल्या वेगवेगळ्या मैदानांवर घेऊन जात असत. सचिनने चांगला परफॉर्मन्स दिला आणि गुरूजी प्रभावित झाले तर त्याला बक्षिस म्हणून वडापाव द्यायचे. आचरेकर सरांच्या तालमीत घडलेल्या सचिनने विक्रमांचा डोंगर रचला. तेंडूलकर-आचरेकर ही गुरू शिष्याची जोडी आज जगभर गाजलेली आपल्याला दिसते.

खूप कमी लोकांना माहित आहे की सचिन लहानपणी खूप मस्तीखोर होता. मोठा भाऊ अजित तेंडूलकर त्याला कोचिंग करता रमाकांत आचरेकर सरांकडे सुरूवातीच्या काळात घेऊन जायचा. खेळताना सचिन देखील इतर मुलांप्रमाणे नियम पाळणारा विद्यार्थी होता. तेव्हा आचरेकर सरांनी सचिनला दिलेला दम हा त्याचं संपूर्ण आयुष्य बदलण्यासाठी महत्वाचा ठरला. सचिन म्हणतो की, माझ्या शाळेच्या दिवसांमधील ही गोष्ट आहे. मी शारदाश्रम विद्या मंदिर शाळेतून ज्युनिअर टीमकडून खेळत असे. आमची सिनीअर टीम वानखडे स्टेडिअममध्ये हॅरीस शील्डची फायनल खेळत होती. त्यावेळी आचरेकर सरांनी माझ्यासाठी एक प्रॅक्टीस मॅचचे आयोजन केले होते. शाळा सुटल्यानंतर त्यांनी मला तेथे जायला सांगितले. आचरेकर सरांनी त्या संघाच्या कर्णधाराशी बोलून सचिनला चौथ्या क्रमांकावर फलदांजी दिली जाईल असे सांगितले पण सचिन तेथे न जाता वानखेडे स्टेडिअमवर सिनिअर संघाला चिअर करण्यासाठी गेला आणि आचरेकर सरांनी विचारलं की तू किती रन केलेस तेव्हा त्याने सत्य परिस्थिती सांगितली. हे ऐकताच आचरेकर सर सचिनला सगळ्यांसमोर ओरडू लागले. आचरेकर सर सचिनला म्हणाले की दुसऱ्यासाठी टाळ्या वाजवण्याची गरज नाही. तू तुझ्या क्रिकेटवर लक्ष दे. असं काही तरी मिळव की दुसरे लोक तुझ्या खेळावर टाळ्या वाजवतील आणि सचिन म्हणतो की माझ्यासाठी हे खूप मोठ वाक्यं होतं, ज्याने माझं संपूर्ण आयुष्यच बदलून गेलं.

अशी भूमिका आचरेकर सरांची सचिनच्या आयुष्यातली होती. आज जर आचरेकर सर नसते, तर आता आपण ज्याला क्रिकेटचा देव म्हणून ओळखतो तो सचिन रमेश तेंडुलकर आपल्याला दिसला नसता. भारताचा सर्वात मोठा पुरस्कार जो सचिनला प्राप्त झाला तो आचरेकर सरांनमुळेच प्राप्त झाला आचरेकर सर जर नसते तर सचिनला कधीच 'भारतरत्न' पुरस्कार प्राप्त झाला नसता. सचिनच नव्हे तर भारताचे अनेक क्रिकेटपटू सर रमाकांत आचरेकर सरांकडून घडले आणि त्यांनी आपल्या देशातील क्रिकेट संघाची मान उंचवण्याचे काम केले.

रमांकांत विठ्ठल आचरेकर यांनी वयाच्या ८७ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. २ जानेवारी २०१९ रोजी सुमारे ५ वाजता त्यानी त्यांच्या राहत्या घरात त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांची प्राणज्योत मालवली आणि सर्व विश्वामध्ये शोककळा पसरली. ज्यांच्यामुळे या विश्वाला सचिन सारखा हिरा मिळाला. त्याचे गुरु रमाकांत आचरेकर सर या जगामध्ये राहिलेले नाहीत. पद्मश्री श्रीदेवीवर शासकीय इतमामात अत्यसंस्कार झाले, पण ज्यांनी भारताला एक हिरा दिला त्या पद्मश्री रमाकांत आचरेकरांवर तसे न होणं असा प्रोटॉकॉल नाही म्हणणं, संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांनी त्याला उपस्थित न राहणं आणि त्याबद्दल काहीही खंत न वाटणं, ही सरकारी उदासीनता आणि त्यांचं वागणं, याचं कारण आचरेकर सर झगमगत्या दुनियेतील आणि पैसेवाले नव्हते.

सचिन तेंडुलकरने त्यांच्या पार्थिवाला खांदा देणं यापेक्षा जास्त चांगली मानवंदना आचरेकर सरांना काय असू शकते? सरकारबद्दल न्यूज चॅनेलवर याबाबत आक्रस्ताळ्या पध्दतीने तारस्वरात संताप व्यक्त करणाऱ्या अँकरना एकच प्रश्न आहे की,श्रीदेवीच्या निधनाची बातमी आल्यापासून तिच्या अंत्यसंस्कारापर्यंत तुमच्या चॅनेलवर सतत श्रीदेवी दिसत होती. आचरेकर सरांच्या निधनाची बातमी आल्यावरही तुमच्या चॅनलवर सतत श्रीदेवी दिसत होती. आचरेकर सरांच्या निधनाची बातमी आल्यावर तुमच्या चॅनलवर ती किती वेळ दिसली हो? श्रीदेवीची बातमी तीन दिवस दाखवणं आणि आचरेकर सरांना त्याच्या पाच टक्केही वेळ न देणं, यामागची नक्की

भूमिका काय? सरकारची पापपुण्य निवडणुकीच्या माध्यमातून निदान त्याच्या पदरात घालता येतात, तुमचं काय? सेलिब्रिटींच्या मागे न धावता त्यांना घडवणाऱ्या पडद्यामागच्या लोकांची मोठ्या प्रमाणावर दखल घेऊन एक वेगळा आदर्श निर्माण करणं ही माध्यमांची पण जबाबदारी नाही काय? स्वत: पण तसंच वागायचं आणि चॅनेल हातात आहे म्हणून आपणच प्रश्न निर्माण करून सरकारवर दुगाण्या झाडायच्या एवढंच अपेक्षित आहे काय? माध्यमांकडून माध्यमांच्या नावाने खडे फोडणं आणि माध्यमांनी लोकांना बघायंच असतं तेच आम्ही दाखवतो असं म्हणणं हा 'आधी अंडं की आधी कोंबडी' या प्रश्नासारखाच गहन प्रश्न आहे.

बीती बात पर दु:ख नहीं
करना चाहिए।
भविष्य के विषय में भी
नहीं सोचना चाहिए।
बुद्धिमान लोग वर्तमान समय
के अुसार ही चलते है।

- चाणक्य

अनुभव हा आपला
सर्वोत्तम शिक्षक आहे.
जोपर्यंत जीवन आहे
तोपर्यंत शिकत रहा.



- स्वामी विवेकानंद

उठा जागे व्हा
आणि उद्दीष्ट
साध्य होईपर्यंत
थांबू नका. ...



- स्वामी विवेकानंद



मुझे पूरा यकिन है कि जब
तक किसी ने नाकामयाबी की
कडवी गोली न चखी हो, वो
कामयाबी के लिए पर्याप्त
महत्वाकांक्षा नहीं रख सकता।

- अब्दुल कलाम



सतत अभ्यास करणाऱ्या
आणि आपार मेहनत करणाऱ्या
तुमच्या मित्रांना चिडवू नका.
एक दिवस असा येईल की
तुम्हाला त्यांच्याच हाताखाली
काम करावे लागेल.

- बिल गेट्स



शिक्षण एक बहुत ही महान
पेशा है जो किसी व्यक्ति के
चरित्र, क्षमता, और भविष्य
को आकार देता है। अगर लोग
मुझे एक अच्छे शिक्षक के रुप
में याद। रखते हैं, तो मेरे लिए
ये सबसे बडा सम्मान होगा।

- अब्दुल कलाम

निंदेला घाबरुन आपलं ध्येय
सोडू नका. कारण ध्येय साध्य
होताच निंदा करणाऱ्यांची मतं
बदलतात.



- विश्वासराव नांगरे पाटील

# मिठाचा सत्याग्रह



**अमीत सुरेश फटांगरे**
तृतीय वर्ष विज्ञान

मोहनदास करमचंद गांधी (ऑक्टोबर २ इ.स.१८६९ जानेवारी ३० इ.स.१९४८) हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्वज्ञ होते. महात्मा गांधी या नावाने ते ओळखले जातात. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधीनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरीत केले. रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांना महात्मा (अर्थ महान आत्मा) ही उपाधी दिली. भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू असे म्हणत आणि त्यांना अनिधिकृतपणे भारताचे राष्ट्रपिता म्हटले जाते. गांधीजी सविनय सत्यग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. त्यांचा जन्मदिवस २ ऑक्टोबर भारतात 'गांधी जयंती' म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारतात सार्वजनिक सुट्टी असते.

गांधीचा जन्म ऑक्टोबर २ इ.स.१८६९ या दिवशी सध्याच्या गुजरात मधील पोरबंदर शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळीबाई होते. त्यांच्या आजोबाचे नाव उत्तमचंद गांधी असे होते. त्यांना उत्ता गांधी असे म्हणत. पुतळीबाई या करमचंद यांच्या चौथ्या पत्नी होत्या. आधीच्या तीन पत्नी प्रसुतिमध्ये मृत पावल्या होत्या. करमचंद हिंदू मोघ समाजातील अत्यंत धार्मिक वातावरणातील. बालपणचा मोठा प्रभाव गांधीजीच्या पुढील आयुष्यावर दिसून येतो. विशेषत अहिंसा, शाकाहार, सहिष्णुता, इतरांबद्दल करूणा या तत्वांचे बीज याच काळात रोवले गेले. जैंन धार्मिक असलेल्या आईमुळे मोहनदास व जैन संकल्पना आणि प्रथांचा प्रभाव होता. प्राचिन वाङ्मयातील श्रावणबाळ आणि राजा हरिश्चंद्र या दोन कथांचा मोहनदासच्या मनावर गहिरा परीणाम होतो. स्वत:च्या आत्मचरित्रात ते कबूल करतात की, या दोन कथांमुळे त्यांच्या मनावर अमीट परिणाम झाला होता. ते लिहितात, गांधीच्या सत्य आणि प्रेम या दैवी गुणाशी झालेल्या स्व:ओळखीचा माग हा या पौराणिक पात्रांपर्यंत येऊन पोहचतो.

**मिठाचा सत्याग्रह :**

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य लढ्यादरम्यान झालेला मिठाच्या सत्याग्रह हा भारतातील तत्कालीन ब्रिटिश शासनाने मिठासारख्या जीवनाश्यक गोष्टीवर लावलेल्या कराच्या विरोधात इ.स.१९३० रोजी भारतीय राष्ट्रिय काँग्रेसने जनतेला गांधीजीच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग करण्याचा आदेश दिला. मिठाचा सत्याग्रह याच चळवळीचा भाग होता. दांडी या ( सध्याच्या गुजरात राज्यातील ) समुद्रकिनारी असलेल्या गावातील स्थानिक लोकांच्या समुहाच्या पाण्यापासून मीठ तयार करण्याचे काम बंद पाडण्यासाठी बळाचा वापरसुध्दा केला. या दडपशाही विरोधात कर भरण्यास नकार आणि अहिंसक लढा या मार्गाने आंदोलन करण्याचे ठरले. मिठाच्या सत्याग्रहाची सुरवात दांडी यात्रेने झाली. ही दांडी यात्रा (मोर्चा) साबरमती आश्रमापासून १२ मार्च १९३० रोजी सुरू झाली. गांधीजींच्या बरोबर त्यांचे ७८ निवडक अनुयायी होते. त्यात सरोजिनी नायडू, इला भट यांचा समावेश होता. यात्रा पुढे निघाली तसतशी सहभागी लोकांची गर्दी वाढतच गेली. ही यात्रा २४ दिवस चालली आणि लोक ३८५ कि.मी. पर्यंत पायी चालले. यात्रा दांडी येथे सुमद्रकिनारी ६ एप्रिल १९३० ला पोहचली, त्या दिवसी जेव्हा सकाळी साडे सहा वाजता गांधीजीनी चिमूटभर मीठ उचलून कायदेभंग केला तेव्हा कायदेभंगाच्या मोठ्या प्रमाणातील चळवळींची ती सुरूवात ठरली. दांडीच्या सत्याग्रहानंतर गांधीजी इ.स.१९३६ मध्ये पक्षात आले तेव्हा जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली पक्षाचे लखनौ येथे अधिवेशन चालू होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या भविष्याबद्दल विचार करण्यापेक्षा आधी पूर्ण स्वराज्य कसे मिळेल यावर सर्व लक्ष केंद्रीत करण्यात यावे, असे गांधीजीचे मत होते. पण तरीही पक्षाच्या समाजवादी धोरणाचा अवलंब करण्याच्या निर्णयाला त्यांनी विरोध केला नाही. इ.स.१९३८ साली पक्षाध्यक्षपदी निवडून आलेले सुभाषचंद्र बोस आणि गांधीजी यांच्यात अनेक वाद झाले. गांधीजींच्या या विरोधाचे मूळ कारण सुभाषचंद्र बोस यांचा अहिंसेवरील अविश्वास हा होता. गांधीजीच्या विरोध असूनसुध्दा बोस सलग दुसऱ्यांदा अध्यक्षपदी निवडून आले पण जेव्हा सुभाषचंद्रांनी गांधीजीच्या तत्त्वांना सोडून दिले आहे असे कारण पुढे करून देशभरात अनेक पक्षनेत्यांनी सामुदायिक राजीनामे दिले. तेव्हा सुभाषचंद्र बोस यांनी राजीनामा दिला.

३० जानेवारी ११९४८ ला, दिल्लीला बिर्ला भवनच्या बागेतून लोकांबरोबर फिरत असताना गांधीजीच्या गोळी मारून हत्या करण्यात आली त्यांचा मारेकरी नथुराम गोडसे हा एक प्रतिगामी हिंदू होता व त्याचे संबंध जहालमतवादी हिंदू महासभेशी होते. नथूराम गोडसेने महात्मा गांधी यांची हत्या करण्यासाठी बरेटा मॉडलचे पिस्तूल वापरले होते. त्याच्या मते पाकिस्तानला पैसे देऊन भारताला दुबळे पाडण्यासाठी गांधीजी जबाबदार होते. गोडसे आणि त्याचा सहकारी नारायण आपटे त्यांच्यावर खटला दाखल करून त्यांना दोषी ठरवण्यात आले. त्यांना १५ नोव्हेबर १९४९ ला फाशी देण्यात आली. गांधीजींच्या राजघाट येथील समाधीवर 'हे राम' असे लिहिले आहे. हे त्यांचे शेवटचे शब्द होते. असे अनेकजण मानतात, पण त्याची सत्यासत्यता वादग्रस्त आहे. गांधीजींच्या मृत्यूनंतर पंडीत जवाहरलाल नेहरूंनी रेडीओवर देशाला संबोधीत केले.

अहिंसा का पुजारी सत्य की राह दिखानेवाला
इमान का पाठ पढा गया हमें वो बापू लाठीवाला!

# प्रातिनिधीक शासनाच्या प्रगल्भतेसाठी जॉन स्टूअर्स मिल यांचे विचार

**कु. अश्विनी सीताराम बांडे**
तृतीय वर्ष कला



**जीवन परिचय :**

एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमध्ये ते अनेक प्रख्यात विचारवंत होऊन गेले त्यांच्यामध्ये जॉन स्टुअर्स मिलचे स्थान अत्यंत श्रेष्ट दर्जाचे आहे. बुद्धिवादाचा, उदारमतवादाचा व मानवतेचा पुरस्कार करणारा एक महान विचारवंत म्हणून जे. एस. मिलचे नाव इतिहासात अजरामर आहे. जॉन स्टूअर्ट मिलचा जन्म २० मे १८०६ रोजी लंडन येथे झाला. त्यांचे वडिल जेम्स मिल हे प्रख्यात तत्वज्ञ आणि बॅंथॅमचे नामवंत शिष्य होते उपयुक्तवादाचा नवा विचार संप्रदाय मांडणारे जेरेमी बॅथॅम आणि जेम्स मिलने या आपल्या मुलाला अगदी बालपणापासून शिक्षण देण्यास सुरूवात केली. मिलच्या शिक्षणाला त्याच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासून सुरूवात होऊन त्याचे सारे शिक्षण वयाच्या चौदाव्या वर्षी पूर्ण झाले. जेम्स मिलने आपल्या करड्या शिस्तीत आणि पध्दतशीरपणे त्याचे शिक्षण हरिच पूर्ण केले. त्यामुळे अवघ्या दहा वर्षाच्या काळात जॉन मिलने ग्रीक व लॅटिन भाषा, अंकगणित, बीजगणित, भूमिती, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, कायदेशास्त्र आणि विज्ञान इत्यादी विषयाचे सांगोपांग ज्ञान सहजपणे हस्तगत केले.

जॉन स्टूअर्ट मिल आपल्या वडिलांकडून जसे खूप शिकले, तसे त्याच्या घरी नेहमी येणाऱ्या काही विचारवंतांकडूनही तो खूप शिकला बॅजहाट, अर्थशास्त्रज्ञ रिकार्डो, कायदेपंडित जॉन ऑस्टिन, इतिहासतज्ञ ग्रोह इत्यादी विद्वान मंडळी जेम्स मिलकडे येऊन चर्चा, वादविवाद करीत असत. साहजिकच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि विचारांचा फार मोठा प्रभाव जॉनवर पडला. वयाच्या सोळाव्या वर्षी जॉन मिलने बेंथॅमचे सर्व ग्रंथ वाचून काढले आणि त्याचा उपयुक्तवादाचा सिध्दांत पूर्णपणे आत्मसात केला. त्याच दरम्यान मिलने प्लेटो, हेरोडॉटस, सीनोफोन आणि आइसोक्रेटस या विचारवंतांचे ग्रंथ वाचून काढले.

उपयुक्तवादाच्या प्रचारासाठी व अभ्यासासाठी जॉन स्टूअर्स मिलने १८२२-२३ च्या सुमारास एक लहानशी संस्था स्थापन केली. तिचे नाव 'युटिलिटेरिअन सोसायटी' असे होते. ही संस्था फार दिवस चालली नाही, परंतु तिच्यामुळे उपयुक्ततावादाचा चहूकडे फार मोठा गवगवा झाला. मे, १८२३ मध्ये जे.एस.मिलने इंडिया हाऊसमध्ये नोकरी धरली. सुरूवातीला मिलकडे भारतातील अधिकाऱ्यांकडे पाठवावयाच्या खलित्याचे कच्चे मसुदे तयार करण्याचे काम होते. पुढे तेथे त्याला हळूहळू बढती मिळत गेली आणि शेवटची दोन वर्ष मुख्य तपासनीस म्हणून त्याचे काम पाहिले. मिलने ईस्ट इंडिया कंपनीची ३६ वर्ष नोकरी केली, परंतु ही नोकरी त्याला वाचनाच्या चिंतनाच्या व लेखनाच्या आड केव्हाही आली नाही, उलट तिच्या साह्याने त्याला आर्थिक स्थैर्य लाभल्यामुळे त्याला आपले बौध्दिक जीवन विकसित करता आले. बुद्धिमत्तेबरोबरच भावनेलाही जीवनात महत्वाचे स्थान असते हे ओळखून जॉन स्टूअर्स मिलने कला, संगीत, काव्यवाचन यात रस घेण्यास सुरुवात केली. त्याने वर्डस्वर्थच्या काव्याचे वाचन लेखनामुळे केले होते. सुरूवातीला मिलला जी प्रसिध्दी लाभली ती वृत्तपत्रातील त्याच्या लेखनामुळे. ट्रॅव्हलर क्रॉनिकल या वृत्तपत्रातून मिलने आपली काही लेख व पत्रे प्रसिध्द केली, नंतर वेस्ट मिन्स्टर रिव्हयू या नियतकालिकातून त्याने आपले विचार मांडण्यास सुरूवात केली. या नियतकालिकाशी त्याचा पाच वर्षे घनिष्ठ संबंध होता. याच काळात सेन्ट सायमन व ऑगस्ट कॉम्त यांचे वाङ्मय त्याने वाचून काढले. कॉम्तच्या विचारांतील दोष दाखवून देण्यासाठी त्याने 'ऑगस्ट कॉम्त अँड पॉझिटिव्हिझम २' हा ग्रंथ लिहिला. पुढे मैत्रीत रुपांतर झाले १९३० मध्ये फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली. त्या क्रांतीची पुढारी लाफायेत यांच्याशी मिलने एक्झामिनर या वृत्तपत्रात फ्रान्सच्या घडामोडीबाबत लेखनकार्य केले.

१८३० च्या सुमारास मिलच्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाची घटना घडून आली. ती घटना म्हणजे हॅरिएट टेलर या विवाहित स्त्रीशी घडून आलेली त्यांची ओळख ही मैत्री होय. त्यावेळी मिलचे वय पंचवीस आणि श्रीमती टेलरचे वय तेवीस वर्ष होते. श्री. टेलर आणि श्रीमती टेलर यांचे वैवाहिक संबंध प्रेमाचे व जिव्हाळ्याचे होते. तसेच मिल आणि श्रीमती टेलर यांचे संबंध स्नेहाचे व बौध्दिक स्वरूपाचे होते. एक कुशाग्र व तैल बुध्दीची बाई मिलच्या विचारावर फिदा झाली होती. विविध विषयावर उच्च व बौध्दिक पातळीवरून चर्चा करण्यासाठी ती वारंवार मिलला भेटत असे. परंतु श्री. टेलर यांच्याविषयी त्या दोघांच्या मनात एवढा मोठा आदर होता की त्यांचे मन दुखावले जाऊ नये म्हणून त्यांनी प्रेमाला वैषयिक प्रेमाचे रुप येऊ दिले नाही.

समाजात त्यांच्या प्रेमाबद्दल बरीच कुजबूज चालू होती. पण दोघांनीही त्या चर्चेकडे दुर्लक्ष केले. १९४९ मध्ये श्री. टेलर वारले त्यानंतर दोन वर्षांनी मिल व श्रीमती हॅरिएट टेलर यांनी विवाह केला. त्यानंतर जवळजवळ साडेसात वर्ष त्यांनी सुखाचा संसार केला.

१९५८ मध्ये श्रीमती टेलरचे दक्षिण फ्रान्समध्ये एव्हिनन येथे निधन झाले. तसेच मिलने तिची समाधी बांधली. हरिएट

टेलरचे मिलच्या जीवनातील स्थान फार मोठे होते. ती त्यांची स्फूर्तिदात्री व प्रेरणा होती. आपण तिच्या सहवासात राहिल्याने अपूर्व असे ग्रंथलेखन केले, असे मिलने आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे. मिलचा श्रीमती टेलरशी सतत अठ्ठावीस वर्ष संबध आला. या काळात तिने मिलच्या जीवनावर आणि लेखनावर कायम स्वरूपाचा ठसा उमटविला होता. मिलच्या प्रत्येक ग्रंथलेखनावर तिचा हात फिरल्यानंतरच त्याची प्रसिध्दी होत असे. 'स्वातंत्र्याविषयी' हा आपला जगप्रसिध्द ग्रंथ मिलने आपल्या प्रेमळ पत्नीच्या स्मृतीस अर्पण केला होता. मिलने आपल्या पत्नीच्या थडग्यावर जे वाक्य कोरावयास लावले होते, त्यावरून त्यांच्या मनात पत्नीविषयी असलेल्या नितांत प्रेमाची उत्तम कल्पना येते. ते वाक्य असे होते, 'तिच्यासारखी मन आणि बुध्दी असणारी आणखी थोडी मंडळी या पृथ्वीवर असती तर या पृथ्वीवर स्वर्ग अवतरला असता आणि पृथ्वीचा त्या स्वर्गाला हेवा वाटू लागला असता.' १८३३ ते १८५९ या काळात मिलने विविध स्वरूपाचे प्रचंड ग्रंथलेखन केले. System of logic, Political Economy, On Liberty, Representative Government असे त्याचे विविध ग्रंथ प्रसिध्द झाले. १८५४ मध्ये मिल क्षयाच्या विकाराने खूप आजारी पडला होता. परंतु दक्षिण फ्रान्समध्ये काही महिने घालविल्यानंतर त्याला बरे वाटू लागले. पुढे त्याने आपले ग्रंथलेखन व वृत्तपत्र लेखन चालू ठेवले. १९६५ मध्ये मिल पार्लमेंटच्या निवडणूकीत निवडुन आला. पार्लमेंटचा सभासद म्हणून त्याने तीन वर्षे उत्कृष्ट कामगिरी बजावली. सुधारणा विधेयक मंजूर करावे, स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळावा, अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व लाभावे, प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पध्दती सुरू करावी इत्यादीबाबत पार्लमेंट मधील मिलचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. सुधारणा विधेयक मंजूर करण्यामध्ये त्याचा सिंहाचा वाटा होता. आयर्लंडचा प्रश्न, कामगारांचा प्रश्न, प्रत्यार्पण कायद्यातील दुरूस्ती, लाचलूचपत विरोधी विधेयकाची मंजूरी इत्यादी विषयासंबंधीचे मिलचे पार्लमेंटमधील कार्य उल्लेखनीय होते. पार्लमेंटचा सभासद म्हणून मिलचे खास वैशिष्ट्ये असे की ज्या प्रश्नांकडे कुणाही सभासदाचे लक्ष जात नसे, अशा महत्वाच्या व आवश्यक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य तो उत्साहाने आणि जबाबदारीने पार पाडीत असे. १९६८ मध्ये पार्लमेंटची निवडणूक झाली. परंतु मिलचा या निवडणूकीत पराभव झाला.

पार्लमेंटच्या कामातून मुक्त झाल्यानंतर मिलने दक्षिण फ्रान्स मधील एव्हिनन येथे जवळजवळ पाच वर्ष वास्तव्य केले. वयाच्या ६७ व्या वर्षी मिलचा जुना क्षयरोग बळावला आणि ८ मे १८७३ रोजी एव्हिनन येथे हॅरियट टेलरच्या (पत्नीच्या) समाधीतच त्याचा देह समाधिस्थ करण्यात आला. मिलच्या मृत्यूमुळे एकोणिसाव्या शतकातील एक अत्यंत तेजस्वी तारा निखळून पडला. तारा निमाला पण त्याचा प्रकाश जगभर पसरला. त्या प्रकाशाची स्निग्ध, सुंदर व शीतल प्रभा सर्वत्र पसरली. मिलच्या उदारमतवादी मानवतेचा आणि व्यक्तिस्वातंत्र्यवादाचा दिव्य संदेश सर्व जगाला एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक व प्रेरक ठरला गेला.

## ग्रंथरचना :

मिलने आपल्या ग्रंथलेखनात तर्कशास्त्र व वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला होता. मिल समतोल विचारांचा, अनुभव प्रामाण्यवादी व स्वतंत्र प्रज्ञेने जगाला मार्गदर्शन करण्यासाठी मिलने विविध ग्रंथलेखन केले. मिलचे काही प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत.

१) Essay on some unsettled Questions of Political Economy (1844)
२) Essay on Liberty (1854)
३) Consideration on Representative Government (1865)
४) Utilitarianism (1863)

## प्रातिनिधिक शासनपध्दतीबद्दल मिलचे विचार :

मिलने आपल्या 'Representative Government' या ग्रंथात लोकशाही व प्रातिनिधिक शासनपध्दती या विषयी विचार मांडलेली आहेत. मिल लोकशाहीचा व प्रातिनिधिक राज्यपध्दतीचा पुरस्कर्ता होता. त्याच्या मते राज्यसंस्था ही एक सामाजिक योजना आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तिचा बौध्दिक सामाजिक व सांस्कृतिक दर्जा उंचावणे हे त्या संस्थेचे प्रमुख कार्य असते. अर्थात लोकांना जास्तीत जास्त स्वातंत्र्य देऊन व राज्यव्यवहारात प्रत्यक्षपणे भाग घेण्याची त्यांना अधिकात अधिक संधी देऊन हे कार्य साधता येते.

मिलच्या मते प्राचीन शासन पध्दतीत सर्व नागरिकांना राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग असलेली लोकशाही पध्दती आस्तित्वात होती. परंतु आधुनिक काळात वाढती लोकसंख्या आणि राज्याचा वाढता विस्तार यामुळे सर्व नागरिकांना राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग घेणे कठीण झाले. त्यामुळे प्रातिनिधिक राज्य पध्दतीचा स्वीकार करणे भाग पडले. नागरिकांनी निवडलेले प्रतिनिधी राज्याचा कारभार पाहू लागले. मिलच्या काळात इंग्लंडमध्ये मताचा अधिकार अत्यंत संकुचित स्वरूपाचा होता प्रातिनिधिक दोन गट असत बहुसंख्य गटाचे प्रतिनिधी शासनसत्तेवर आरूढ होत आणि अल्पसंख्य गटावर अन्याय करीत असत. बहुसंख्याकांचा गट सत्तेचा वापर करून आपल्या गटाच्या हिताचे निर्णय घेत असे आणि अल्पसंख्य गटाचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करीत असे. त्यामुळे होणारे निर्णय एकांगी व पक्षपातीपणाचे असत. अशा रितीने प्रातिनिधिक शासनपध्दतीचा राज्यकारभार चालेल तर समाजातील अल्पसंख्य गटावर अन्याय होऊन लोकशाही धोक्यात येईल असे मिलला वाटत असे.

प्रातिनिधिक पध्दतीमधील हा धोका नाहीसा करण्यासाठी मिलने प्रमाणशिर प्रतिनिधीत्व पध्दतीचा Proportional Representation पुरस्कार केला. मिलची ही कल्पना त्यावेळी मान्य झाली नाही आणि आजदेखील ती अमान्यच आहे. मतदारांनी आपले मत उघडपणे न घाबरता कोणाचेही दडपण न मानता दिले पहिजे असा मिलचा आग्रह होता, त्याला गुप्त मतदानापध्दती बिलकुल पसंत नव्हती. कायदेमंडळाचा दर्जा उच्च प्रतीचा होण्यासाठी जे प्रतिनिधी द्यावयाचे ते सुसंस्कृत सुशिक्षित, सुजाण, समंजस, नि:स्वार्थी, कार्यक्षम असे आहेत की नाहीत याविषयी खात्री करून घेतली पाहिजे. मताचा अधिकार वापरतांना योग्य व कार्यक्षम व्यक्तिलाच ते मत दिले पाहिजे याची जाणीव मतदारांत नेहमी राहिली पाहिजे. म्हणून सुशिक्षित व्यक्तिलाच मतदानाचा अधिकार द्यावा असे मिलने जोरदार प्रतिपादन केले आहे. ज्यांना लिहिता वाचता येत नाही, त्यांना मतदानाचा अधिकार देऊ नये. अज्ञानी व्यक्तींनी, अशिक्षित नागरिकांनी निवडलेले प्रतिनिधी कार्यक्षम व लायक असणार नाहीत, त्यामुळे सर्वांचे कल्याण सर्वांचे हित हा राज्याचा प्रधान हेतूच नष्ट होईल, अशी मिलला भीती वाटत होती, मिलने स्त्रियांना मतदानाचा अधिकार द्यावा, असे मत मांडले आहे. राज्यात स्त्रियांची अर्धी संख्या असते. तेव्हा त्यांना मतदानाचा अधिकार नाकारणे म्हणजे अर्धी लोकसंख्या राज्यकारभारातून वंचित ठेवण्यासारखे होईल. स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांना मतदानाचा अधिकार देणे अधिक योग्य ठरते. सर्व व्यक्तिंना समान महत्व दिले तर केवळ संख्यात्मक स्वरूप वाढेल, परंतु त्यामुळे गुणात्मक दर्जा एकदम घसरला जाईल, असे मिलला वाटते. म्हणूनच मिलने सुशिक्षित शहाण्या व्यक्तींनाच मतदानाचा अधिकार द्यावा असे म्हटले आहे.

शासनसंस्थेविषयीचे मिलचे विचार मौलिक स्वरूपाचे आहेत. लोकांना गरजेनुसार आवडीनुसार शासनसंस्था निर्माण करता येते. इतिहास, संस्कृती, सामाजिक स्थिती इत्यादी गोष्टींचा विचार करून लोक आपली शासनपध्दती बनवितात. त्यामुळे वेगवेगळी स्वरूपाच्या शासनपध्दती निर्माण झालेल्या आहेत. परंतु समाज जसजसा सुसंस्कृत होत जाईल तसतसी प्रातिनिधीक शासनपध्दती रुढ होत जाईल, अर्थात प्रत्येक नागरिकाने आपुलकीच्या जाणिवेने आणि नि:स्वार्थी बुध्दीने मतदानांचा हक्क बजविला पाहिजे. मिलने प्रातिनिधिक शासनपध्दीविषयी पुढीलप्रमाणे मते मांडलेली आहेत. प्रतिनिधिक शासनपध्दती इतर सर्व पध्दतीपेक्षा अधिक चांगली असते, कारण तिच्यामध्ये सार्वभौम सत्ता म्हणजेच नियंत्रणाची सर्वोच्च सत्ता समाजातील अखेरच्या समुदायाच्या हाती असते. त्या सत्तेचा वापर करण्यामध्ये प्रत्येक नागरिकाला भाग घेता येतो. एवढेच नव्हे तर अधून-मधून स्थानिक किंवा प्रादेशिक स्वरूपाचे एखादे काम स्वत: करावे लागते आणि त्याच्या योगाने शासनाच्या कार्यात प्रत्यक्षपणे भाग घेता येतो. मिलच्या मते, राजकारभारात लोकांना प्रत्यक्षात भाग घेण्यास जेवढी जास्त संधी मिळते, तेवढ्या प्रमाणात त्यांच्या बौध्दीक व सांस्कृतिक विकास होतो. म्हणूनच शासनसंस्था राष्ट्रीय शिक्षणाचे एक साधन आहे. लोकांत सद्‌गुणांची, शहाणपणाची वाढ झाली की लोक प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेचा अवलंब करू शकतील अशी मिलची समजूत होती. प्रातिनिधिक राज्यकारभार व्यवस्थेतील प्रतिनिधीसभेमध्ये जनतेतील सर्व गटांना आणि वर्गांना समप्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. गरिबांना, कामगारांना, अल्पसंख्याकांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे असा मिलचा आग्रह होता.

प्रातिनिधीक शासनपध्दतीत सार्वभौम सत्ता प्रतिनिधीसभेत वास्तव्य करीत असते. राज्यातील सर्व लोकांनी प्रतिनिधी सभेकडे सार्वभौम सत्ता दिलेली असते तेव्हा प्रतिनिधी गृहात व्यक्तीस्वातंत्र्याला पोषक असे कायदेनिर्मितीचे कार्य करावे लागते. सरकारच्या कार्यावर नियंत्रण व देखरेख करण्याचे कार्य प्रतिनिधीगृहास करावे लागते. सरकारी अधिकारी योग्य प्रकारे काम करतात की नाही ते पाहाणे, विश्वासघातकी, स्वार्थी अशा शासकाला पदच्यूत करण्याचा अधिकार विधिमंडळाला असतो. मिलने प्रातिनिधिक पध्दतीचे विश्लेषण करतांना लोकशाही पध्दतीमधील काही दोष दाखवून त्यावर उपाय सुचविले आहेत. मिलच्या मते, लोकशाहीत पुढील दोष आढळतात.

१) राज्यात अडाणी, असंस्कृत, अशिक्षित लोक असतील तर तेथे लोकशाही यशस्वी होणे कठिण असते. तेव्हा सरकारने राष्ट्रीय शिक्षणाची सोय केली पाहिजे. लोकशिक्षणावर अधिक भर देऊन लोकांना राज्यकारभार समजावून घेण्याइतपत शहाणे केले पाहिजे.

२) लोकशाही राज्यात वर्गभेद, जातीभेद, वंशभेद असेल तर राष्ट्राचे ऐक्य, राष्ट्रीयत्व जोपासणे कठिण होते. श्रीमंत गरीब असे भेद सामाजिक दृष्टीकोनातून कमी केले पाहिजेत. केवळ एकाच वर्गाला जोपासून दुसऱ्या वर्गाचे नुकसान करणे योग्य ठरणार नाही.

३)सत्तेच्या अभिलाषेमुळे लोकशाहीत व्यक्तीस्वातंत्र्यावर आक्रमण होण्याचा धोका असतो. तेव्हा प्रतिनिधींनी सत्तेचा व संपत्तीचा हव्यास न धरता लोकहिताच्या भूमिकेतून कायदे केले पाहिजेत अशी अपेक्षा असते.

४) शासनसंस्थेचे क्षेत्र मर्यादित असावे, म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होणार नाही.

५) प्रतिनिधींनी संसदीय पध्दतीचे पावित्र्य व महत्व टिकविण्यासाठी कामाबद्दल मोबदला किंवा वेतन घेऊ नये. कारण वेतनाची आकर्षणाने किंवा अन्य काही फायदे होतात म्हणून अकार्यक्षम लोक निवडून येण्याचा प्रयत्न करू शकतील.

६) प्रतिनिधी मंडळाने राज्याच्या कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवून राज्यकारभार कसा अधिक कार्यक्षम व सुखाचा (प्रगतीचा) होईल याकडे लक्ष पुरविले पाहिजे. शासनकर्त्यांना त्याच्या अन्यायकारक कृतीबाबत शासन झाले पाहिजे. वेळप्रसंगी अशा वाईट मार्गाने वागणाऱ्या अधिकाऱ्यांना पदावरून कमी केले पाहिजे. अशा रितीने मिलने प्रातिनिधिक लोकशाहीतील दोषांची व त्यावरील उपायांची चिकित्सा केलेली दिसते.

### प्रातिनिधिक शासनपद्धतीचे परीक्षण :

मिलने लोकशाहीतील धोके ओळखून ते नष्ट करण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पध्दती सांगितलेली आहे. डनिंग यांच्या मते, मिलने प्रातिनिधीक पध्दतीला महत्व देऊन व्यक्तिस्वातंत्र्याचे उत्तम प्रकारे संरक्षण केले आहे. नागरिकांना शिक्षण, संपत्ती या कसोटीवर मतदानाचा अधिकार देऊन संख्येपेक्षा गुणात्मक कार्याला महत्त्व देऊन प्रतिनिधींची निवड योग्य प्रकारे व्हावी असे म्हटले आहे. त्यासाठी क्रमदेव प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची पध्दती सुचविली. स्त्रियांना व अल्पसंख्य लोकांना राजकीय शिक्षण देऊन राज्यकारभाराबाबद अधिक जागृत केले पाहिजे. अशी रितीने मिलचे प्रातिनिधीक लोकशाहीचे विचार महत्वपूर्ण ठरले असले तरी त्या विचारावर काही प्रमाणात टीका होतांना दिसते.

१) वेपर :- वेपर यांच्या मते, मिलचे विचार लोकशाही विरोधी होते, तो काहीसा लोकशाहीबद्दल नाखुश होता. त्याला राज्यातील सर्व नागरिकांना समजावून घ्यायचे नाही, जे सुशिक्षित, समंजस व सुसंस्कृत असतील त्यांनाच राजकीय स्वातंत्र्य द्यावे असे त्यांचे मत होते. अर्थात त्यामुळे समाजातील बहुसंख्य लोकांना राज्यकारभारापासून वंचित केले जाण्याची भीती असते.

२) मिलची प्रमाणशीर प्रातिनिधीत्वाची पध्दती अधिक गुंतागुतीची आहे. त्यामुळे सामान्य माणसांना ती पध्दती पेलण्यासारखी नाही. साहजिकच प्रत्यक्ष व्यवहारात ही पध्दती स्वीकारणे कठिण जाते.

३) मिलने खुल्या मतदान पध्दतीचा पुरस्कार करून गुप्त मतदान पध्दतीला विरोध दर्शविलेला दिसतो. परंतु प्रत्यक्षात खुली मतदान पध्दती स्वीकारली तर जनतेत संघर्ष निर्माण होईल, राजकीय दबाव वाढला जाईल आणि मतदारांना आपले मत देणेही मुश्किल होईल.

४) शिक्षण व संपत्ती असणाऱ्यानांच मताचा अधिकार असावा असे मिलचे मत आहे. परंतु सुशिक्षित माणसेच राजकीयदृष्ट्या जागृत असतात असे म्हणता येत नाही. शिक्षणापेक्षा अनुभवानेच माणसे राजकारणात जागृत व तरबेज बनू शकतात. तसेच सुशिक्षित माणसालाच मताचा अधिकार हे तत्व स्वीकारले तर ज्या देशात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. तेथे लोकशाहीचा केवळ प्रयोग करून सुशिक्षित अशा थोड्यालोकांची बहुसंख्याकावर जुलूमशाहीच सुरू होईल आणि मिलचा मुख्य हेतू व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिविकास हाच नष्ट होऊन जाईल.

वरील प्रमाणे मिलच्या प्रातिनिधीक शासनपध्दतीच्या विचारांवर टीका होत असली तरी ही टीका काहीशी एकांगी स्वरूपाची वाटते. कारण आजच्या लोकशाही पध्दतीमधील निवडणूक पध्दतीपेक्षा मिलची प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची पध्दती अत्यंत उपयुक्त व श्रेष्ट दर्जाची आहे हे कोणीही नाकारणार नाही. स्त्रियांना मतदानाचा अधिकार असावा. अल्पसंख्यांक लोकांना प्रतिनिधित्व मिळावे, सुशिक्षित लोकांनीच मतदान करावे हे मिलचे विचार त्याच्या विद्वत्तेचे व दूरदृष्टीचे द्योतकच मानावे लागतील. मिल केवळ सुशिक्षित लोकांना मतदानाचा अधिकार द्यावा असे म्हणून थांबत नाही, तर तो त्यांना शिक्षित करण्याचे उपायही सुचवितांना दिसतो. म्हणून मिल हा लोकशाहीचा विरोधक नसून तो लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे असे डेव्हिडसन यांनी म्हटले आहे. लोकशाहीतील धोके ओळखून त्यावर मार्गदर्शन केले आहे. लोकशाहीच्या मार्गाने व्यक्तिस्वातंत्र्याची जोपासना होऊन लोकांना सुखी व समाधानी जीवन जगता येईल अशी मिलची धारणा होती.

लोग तुम्हारे स्वाभिमान की
तब तक परवाह नहीं करेंगे
जब तक कि तुम खुद को
साबित करके नहीं दिखा देते।
– रतन टाटा



अगर आप तेजी से चलना
चाहते हैं तो अकेले चलिए।
लेकिन आप दूर तक चलना
चाहते हैं तो साथ मिलकर चलिए।
– रतन टाटा





हम जो करते है
और हम जो कर
सकते हैं,
इसके बीच का
अंतर दुनिया
की ज्यादातर
समस्याओं के
समाधान के लिए
पर्याप्त होगा।
– महात्मा गांधी

# समाज जीवनाचे सहसंबंध व पर्यावरण

गिरीश बाळू शेंगाळ
द्वितीय वर्ष कला

**प्रस्तावना :**

पर्यावरण विषयक विविध संकल्पना या विषयीच्या विवेचनावरून पर्यावरण व समाज यांच्यातील संबंध हा घटक यापुढे प्रदर्शित केला जाणार आहे. मानवी समाज, तंत्रज्ञान पर्यावरण हे सध्या परवलीचे प्रचलित शब्द आहेत. या सगळ्या संज्ञांचा निश्चित अर्थ, त्यांचा परस्पराशी असणारा संबंध याविषयी विस्तृतपणे विवेचन करणे पर्यावरणाच्या अभ्यासात महत्वाचे असते.

पर्यावरणाची नैसर्गिक चौकट मानवी क्रियांनी, तंत्रज्ञानाने ओलांडली जात आहे. याचा समाजावर तसेच पर्यावरणावर काय परिणाम होईल, याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मानव व मानवी समाज पर्यावरणात विकसित होते गेले. विकासाची वाटचाल करताना मानवी समाजाने पर्यावरणातल्या इतर जैविक व अजैविक घटकांची शास्त्रीय दखल न घेतल्यामुळे काय परिणाम होत आहे यांचे विवेचन करता होईल.

**⁂ पर्यावरण व समाज परस्परसंबंध :**

पर्यावरण ही संज्ञा मुलत: म्हणजे सभोवतालची परिस्थिती या अर्थाने प्रचलित आहे. जीवशास्त्रीयदृष्ट्या सजीवांच्या सभोवतालच्या परीस्थितीला पर्यावरण असे म्हणतात. सजीवांमधील वनस्पती प्राणी व सूक्ष्मजीव यांच्यात मानवप्राणी बुध्दी, कल्पनाशक्ती, वाचाशक्ती यांच्या जोरावर श्रेष्ठ ठरत असल्याने मानव आणि पर्यावरण यांच्यातील संबंधांना जास्त महत्त्व प्राप्त होते.

नैसर्गिक पर्यावरणात मानवेतर प्राणी, वनस्पती व सूक्ष्मजीव त्यांच्या सभोवताली असणाऱ्या पर्यावरणात नैसर्गिकपणे जीवन जगतात. नैसर्गिक तत्त्वे, चक्रप्रणाली यांच्यात बाधा न आणता इतर सजीवांचा जीवनक्रम अनादिकाळापासून सातत्याने चालू आहे. नैसर्गिक कारणांनी पर्यावरणात होणारे बदल सोडले तर इतर सजीवांचा पर्यावरणात बदल घडवून आणण्यात कोणताही सहभाग नाही. मानवेतर सजीव नैसर्गिक तत्वांना अनुसरून निसर्गाच्या चौकटीत जीवनक्रम पूर्ण करतात. नैसर्गिक पर्यावरणात बदल घडवून आणण्याइतपत इतर सजीवांची क्षमता नसल्यामुळे निसर्गाचा एक घटक म्हणूनच ते जीवनक्रम पूर्ण करतात. याउलट मानव मात्र नैसर्गिक पर्यावरणात आहे त्या स्थितीत न राहता सुख-सुविधा, विकास, उपभोग यांच्या नावाखाली सातत्याने सभोवतालच्या परिस्थितीत ढवळाढवळ करत आला आहे.

मानवाचे पृथ्वीवरील अस्तित्व सुमारे १० ते २० लाख वर्षापासून आहे. काळाच्या ओघात मानवी समाजाची उत्क्रांती होत गेली. शेतीतंत्राचा शोध लागेपर्यंत मानवाचे जीवन भटके व अस्थिर स्वरूपाचे होते. इतर प्राण्यांप्रमाणे मानवी समुह पर्यावरणाच्या आवाक्यातच मूलभूत गरजांची पूर्तता करीत असत. मानवाचे निसर्गविषयक ज्ञानही मर्यादित होते. शेती तंत्रज्ञानानंतर मात्र मानवी संस्कृतीच्या उत्थापनाला सुरूवात झाली. नंतर मानवी समाजाच्या विकासात संशोधन, औद्योगिक क्रांती, आधुनिकीकरण, नागरी क्रांती, स्थानांतरे, तंत्रज्ञानात्मक क्रांती असे विविध टप्पे बघायला मिळतात. या सर्वांचा पर्यावरणाच्या एकूण स्वरूपावर विघातक दुष्परिणाम झाला.

जीवन जगताना समुहाने राहणे ही सजीवांची सहजप्रवृत्ती आहे. या सहजप्रवृत्तीतुनच समुह, समुहातून समाज निर्माण झाले. निसर्गात सजीवांची उत्पत्ती झाल्यावर एकाच प्रकारच्या सजीवांचे समूह किंवा समाज बनले याला जीवसमाज किंवा जैवसमान इतर जीवसमान असे म्हणतात. हे मुलत: जैविक क्रिया मूलभूत गरजांची पूर्तता या दृष्टीने कार्यरत असतात. मानवी समाज मात्र याशिवाय आंतरक्रिया, सहकार्य, सामाजिक बंधने, विकास, सांस्कृतिक वाटचाल या दृष्टीने इतर जैविक समाजापेक्षा वेगवेगळेपणाने कार्यरत असतो. पर्यावरण व जैविक समाज यांचा परस्परसंबंध हा निसर्गाच्या तत्वांप्रमाणे विकसित होतो. डार्विनच्या मतानुसार जैविक समाजाच्या या विकसनाला किंवा काळाच्या ओघात झालेल्या वाटचालीला जीवांची उत्क्रांती असे म्हटले आहे. मानवी समाज मात्र याला अपवाद ठरतो. नैसर्गिक उत्क्रांतीबरोबरच मानवी समाजाची सांस्कृतिक वाटचाल किंवा सामाजिक उत्क्रांती होत असते. मानवी समुहाचे आंतरसंबंध, देवाण-घेवाण, क्रिया-प्रक्रिया यांचे दूरगामी परिणाम पर्यावरणावर होत असतात. सामाजिक उत्क्रांती होत असताना नैसर्गिक पर्यावरणाचा सर्व काळ विचार झाला नाही. मानवी समाजांनी नैसर्गिक पर्यावरणाकडे किंबहुना दुर्लक्षच केले. सजीवांची उत्क्रांती व सामाजिक उत्क्रांती या बाबतीत इतर सजीवांप्रमाणे मानवी समाज निसर्गतत्वांना झुगारत भरकटत गेले. लोभ, स्वार्थ, उपभोग या मानवी प्रवृत्ती नैसर्गिक पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारण ठरल्या आहेत.

**तंत्रज्ञात्मक बदलांचे परिणाम :**

आधुनिक युगात तंत्रज्ञानात वेगवान बदल होत असल्याने त्यांचे पर्यावरणावरील परिणाम लक्षात घेण्याची गरज निर्माण झाली आहे. सध्याच्या वैश्विक स्तरावरच्या तसेच प्रादेशिक स्तरावरच्या पर्यावरणीय समस्यांची उकल करताना तांत्रिक परिवर्तनांचा मोठा वाटा आहे, असे वैज्ञानिकांची सिध्द केले आहे. उदारणार्थ सध्या पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे. ही घटना हरितगृह परिणामातील अभ्यासात महत्वाची आहे. कार्बनडाय आक्साईड, मिथेन, क्लोरोप्लूरो कार्बन,

सल्फरडाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड या वायुंचे औद्योगिकीकरणामुळे वातावरणातील प्रमाण वाढत असल्याने वातावरणात उष्णता साठून राहण्याची प्रवृत्ती वाढते आहे. या विषयावर शास्त्रीय संशोधन करून नियंत्रणाचे मार्ग स्वीकारले नाहीत तर येत्या ५० वर्षात शास्त्रज्ञांच्या मते पृथ्वीच्या तापमानात १.४ ते ५.० अंश सेल्सिअस एवढी वाढ होऊ शकेल व समुद्रकिनाऱ्यावर सागरपातळी वाढल्याने वस्त्या, मानव, प्राणीसंपदा यांना धोका निर्माण होणार आहे. हरितगृहे वायुंमध्ये कार्बन–डाय ऑक्साईडचा सहभाग ५० टक्कांपेक्षा जास्त आहे. याचे कारण प्रचंड वेगाने होणारे औद्योगिकीकरण व नागरीकरण वातानुकुलित यंत्रे, शीतयंत्रे (रेफ्रिजरेटर), रासायनिक उत्पादने (उदारणार्थ रंगाचे उद्योग) यामुळे क्लोरोफ्लुरोकार्बन वातावरणात मिसळतात. यांना सीएफसी म्हणतात सीओटू पेक्षा सीएफसी चा वातावरणातील परिणाम सहस्त्रपटींनी हानिकारक ठरतो. सीएफसी हे ओझोनच्या नाशास कारण ठरले आहेत व ओझनचा नाश हा मानवासहित संपूर्ण जीवसृष्टीला विघातक आहे, ओझोनच्या नैसर्गिक कवचामुळे सौरप्रणालीतील अतिनील किरणे (अल्ट्राव्हायोलेट किरणे) रोखली जातात व सजीवांचा बचाव होतो. ओझोनच्या थराला म्हणून ओझोन कवच म्हटले आहे. तंत्रज्ञानातील शोधांनी या नवीन वायुंची निर्मिती केली व वातावरणात या वायुंचा ओझोनला मारक असा प्रवाह सुरू झाला.

मोलेना व रोलॅड या शास्त्रज्ञांनी सर्वप्रथम ओझोन वायुच्या ऱ्हासाची कारणमीमांसा १९७४ साली शोधून काढली. यात क्लोरिन व ब्रोमीन हे अतिशय वातावरणात जास्त शक्तिशाली होतात. व ओझोनच्या अणुंचा नाश करतात हे सिध्द झाले. हिवाळ्यात अंटाक्ट्रिकावर जी अतिशीत वायुराशी तयार होते. त्यामुळे ओझोनचा नाश वेगाने झाल्याचे उपग्रहीय छायाचित्रावरून सिध्द झाले. या विषयी १९८५ व १९८७ मध्ये व्हिएन्ना व नॉट्रियल आंतरराष्ट्रीय करार करण्यात आले. आम्लपर्जन्य ही पर्यावरणीय समस्या औद्योगिक क्रांतीनंतर युरोप व अमेरिकेत प्रकट झाली. वातावरणात सोडले जाणारे वायू पावसाच्या पाण्यात मिसळल्यावर या पासून सौम्य आम्ले तयार होतात व त्यांचा घातक परिणाम वने, मृदा, प्राणिजीवनावर होतो. हरीतक्रांती ही शेतीव्यवसायातील तंत्रज्ञानात्मक बदलांची नांदी म्हणावी लागेल. शेतीच्या तंत्रज्ञानात्मक बदलात रासायनिक खतांचा वापर, जलसिंचनाची मुबलकता, एकपीक पध्दती यामुळे जमिनीचे क्षारकरण, निकृष्टतेकडे वाटचाल या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. महाराष्ट्रात १९६० नंतर साखर उद्योगांचा विकास झपाट्याने झाल्यावर ऊस ही एकच पीकपध्दती जमिनीची गुणवत्ता टिकवण्याबाबद घातक सिध्द झाली. नगर, सांगली, नाशिक या जिल्ह्यात क्षारजमिनीचा प्रश्न निर्माण झाला. अशाच प्रकारची परिस्थिती उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, बिहार या राज्यामध्ये झाली. रासायनिक खतांमुळे तात्पुरत्या उत्पन्नात वाढ होते पण जमिनीचा कस मात्र कमी होत जातो. पर्यायाने शेतीचे नुकसान होते. वातावरणातील कार्बन–डाय ऑक्साईडचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी वनीकरण हा महत्वाचा उपाय आहे. शासकीयदृष्ट्या एक तृतीयांश भूक्षेत्र हे वनांखाली असावे लागते. पण भारतात हे प्रमाण ७ टक्क्यांपेक्षा खाली गेले आहे. ही गंभीर समस्या आहे.

तंत्रज्ञानात्मक विकासाबरोबर जंगलतोड किंवा निर्वनीकरण वाढत गेले. परिणामी नैसर्गिक वनसंख्या, परिसंख्या यांचे संतुलन बिघडले आहे. प्राण्यांची वसतिस्थाने अरूंद होत आहेत. बरेचसे प्राणी त्यांच्या जाती व विजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. परिसंस्थेतील हे घटक अशा पद्धतीने नष्ट झाल्यामुळे निसर्ग चक्रांमध्ये अडथळे निर्माण होत आहेत व पर्यावरणाच्या आरोग्याचा ऱ्हास होत आहे.

संगणकाच्या आगमनामुळे संगणक क्रांतीचे पर्व सुरू झाले. मोठी सांख्यिकी माहिती तिचे सारणीकरण, पृथक्करण या सुविधा निर्माण झाल्या व निष्कर्षासाठी वेळेची बचत होऊ लागली आहे. दुसरीकडे मात्र व्यवसायाच्या स्त्रोतांवर परिणाम होत आहे.

शेती उत्पादन वाढविण्यासाठी कीटकनाशके, जंतूनाशके यांचा वापर वाढला त्यामुळे मानवाच्या अन्नसाखळीत विषारी पदार्थाचा शिरकाव झाला, तसेच मृदा प्रदूषणाची समस्या वाढली या नाशकांच्या फवारणीचे तंत्र, मात्रा याविषयी जागरूकता नसल्याने भूप्रदूषणात व मानवी आरोग्याच्या घातक परिणामात वाढ झाली आहे. रासायनिक विषारी फवारणी केल्यानंतर त्याचा परिणाम हा दीर्घ काळ टिकणारा असतो. विषारी अपद्रव्यांचे विघटन होत नाही परिणामी संपूर्ण परिसंस्थेचा तोल बिघडतो.

भारतात स्वातंत्र्योत्तर काळानंतर शेतीउत्पादनाच्या तंत्रज्ञानावर भर देण्यात आला. अतिजलसिंचन, जंतूनाशके, कीटकनाशकांचा अतिवापर यांचे कृषिक्षेत्रात विपरीत परिणाम होत आहेत.

पर्यावरणातील भूमी, जल, वायू, खनिजे, वनस्पती व प्राणी या प्रमुख घटकांचा मानवाचे पुरेपूर वापर करण्याचा सतत प्रयत्न केला. मानवी समाजाची उत्क्रांती व्हायला हजारो वर्षे लागली यातला मोठा काळ हा पर्यावरणीय चौकटीत निसर्गतत्वांना अनुसरून मानव जीवन जगताना शेतीचे तंत्र शोधून काढल्यानंतर मात्र तंत्रज्ञानाची वाढ वेगाने होऊ लागली व मानव पर्यावरण यांचा संबंध अधिक दृढ झाला. पर्यावरणीय घटकांचा जसा मानवी जीवनावर प्रभाव असतो, तसाच मानवी घटकांचा पर्यावरणावर परिणाम होत असतो. गेल्या पाचशे वर्षात ज्ञानतंत्रानाची क्षेत्रे विस्तारल्यामुळे मानवी समाजाचा पर्यावरणातील हस्तक्षेप वेगाने वाढला. मानव आणि संपदा यांच्या गुणोत्तरात लोकसंख्यावाढ हा घटक जगाच्या काही भागात परिणामी ठरला.

अविकसित व विकसनशील देशांत लोकसंख्यावाढ वेगाने झाली. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनामुळे मृत्युदरात घट झाली व जन्मदर मात्र त्या मानाने कमी झाला नाही. परिणामी लोकसंख्यावाढीचा दर वाढला. घटत्या लोकसंख्येचा मूलभूत संपदांवर ताण पडू लागला. त्यातुनच पर्यावरणाचे अवमूल्यन सुरू झाले. राहणीमानाचा दर्जा घसरणे, आर्थिक ताणतणाव, बेकारी, दारिद्र्य, स्थलांतरे यामुळे मानवी समाजाला विविध समस्यांना तोड द्यावे लागले. लोकसंख्यावाढीमुळे दारिद्र्य व दारिद्र्यामुळे लोकसंख्या वाढ असे दुष्टचक्र सुरू झाले. तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या समस्या गंभीर स्वरूप धारण करू लागल्या. याउलट विकसित व प्रगत राष्ट्रांत पर्यावरणाच्या अवमूल्यनाबरोबरच सामाजिक अवमूल्यनाचा परिणाम जाणवू लागला आहे. पाश्चात्य संस्कृतीचे आधुनिक काळातील उदाहरण फार बोलके आहे. या राष्ट्रांमध्ये समाजसंस्था, कुटुंबसंस्था ही समाजाची एक मूलभूत चौकट आहे. भारतासारख्या देशात ती आजही तग धरून आहे. पण पाश्चत्य राष्ट्रांत मात्र कुटुंबसंस्था पूर्ण मोडकळीला आल्यामुळे वेगळेच सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत. कायदेशीर विवाहाचे प्रमाण कमी होणे, मुक्त जीवन, स्वच्छंदी व उपभोगी वृत्ती, लैंगिक अनाचार, लैंगिक स्वातंत्र्य यामुळे कुटुंब, कुटुंबाची जबाबदारी याविषयी नकारात्मक भूमिका घेतली जाते. परिणामी जन्मदर घटला आहे. मृत्यूदरही कमी झाला आहे. जन्म व मृत्यूदर यांच्यात फार फरक नसल्याने शून्य लोकसंख्यावाढ हा प्रगत राष्ट्रांतला नवीन प्रश्न निर्माण झाला आहे. पर्यावरणीय संपदांच्या विकासासाठी मनुष्यबळ कमी पडत आहे. फ्रान्स , स्वीडन, जर्मनी या देशात सरकार लोकसंख्यावाढीसाठी जनतेला प्रोत्साहन देत आहेत. त्याचाही अपेक्षित तेवढा परिणाम होत नाही, असे दिसून आले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे व्यक्ती, कुटुंब, समाज यांच्यातील अनुबंध जाणून घेतले जात नाहीत, असे दिसून आले आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, समाज स्वातंत्र्य, उपभोगी वृत्ती यांमुळे सामाजिक बंधनांची पकड ढिली झाली. पर्यायाने मानवा मानवातील संबंधात विकृती निर्माण झाली. समाज व पर्यावरण या विषयीची बांधिलकी हा फार लांबचा टप्पा आहे. पर्यावरणाकडे फक्त संपदा म्हणून बघण्याचा दृष्टिकोन संकुचित स्वरूपाचा आहे.

सध्याचा मानवी समाज पर्यावरणातील संपदांचा वापर करताना फक्त स्वत:च्या हक्कांचा विचार करतो. पर्यावरणीय दृष्टिकोनातून मात्र हे पूर्णत: विसंगत आहे. या संपदांचा, तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा जसा सध्याच्या पिढीला अधिकार आहे, त्याप्रमाणेच मानवाचे जैविक सहचारी वनस्पती व प्राणी यांनाही तेवढाच अधिकार आहे. शिवाय येणाऱ्या भावी पिढ्यांसाठी प्राकृतिक पर्यावरण व सांस्कृतिक पर्यावरण निकोप ठेवण्याची मोठी जबाबदारी सध्याच्या पिढीवर व तिच्या तंत्रज्ञानात्मक वाटचालीवर आहे. प्रत्यक्षात मात्र यापेक्षा चित्र फार वेगळे आहे. पर्यावरणाच्या आरोग्याचे भान न ठेवता केवळ विकास, अल्प काळातील फायदे, स्पर्धेतील विजय, अतिभोगी वृत्ती यांवर भर दिला जात आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, मानवी समाजाच्या या दुर्लक्षितपणाची किंमत भावी काळातल्या पिढ्यांना नक्कीच मोजावी लागेल. त्यासाठी मानव आणि पर्यावरण यांच्यातील सुसंवाद वाढवणे गरजेचे आहे.



अपने ज्ञान पर जरुरत से अधिक यकीन करना मूर्खता है। यह याद दिलाना ठीक होगा कि सबसे मजबूत कमजोर हो सकता है और सबसे बुद्धिमान गलती कर सकता है।

- महात्मा गांधी



अपने मिशन में कामयाब होने का सिर्फ एक ही रास्ता है, किसी भी काम को पूरी लगन के साथ करो।

- डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम

किसी भी देश के पतन का कारण उस देश के युवा होते हैं जो कहते हैं कि राजनीति कीचड है, अक्षर राजनीति कीचड है तो उसे साफ करने का दायित्व भी उस देश के युवाओं पर हैं।

- चाणक्य

# ॲथेन्सची लोकशाही आणि सॉक्रेटिस



कु. पुष्पा इंद्रभान धिंदळे
द्वितीय वर्ष कला

**जीवन परिचय :**

सॉक्रेटिसचा काळ इसवी सन पूर्व ४६९ हा आहे. ग्रीकमधील ॲथेन्स नगरज्यात तो राहत असे. प्लेटोचा गुरु म्हणून सॉक्रेटिस प्रसिध्द आहे. पाचव्या शतकातील या विचावंताने आपल्या विचाराने आपले नाव अजरामर केले आहे. तत्वज्ञानाच्या क्षेत्रात सॉक्रेटिस इतकी प्रसिद्दी अन्य कोणालाही मिळाली नाही. अडीच हजार वर्ष सॉक्रिटिसच्या नावाभोवती वलय आहे. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची, वैचारिक योगदानाची दखल अडीच हजार वर्षानंतरही घेतलेली आहे. त्याची राहणी अगदी साधी. साधे कपडे वापरून अनवाणी पायाने तो हिंडत असे. शरीराने घट्टाकट्टा, बोजड व बसके नाक आणि बटबटित डोळे व पाठीला कुबड यांमुळे तो कुरूप दिसत असे.

'ग्रीक तत्वज्ञानाचा निर्माता',शहाणा माणूस असे कार्ल मार्क्सने सॉक्रेटिसचे वर्णन केले आहे. सॉक्रेटिस स्वत:च्या विद्वत्तेच्या कोशात कधीच रममाण झाला नाही. त्याने स्वत:बदल दैवतुल्य प्रतिमा होऊ दिली नाही. गुढ वलय निर्माण होऊ दिले नाही. त्याचे वागणे, बोलणे, विचार मांडणे सर्व काही मानवी होते. मात्र ते तेजस्वी व स्पष्ट होते. तो ऋषिप्रमाणे राहिला नाही. तो समाजप्रिय विचारवंत होता. या स्वभाव वैशिष्ट्यांमधून सॉक्रेटिसचे थोरपण दिसते.

सॉक्रेटिस एकदा डेल्फी येथील अपोलो देवाच्या मंदिरात गेला. देवळाच्या भिंतीवर एक वाक्य होते. नो दाय सेल्फ (स्वत:ला समजून घ्या, स्वत:स जाणा ) गौतम बुध्दांच्या 'अस्त दीपो भव', 'स्वत:च स्वत:चा दीप व्हा!' या अर्थासारख्या वाक्याने सॉक्रेटिसच्या आयुष्याला कलाटणी मिळाली आणि तो मानवी समस्यांबद्दल विचार करू लागला. त्याने निसर्गशास्त्रांचा अभ्यास बाजूला सारला आणि नैतिक तत्वज्ञानावर लक्ष केंद्रीत केले. नंतर सॉक्रेटिसने मानवी समस्या व मानवाचा स्वभाव यांचा अभ्यास म्हणजे अपोलो देवाची साधना असे मानले. डेल्फीच्या देवतेने असा कौल दिला की सॉक्रेटिस सर्व माणसांत शहाणा आहे.

सॉक्रेटिसची अभ्यासपध्दती तर्कशुध्द, वास्तववादी व संवादात्मक स्वरुपाची होती. संवाद पध्दतीने तो समोरच्या माणसांशी, विद्यार्थ्यांशी निरनिराळ्या विषयावर चर्चा करी आणि ती ऐकावयास भोवताली नागरिक जमत. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारित त्यांच्या मेंदूला चालना देत त्यांच्या ज्ञानात भर घालीत असे. या पध्दतीला 'सॉक्रेटिस मेथड' असे म्हणतात. ती आधुनिक काळातील शाळांमध्ये चालू ठेवण्याच्या पात्रतेची आहे.

ज्याप्रमाणे दाई स्त्रीला बाळंत सुलभ होण्यासाठी फक्त मदत करते, प्रत्यक्षात वेदना सहन करणे व बाळाला जन्माला घालण्याचे कार्य ती माताचा करते. त्याचप्रमाणे सॉक्रेटिस संवाद पध्दतीने विद्यार्थ्यांच्या ओबडधोबड विचारांतून सिध्दांत काढण्याचा प्रयत्न करतो. विद्यार्थ्यांजवळ नवीन कल्पना असतील तर त्या बाहेर काढण्याचे वैचारिक दाईचे काम सॉक्रेटिस करतो.

सॉक्रेटिसने युध्दांत पायदळातील सशस्त्र सैनिक म्हणून भाग घेतल्याची नोंद आहे. त्याने तीन मोठ्या लढायात आपल्या शौर्याचा चिवटपणाचा पुरावा दिला आहे. प्लॅटो, झेनेफॉन ॲरिस्टॅटल यांनी सॉक्रेटिमध्ये विचार ग्रंथीत केले म्हणून आज आपल्याला सॉक्रेटिसचे विचार समजून घेता येतात.

**अथेन्सची लोकशाही :**

सॉक्रेटिसचे ॲथेन्सवर प्रेम होते. तो देशभक्त होता या निष्ठेपोटी देशाचा कारभार नीट चालावा, देशाचा नाव लौकिक वाढावा या उद्देशाने तो अथेन्समधील लोकशाही दोषी पध्दतीवर कठोर टीका करतो.

अन्य ग्रीक नगराज्यांच्या तुलनेत सॉक्रेटिसला ॲथेन्सच्या नागरिकाचे उच्च नैतिक गुणांचा अभिमान होता. पूर्वजांनी दाखविलेल्या अतुलनीय शौर्य, धैर्याची आणि पराक्रमांची तुलनाच होऊ शकत नाही असे तो म्हणत असे.

हा शौर्य धैर्याचा वारसा अथेन्सविरूध्द स्पार्टामधील युध्दात समाप्त झाला. ॲथेन्सला हार पत्कारावी लागली. त्यामुळे अंतर्गत ऐक्य भंग पावून अंतर्गत संघर्षाला सुरूवात झाली. लोकशाहीविरूध्द बंडे झाली. अल्पकालीन महाजनसत्ता दडपण्यासाठी लोकशाहीला अतिरेकी उपाय योजावे लागले. यामुळे संघर्ष अधिक तीव्र बनला. लोकशाही विरोधी लोक जे होते त्यांनी ॲथेन्सच्या पराभवाला, अंतर्गत संघर्षाला लोकशाहीच जबाबदार आहे असा आरोप करण्यास प्रारंभ केला. सॉक्रेटिसने मात्र सर्व दोष लोकशाहीला दिला नाही. नागरिकांच्या नैतिक दर्जामध्ये झालेला भ्रष्टाचार पराभवाला कारणीभूत झाला. नागरिकांनी कर्तव्यांकडे दुर्लक्ष केले. लष्करी व नागरी कारभारात आज्ञाभंग होऊ लागलेत, म्हणून ॲथेन्सला मानहानीकारक पराभव सहन करावा लागला असे विश्लेषण सॉक्रेटिस करतो.

सॉक्रेटिसची तीव्र इच्छा होती की, ॲथेन्सवासियांनी परिश्रम करून पुन्हा ॲथेन्सला श्रेष्ठत्व प्राप्त करून घ्यावे. यासाठी आपल्या शत्रू देशातील काही चांगल्या गुणांची नक्कल करण्यास हरकत नाही असे सॉक्रेटिसने सांगितले. सॉक्रेटिसचे हे आवाहन देशद्रोही स्वरूपाचे नव्हते तर तो उपदेश सौम्य व शहाणपणाचा होता.

सॉक्रेटिसच्या मते अॅथेन्सच्या राजकीय व्यवस्थेत झालेल्या चुका सुधारण्याची आणि पुन्हा गतवैभव प्राप्त करून घेण्याची क्षमता आहे. लोकशाही पध्दतीत चुका होतात पण चुका लक्षात आल्या बरोबर दुरुस्त करण्याचीही क्षमता असते. अन्य राज्यप्रकारातही चुका होतात पण त्या दुरूस्त करण्याची अंतर्गत व्यवस्था नसते.

सर्व नागरिकांचे मत समान लायकीचे असते म्हणून चिठ्ठ्या टाकून कोणालाही कोणत्याही पदावर बसावावे ही अथेन्समधील प्रशासनाची पध्दत सॉक्रेटिसला अमान्य होती. प्रत्येक पदासाठी पात्रता, प्रशिक्षण, नैतिक भूमिका असली पाहिजे असे त्याचे मत होते.

### राज्याप्रती नागरिकांचे कर्तव्य व कायद्याची श्रेष्टता:

सॉक्रेटिसच्या मते प्रत्येक नागरिक स्वेच्छेने राज्यव्यस्थेत सहभागी होतो. त्यामुळे राज्याचे कायदे व पध्दती बिनशर्त पाळणे त्याचे नैतिक कर्तव्य बनते. युरोपियन राजकीय विचारात नंतर हॉब्ज, लॉक, रुसो यांनी राज्याचा उत्पत्तीचा सामाजिक करार सिध्दांत मांडला. या सिध्दांताची बीजे प्रथम आपल्याला सॉक्रेटिसच्या तत्त्वज्ञानात सापडतात. व्यवस्थेत स्वत:हून सामील होणाऱ्यांना व्यवस्थेची बंधने पाळावी लागतात. ही नैतिकता आहे असे सॉक्रेटिस म्हणतो. राज्यात रहायचे तर कायदे पाळलेच पाहिजेत, राज्यावर निष्ठा ठेवलीच पाहिजे.

कायदे पालनासंबंधिची ही अविभाज्य निष्ठा सॉक्रेटिसच्या जीवनाची आणि मृत्यूचीही कथा विशद करते, ग्रीक नगराज्यात सॉक्रेटिसचा हा विचार पक्का रुजला होता. सुव्यवस्थित व न्याय राजकीय जीवनाचा आधार कायदा हा आहे असे सर्वत्र मान्य झालेले होते.

### नागरिकांचे स्वातंत्र्य :

सॉक्रेटिसची पारंपरिक नगरज्यांवर निष्ठा होती. मात्र तात्कालीन मोठ्या व्यापक राज्यकल्पेनचाही त्याने चिकित्सक विचार केला आहे. राज्य मोठे असावे असा विचारप्रवाह लोकप्रिय होऊ लागला होता. त्याचप्रमाणे नागरिकांवर कठोरपणे नगरराज्यांनी बंधने लादू नये, त्यांना विविध राज्यांत मुक्त संचार करण्याचा अधिकार असावा असाही विचार रुढ होवू लागला होता.

स्वतंत्र नागरिकांचे कर्तव्य आहे की राज्य ज्ञान आणि न्याय कायदे यांच्या आधारे चालत आहे. हे पाहणे असे सॉक्रेटिस म्हणतो. ज्ञान व न्याय यांच्या मार्गावरच मानवाला स्वातंत्र्याचा लाभ होईल. सॉक्रेटिस म्हणतो की स्वातंत्र्य हे व्यक्तिला व राज्याला फार मूल्यवान आहे. स्वतंत्र वागणे म्हणजे बुध्दीचा वापर करून शक्य तितक्या परीने चांगले राहणे. आत्मसंयम राखणे. आत्मनियंत्रण संपुष्टात आले की माणूस त्याच्या मूळ पशुतुल्य इच्छा भावनांच्या ताब्यात जातो. नीतीपासून दूर जाऊन आत्मकेंद्रीत व स्वार्थी बनतो व स्वीकारलेली सर्व बंधने मोडून टाकतो. त्याचे जीवन गुलामाप्रमाणे बनते व राज्यात अव्यवस्था, अराजक निर्माण होते. नागरिकत्वाची बंधने माणूस मानत नाही. त्यामुळे राज्य दुर्बल बनते.

### शिक्षण- प्रशिक्षणा विषयी विचार :

प्रत्येक व्यक्तीने बुध्दिवान असो की अडाणी आपल्याला कोणते काम करावयाचे आहे हे ठरवून त्यासंबंधीचे शिक्षण घ्यावे असे सॉक्रेटिस म्हणतो. राजकारणी लोकांनाही प्रशिक्षण आवश्यक आहे. त्यांना जर व्यवस्थित प्रशिक्षण दिले गेले नाही तर ही माणसे राज्याची हानी करतात कारण ती बुध्दीमान असल्यामुळे निरंकुश आत्मकेंद्रित लहरी होण्याची शक्यता असते. मात्र प्रशिक्षणामुळे राज्यकारभार कसा करावा याची कला अवगत होते व तशी नीतिमत्ता असलेले राज्यकर्ते लाभले तर नागराराज्यांचे प्रचंड मोठे कल्याण साधले जाते.

ज्ञानाच्या व नीतीच्या आधारे नगर राज्याचा कारभार झाला तर तेच लोकांच्या इच्छांचे सार्थक ठरते व त्यातून लोककल्याण साधते असे सॉक्रेटिसच्या तत्वज्ञानाचे मूळ सूत्र आहे. शिक्षण, प्रशिक्षणांवर त्याचा फार मोठा भर होता. देवापेक्षा शिक्षण, प्रशिक्षणापासून चांगली फलप्राप्ती होते असे सॉक्रेटिस म्हणतो.

### सॉक्रेटिसचे राजकीय प्रबोध:

सॉक्रेटिस स्वत: प्रत्यक्ष राजकारणापासून अलिप्त होता. मात्र त्याला राजकीय घडामोडीमध्ये फार स्वारस्य होते. मतप्रदर्शन करून राजकीय घडामोडींना चांगली दिशा लागावी यासाठी सॉक्रेटिस जागृत होता. त्याच्या सर्व तात्विक व राजकीय प्रबोधनाचा हेतू नागरिकांना शिक्षण देणे हा होता.

ज्यांना राजकीय क्षेत्रात सत्तेच्या राजकारणात जीवन व्यतित करायचे त्यांनी आत्मसंयम हा गुण अंगी बाणविला पाहिजे. राज्य करणे ही चैनीची, आनंदाची गोष्ट नाही तर सर्वांचे कल्याण साधण्यासाठी सत्ता वापरावयाची असते. असे सॉक्रेटिस सांगतो. जे राज्यकर्ते स्वार्थी असतात, त्यांना शिक्षा करावी असे सॉक्रेटिस म्हणतो. राज्यकारभार चालविणे ही सर्वश्रेष्ठ कला आहे. त्यामुळे राज्यकर्त्यांमध्ये नीतिमत्ता रुजावी असा त्याचा आटोकाट प्रयत्न होता. न्याय, कायदे पालन, चांगले शासन यांच्यासंबंधी तो सातत्याने आपले विचार मांडित राहिला. त्यामुळे तात्कालीन राज्यकर्त्यांशी त्याचे नेहमी खटके उडत. लोकशाहीप्रिय राज्यकर्तेही नाराज आणि झोंटिगशाही राज्यकर्तेही नाराज असत. सॉक्रेटिस लोकांना विशेषत: युवकांना जागृत करीत होता. त्यामुळे राज्यकर्त्यांनी अखेर त्याला विष प्राशन करण्यास भाग पाडले.

सॉक्रेटिसच्या मृत्यूमुळे अॅथेन्सवासियांना मोठा धक्काच बसला. नागरिकांची खात्री झाली की सॉक्रेटिसवर खटला भरणाऱ्यांनी आपली फसवणूक केली. या खटल्यात सामील असणाऱ्यांवर मग जनतेच्या न्यायालयात खटला चालवून काहींना मृत्यूदंड तर काहींना हद्दपारीची शिक्षा देण्यास आली. जनतेने त्यांना शिक्षा दिली तरी सॉक्रेटिसचे प्राण गेले हे दुदैवी सत्य ऐतिहासिक आहे.

# माझी पंढरीची वारी



**धनंजय रमेश मोहिते**
तृतीय वर्ष कला

'याचि देहि याचि डोळा पाहावा हा सोहळा ।'

या ज्या ओळी लिहिल्या आहेत त्या अगदी माझ्याशी तंतोतंत मेळ खातात असं म्हणतात. मनुष्याच्या आयुष्यात एकदा तरी आनंदाचा क्षण येतो. त्याला तो ओळखता आला, जाणता आला आणि त्याचा आनंद मानता आला तर त्याच्या सारखा भाग्यवान तोच नाही का? आणि तोच क्षण माझ्याही आयुष्यात आला. मी तो अनुभवला, जगलो. जगण्याची नवीन दिशा उमगली. वैष्णवांच्या आनंदात विलिन झालो.

हो कारण मी चालतोय पंढरीची वाट. टाळमृदूंगाच्या आवाजात, भगव्या पताकांच्या नृत्यात, तुळशी वृंदावन घेतलेल्या माऊलींच्या संगे, विठू माऊलीच्या जयघोषात. हो मी अनुभवलीय ती वारी, अनुभवलाय तो वैष्णवांचा सोहळा!

'एक तरी वारी अनुभवावी
एकतरी ओवी गुणगुणावी!'

या ओळीप्रमाणे मनुष्याने आपल्या आयुष्यात एकतरी वारी, एकतरी ओवी अनुभवावी, असं म्हणतात. कारण वारीची ताकद काय आहे ती फक्त त्या वारकऱ्यालाच माहीत, कारण तो वारीत चालतो, वारी अनुभवतो. मुखात विठ्ठलाचे नाव आणि विठू माऊलीच्या भेटीची ओढ. सगळे देहभान विसरून तो चालत असतो.

मित्रांनो वारी म्हणजे एक चालते बोलते विद्यापीठच. कारण वारीत खूप काही शिकण्यासारखे असते. वारीत आध्यत्मिक शिक्षण तर मिळतेच पण त्याच बरोबर इतर शिक्षण ही कळत-नकळत होत असतं. माणसाने आपले जीवन कसे जगायचे, आपले आयुष्य किती सुंदर आहे ते कसे जगायचे ते या वारीत शिकता येतं. मी तर म्हणेन ६०, ७० वयातील म्हाताऱ्यांनी नाहीतर २०-२२ वयातील तरूणांनी वारी अनुभवावी. जीवन जगण्याचा अर्थ वयाच्या शेवटी समजण्यापेक्षा तोच अर्थ आयुष्याच्या सुरूवातीला समजला तर किती भारी ना !

चला तर मग अनुभवू या माझी वारी. आमची वारी होती स्वच्छतेची , स्वास्थ्याची, निर्मलतेची आणि निसर्गाची. पुण्यात हडपसर पासून ज्ञानेश्वर महाराज पालखी आणि तुकाराम महाराज पालखी वेगळ्या मार्गाने चालू लागतात. आमचेही दोन गट पाडण्यात आले. हडपसर एक तुकाराम, दुसरा ज्ञानेश्वर. मी तुकारामांच्या दिंडीत चालत होतो. 'स्वच्छ वारी, स्वस्थ वारी' पर्यावरणाचे राखण करी. मनात 'Not me but you' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद वाक्य घेऊन आम्ही निघालो. मनात फक्त वारकऱ्यांची सेवा कारण वारकऱ्याच्या सेवेतच आमचा विठूराया होता. आम्हाला माहीत नव्हतं तो पंढरीचा विठूराय भेटेल की नाय पण त्या वारकऱ्यांच्या मनातील माणुसकीचा विठूराय मात्र आम्हाला भेटत होता आणि तेच आमच्या साठी खूप मोठं होतं. ते मी शब्दातही व्यक्त नाही करू शकत.

जो वारीचा सोहळा मी लहानपणापासून टी.व्ही., वर्तमानपत्र व इतर माध्यमातून बघितला, वाचला होता. कधी वाटतही नव्हतं की आपण पायी एवढ्या लांब दिंडीत चालू. असं वाटायचं की काय या म्हाताऱ्या माणसांना कामधंदा नाही म्हणून दिंडीत येतात. फुकट वेळ वाया घालवतात. परंतु हा माझा खूप मोठा गैरसमज होता, हे मला हडपसर पासून वारीत चालायला लागलो तेव्हा कळालं.

मित्रांनो वारी हे एक शिस्तीचे प्रतिक आहे. शिस्त म्हणजे काय? जर अनुभवायचे असेल तर वारी नक्की करा. सर्व वारकरी एका शिस्तीत, एका रांगेत चालत होते. हातात टाळ, मृदुंग, झेंडे अहो एवढेच काय तर महिला देखील शिस्तीत डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन. सर्व वारकरी नामाचा जयघोष करीत चालत असतात. वेळ कसा निघून जातो हे पण कळत नाही. फक्त विठूरायाला भेटण्याची ओढ.

वारी मध्ये चालताना वारकऱ्यांसोबत कीर्तन, अभंग, गवळणी, भक्तिगीते, भारूड म्हणत म्हणत वेळ कसा जायचा कळायचं सुध्दा नाही. एवढं आम्ही एकमेकांच्या रंगात रंगून जायचो. आणि रोज २०-२५ कि.मी. अंतर कापायचो. वारीचा म्हणजे तुकारामांच्या पालखीचा मुक्काम पहिला लोणी काळभोरला. आम्ही दिवसभर वारकऱ्यांसोबत चालत पालखीच्या पुढे येऊन लोणी काळभोरला पोहचलो. कारण जेव्हा दिंडी गावात येते तेव्हा दर्शनासाठी खूप मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. त्यामुळे आम्ही स्वयंसेवक पालखीला संरक्षण देतो. पण त्या आधी पोचून, तयार होऊन पालखी ज्या रस्त्याने येते तेथे येऊन थांबलो. पालखी गावाच्या वेशीवर येते तो क्षण इतका बघण्यासारखा होता की जसा नदीला पूर यावा, सगळीकडे पाणी पाणी व्हावं आणि ते पाणी समुद्राला जाऊन मिळावं असं ते दृश्य. जणू स्वर्ग या भूतलावर अवतरला असं वाटू लागलं. एवढा मोठा तो लाखोंचा जनसागर, मन एवढं आनंदी झाले की डोळे त्यांवरून हटतच नव्हते. सर्व वारकरी पुरूष सफेद कपड्यांमध्ये तर महिला रंगीत साड्यांमध्ये तुळशी वृंदावन घेऊन. झेंडे, टाळ, मृदुंग यांचा गजर. पालखी फुलांमध्ये सजवलेली. सगळं काही बघण्यासारखं. खरं सागतो एवढा मोठा माणसांचा तो समूह मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच बघितला आणि तो ही चांगल्या कामासाठी, देवाची भक्ती करण्यासाठी. पांडुरंगाला भेटण्यासाठी, नवीन नवीन गोष्टी शिकवण्यासाठी. नाही तर आजकाल आपण बघतो की लोक एकत्र येतात आणि आपल्याच माणसांवर दगडफेक करतात, दंगली करतात पण मित्रांनो वारी अशी आहे की त्यात लाखो लोक फक्त देवाचं

नामस्मरण करण्यासाठी येतात. यांच्यात कोणी ही मोठा-लहान किंवा तो या जातीचा, धर्माचा असा भेद कधीच नसतो. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच माऊली म्हणतात. एकमेकांच्या पाया पडतात. तिथे जात-धर्म असतो तो फक्त माणुसकीचा.

आम्ही पालखीला संरक्षण देऊन गावातल्या मंदिरा-पर्यंत आलो, तेव्हा ग्रामपूजा झाली. नंतर आम्ही पाया पडून आरती घेऊन मुक्कामाच्या ठिकाणी आलो. तेव्हा तिथे आमचे १०-१० जणांचे गट पाडले गेले व ते शेवट पर्यंत होते. त्या गटांनी ज्या ज्या ठिकाणी शौचालयं असतील तिथे जाऊन ते २-३ जणांनी साफ करायचे, तर बाकीच्यांनी कोणी वारकरी बाहेर शौचास जात असेल तर त्यांना नम्रपणे विनंती करून शौचालयाबद्दल जागृती करायची हे काम सुरू झाले. सकाळी उठून सगळं अंथरूण, पालखी स्थळाची साफसफाई करायची आणि तिथून पुढची वाट धरायची. पुढे जाऊन पालखी विसाव्याच्या ठिकाणी वारकऱ्यांसमोर पथनाट्य करायचो.

मित्रांनो, या वारीत पथनाट्याची एक वेगळीच मजा असते. ज्यावेळेस आम्ही पुण्याला जातो दिंडीसाठी तेव्हा दोन-तीन दिवस आम्ही पथनाट्य करतो. पथनाट्याचे जनक म्हणजे आमचे स्वामीदादा भिसे. त्यांना आम्ही दादा म्हणायचो. ते इतक्या छान प्रकारे आमचा सराव करून घ्यायचे की त्या पथनाट्यातून जी गोष्ट आम्हाला वारकऱ्यांसमोर मांडायची आहे ती वारकऱ्यांपर्यंत पोहचायची. थोडक्यात पथनाट्यामुळे एक झणझणीत अंजन वारकऱ्यांच्या डोळ्यांत घातलं जायचं. त्यांनाही ते आवडायचं, पटायचं. एवढंच नाही तर पथनाट्य पाहून वारकरी व्यसन सोडण्याचे वचन द्यायचे, तंबाखू गुटक्याच्या पुड्या आमच्याकडे देऊन पुन्हा कधीही व्यसन करणार नाही हे सांगायचे. एवढंच नाही तर आमचं कौतूकदेखील करायचे. तीच आमच्या सर्व स्वयंसेवकांच्या कामाची पावती असे. पथनाट्याच्या बरोबरच आम्ही भारूड, कीर्तन, गायन करायचो. आमचं मनोरंजन व्हायचं, त्याचबरोबर वारकऱ्यांचे मनोरंजन करून एक संदेश द्यायचो. दुपारच्या वेळी विसाव्याच्या ठिकाणी जेवण करून थोडा आराम केल्यावर पुन्हा पुढची वाट! जेवण पण एवढं चागलं असायचे की सांगायलाच नको. दररोज वेगवेगळे पदार्थ असायचे. आचारी स्वयंपाक करायचे, ते इतके प्रेमळ की घरच्या जेवणाची आठवणही व्हायची नाही. त्यांच्यामध्ये दोन पुरूष आचारी व चार महिला हाताखाली असायच्या. माझी त्यांच्याशी तर इतकी ओळख झाली की जेव्हा अकलुजला मुक्कामी होतो तेव्हा अगदी घरच्यासारखं मी हाताने घेऊन खायचो तरी ते काही म्हणत नसत. उटल भूक लागली असेल लेकराला असे म्हणून खा बाळा म्हणायचे. खूप बरं वाटायचं त्यांच्या बरोबर गप्पा मारून, हसून खेळून राहिलो. विशेष या गोष्टीचे वाटायचं की त्यामध्ये काही आचारी व बायका या मुस्लीम होत्या. त्यांच्या ५-६ वाऱ्या झालेल्या होत्या. त्यांना आपल्यापेक्षा ही जास्त दिंडीबद्दल माहिती होती. आजही मला त्यांची आठवण होते. कधी कधी फोनवर विचारपूस करतात. खूप बरं वाटतं. मनाला समाधान मिळतं की आपण जोडलेली ती नाती आजही आपली आठवण काढतात. वारीमध्ये चालताना काही वारकऱ्यांच्या डोक्यावर बोचके असायचे. एवढा बोजा घेऊन ते वारीत चालत असत. एके दिवशी सर्वात मागच्या दिंडी सोबत चालताना काही वारकरी भेटले, त्यांच्याशी बोलल्यावर असं समजलं की ते विदर्भातून आले होते. आम्हाला त्यांच्या डोक्यावरचं ओझं बघवलं नाही, म्हणून त्यांच्या डोक्यावरचं ते ओझं आम्ही घेतलं व त्यांच्या बरोबर दिंडीत भजन, गवळणी म्हणत चाललो. त्यांना इतकं बरं वाटलं की ते म्हणाले की आमच्यासाठी तुमच्या रुपानं देवच धावून आला. विठूराया तुम्हाला कायमच सुखी ठेवो, हे त्या माऊलीच्या तोंडातून आलेले प्रेमाचे गोडवे आज विसरता येत नाहीत. आम्ही असं काय केलं, त्यांच्या डोक्यावरील थोडंस ओझं आमच्या डोक्यावर घेऊन चाललो, तर त्यांनी एवढी मोठी शाबासकी दिली, कौतूक केलं. देवाची त्या विठूरायाची जागा आम्हाला दिली. यापेक्षा माणसाला हवं तरी काय असतं नाही का? एखाद्याचं सुख-दुःख वाटून घेऊन त्यांच्या सुखात दुःखात सामिल होणे म्हणजे काय हे मला तिथं समजलं.

तुकाराम महाराज पालखीसोबत आम्ही फार अनुभवलं. एवढं मन समाधानी झालं की ते दृश्य आजही डोळ्यात आहे. अगदी मन भरून आलं. वळणा वळणाचा तो घाट आणि वारकऱ्याची गर्दी, आजुबाजुला डोंगरावर बहरलेली हिरवाई, पावसाने लावलेली हजेरी, भिजलेल्या मातीचा सुगंध, हळूच ढगांच्या आडून डोकावलेला सूर्य, पोलिस मित्र आणि आम्ही एन.एस.एस.चे स्वयंसेवकांनी पालखीला दिलेले संरक्षण, पालखी पुढे-पुढे नेण्याची धडपड अगदी सगळं बघण्याजोगं. ज्ञानेश्वर माऊलींच्या दिंडीत दिवेघाटाची मज्जा असते. ते क्षण एवढं अनुभवण्यासारखे असतात की सांगायलाच नको. मित्रांनो एकदा तरी हे दान अनुभवा !

मित्रांनो वारीमध्ये रिंगणाची परंपरा आहे. तुम्हाला प्रश्न पडला असेल की रिंगण म्हणजे काय? तर त्यामागेही एक कहाणी आहे. ती अशी की वारीमध्ये लोकं चालत असतात. चालून-चालून थकतात, कंटाळतात. म्हणून त्यांच्या मनोरंजनासाठी रिंगणाची परंपरा सुरू झाली. यामध्ये एखाद्या मोठ्या स्थळावर गोल करून सगळे मंडळी बसतात. मध्ये दोन घोडे पळतील एवढी जागा असते. त्यातील एका घोड्यावर माणूस बसतो. तो रिंगणाला चक्कर मारतो तर दुसऱ्या घोड्यावर कोणीच नसते. तो घोडा त्या म्हणजे माणूस बसलेल्या घोड्याच्या मागे पळतो. जोपर्यंत दुसरा घोडा माणूस बसलेल्या घोड्याच्या पुढे जात नाही, तो पर्यंत रिंगण पूर्ण होत नाही. तो

पुढे गेला की रिंगण पार पडते. हा सोहळा बघण्यासाठी लोक सकाळपासून संध्याकाळपर्यंत तिथे जागा धरून बसतात. काही लोक तर दिवसभर काही खातही नाहीत. अशाप्रकारे मी इंदापूरचे आणि सर्वात मोठे म्हणजे महाराष्ट्रभरातील सर्व दिंड्या जिथे येऊन थांबतात ते वाखारीचे रिंगण पाहिले. खूप गर्दी असते. मिडीयावाले तो क्षण आपल्या कॅमेरामध्ये घेण्यासाठी एक दिवस आधीच आलेले असतात. त्याचप्रमाणे वारकरी सुध्दा तो आनंदाचा क्षण डोळे भरुन पाहण्यासाठी वाट बघत असतात. असा खूप मोठा वाखारीचा रिंगणाचा सोहळा असतो. तो सोहळा पार पडला की पंढरपूरवरून विठूरायाची दिंडी वाखरीच्या इतर दिंड्यांच्या स्वागताला येते ही परंपराच आहे. त्याशिवाय एकही दिंडीपुढे जात नाही. ती विठूरायाची दिंडी आल्यावर सगळ्या दिंड्या मग पंढरपूरला निघतात. मित्रांनो वाखारी रिंगणाचे सांगायचे राहिले, रिंगणपार पडल्यावर घोड्यांच्या पाया खालील माती घेण्यासाठी लोक वेडे-पिसे होतात. कारण ती देवाची माती असते. ती घरी देवस्थान किंवा तुळशीत ठेवल्यास चांगले असते अशी समजूत आहे. एकदा माती मिळाल्यावर सगळे लोक आनंदी होतात की जणू युध्दच जिंकले. कोणी फुगडी तर कोणी मनोरे रचतात, कोणी ताल धरतात असे वेगवेगळे खेळ खेळतात. आम्ही सुध्दा फुगडी खेळलो, मनोरे रचले, वारकऱ्यासोबत ताल धरून नाचलो. मित्रांनो एन.एस.एस. इतकी लोकप्रिय आहे. की आम्हाला एवढ्या वारकऱ्यामध्यें रिंगणात पुढे बसण्याचा मान मिळाला. तो दरवर्षीच असतो, असे सर म्हणाले. एन.एस.एस. च्या स्वयंसेवकांना वारीमध्ये वेगळ्याच नजरेने बघितले जाते. पंढरपूरला एन.एस.एस. ची वारी आषाढी एकादशीच्या दोन दिवस आधीच पोहचते. पहाटेच आम्हाला चंद्रभागेत स्नान करायला नेलं. आम्ही मनसोक्त चंद्रभागेच्या पाण्यात डुंबलो. नदीच्या कडेला मुंग्यांसारखी माणसं जमली होती. नंतर आम्ही त्या गर्दीतून वाट काढत मंदिराला फेरी मारून कळसाचे दर्शन घेऊन कर्मवीर भाऊसाहेब पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे आलो. तिथे मग आमच्या एन.एस.एस. वारीचा समारोप झाला. वारीमध्ये सहभागी झालेल्या स्वयंसेवकांचा सन्मान करण्यात आला. त्यासाठी खूप मंडळी आली होती. त्यांच्याकडून आम्हांला सन्मानित केले गेले. एक विठुरायाची प्रतिमा असलेले सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केलं. आमचा तो १८-२० दिवसांचा प्रवास आणि त्या प्रवासामध्ये विठूरायाची मिळालेली ती कधीही न विसरता येणारी भेट, आपण केलेल्या कामाचं चीज झालं, मन समाधानी झालं. आपल्या कुटुंबाचे, महाविद्यालयाचे, आपल्या विद्यापीठाचे नाव निघते यापेक्षा काय हवं ! वारीमध्ये मला खूप लोकांना बघता आलं. ओळख झाली. एन.एस.एस. चे कार्यक्रम अधिकारी, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू उपकुलगुरू तसेच एन.एस.एस. चे प्रमुख देसाई सर अशा सर्व लोकांना भेटता आले. पुणे विद्यापीठ म्हणजे काय? हा माझ्या मनातील प्रश्न. म्हणजे विद्यापीठ म्हणजे नेमकं काय आहे? हे प्रत्यक्ष तिथे ४-५ दिवस राहून कळाले. आपण ज्या विद्यापीठामध्ये शिकतो ते माहिती असणं आवश्यक आहे. मित्रांनो एकदा ते अवश्य बघा. तसेच मला महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या कॉलेज मधून आलेले एन.एस.एस. चे स्वयंसेवक भेटले. आमच्यात छान मैत्री झाली. एक अवश्य सांगावेसे वाटते की वारीमध्ये काही मुस्लीम मुले-मुली पण सहभागी झाले होते. शेवटी सगळ्यांनी म्हणजे निरोप समारोपाला मराठी पोषख धारण केला होता. मुस्लीम असून सुध्दा ते आपल्यात एकरूप झाले होते. सरसुध्दा होते, ही तर वारीची खासियतच आहे. पण मित्रानों, आपली वारी असून आपणच कधी कधी नावं ठेवतो. काय जायचं वारीमध्ये, असे म्हणतो. पण मित्रांनो, वारीमध्ये खूप प्रकाराचे लोक असतात. बाहेरील देशातीलसुध्दा लोक सामील होतात. कारण वारीत खूप शिकवण्यासारखं असतं. म्हणून ही आपली वारी, आपली पण आता ती सगळ्यांची झाली आहे. ही आपल्यासाठी तर एक आनंदाची गोष्ट आहेच त्याचप्रमाणे अनेक वर्षापासून संत तुकडोजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित झालेले वारकरी भेटले. त्यांकडे पाहिले की संत गाडगे महाराजांची आठवण होते. अगदी त्यांच्यासारखाच पोषाख, हातात झाडू, डोक्यावर मडके, कपडेही तसेच. ते वारीमध्ये स्वच्छतेचे महत्व भजन व कीर्तनातून देतात. त्यांना भेटून खूप छान वाटलं. आपण ज्या समाजात राहतो त्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे याची जाणीव झाली. खूप काही शिकवून जाते वारी! त्याचप्रमाणे आणखी एक अनुभव म्हणजे मला आकाशवाणीच्या सह्याद्री चॅनेलवर बोलण्याची संधी मिळाली. माझे अनुभव मी शेअर केले. खूप मस्त वाटतं.

अशी होती मित्रांनो माझी वारी. आता माझ्या शब्दांना, माझ्या अनुभवांना पूर्णविराम देतो. तुम्हाला सगळ्यांना धन्यवाद म्हणतो, कारण तुम्हीही माझ्यासोबत या लेखाद्वारे पंढरीची वारी अनुभवली. मित्रांनो एक नक्की सांगतो तुम्हाला आवाहन करतो कि एक तरी वारी अनुभवा. खूप काही शिकवते वारी. जीवन घडवते वारी. मित्रांनो आणखी एक सांगायचं आहे. माफी मागतो कारण वारीबद्दल जेवढं बोलावं तेवढं कमीच. वारीत माझ्या एका मित्राने खूप छान ओळी तयार केल्या. त्याचे नाव सूरज अस्लम बारगीर. आम्हाला ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसोबत जायचे होते पण आम्ही तुकोबांकडून गेलो, तेव्हा तो म्हणतो की, 'माऊलीचा होता वाटणीस, तुका आला दूर झाली माझी माय, मज तुकोबा कळाला' या ओळीमध्ये खूप काही शिकण्यासारखे आहे. ज्याला समजलं त्याला समजलं. मला खूप छान वाटलं. मित्रांनो तुमच्या सोबत माझी वारी शेअर करताना आनंद वाटला. आता तुमची रजा घेतो.

# अकोले तालुक्यातील पर्यटन स्थळे



सतीश अनिल जगदाळे
तृतीय वर्ष कला

अकोले तालुक्यात पर्यटन क्षेत्र म्हणून ओळखले जाणारे रतनगड, हरिश्चंद्रगड आणि कळसूबाई असे हे तीन पर्यटन स्थळे आहेत. ही तिन्ही स्थळे सह्याद्रीच्या पर्वतरांगामध्ये आपल्याला दिसून येतात. वर्षा ऋतुची चाहूल सुरू होताच या परिसरात काजवोत्सव सुरू होतो. हे पर्वत वृक्षराजीने वेढलेले आहेत. हा सर्व भाग कळसुबाई अभयारण्यात येतो. मे आणि जून या दरम्यान या भागात काजवा महोत्सव सुरू होतो. वृक्ष काजव्यांमुळे रोषणाईने सजलेले दिसतात. याकडे पर्यटक आकर्षिले जातात. काजवे हे शक्यतो जांभूळ, उंबर या प्रकारच्या झाडांवरती जास्त प्रमाणात दिसतात. पर्यटक आपल्या कॅमेरामध्ये ते चित्र टिपण्यांचा प्रयत्न करतात.

रतनगड , हरिश्चंद्रगड आणि कळसुबाई या परिसरात पावसाचे सर्वाधिक प्रमाण आहे आणि ते प्रमाण सातत्याने टिकून आहे. पावसाचे प्रमाण वाढताच काजवे लुप्त होतात आणि सुरू होतो तो टपोऱ्या थेंबांनी बरसणारा पाऊस. त्याच प्रमाणे घाटघर लगत असणारा कोकणकडा त्यावरून खाली येणारे पाणी लक्ष वेधून घेते. तिकडून येणारे धुके जणू काही आकाश खाली आले असे भासते. धुके गेले की पुन्हा सुरू होतो तो पाऊस. हे आपल्याला फक्त पावसाळ्यातच अनुभवता येते. या भागात अतिशय मुसळधार पाऊस असतो. त्यामुळे भंडारदरा डॅमदेखील लवकर भरतो. पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे या भागात प्रामुख्याने भातशेती केली जाते.

भाताचे सार्वाधिक पीक इथे मिळते. या भागात येणारे भात हे उत्तम प्रतीचे असते. या भागातील सर्व लोक हे शेती आणि पर्यटन व्यवसायांवर अवलंबून आहेत. पावसाचे पाणी डोंगरावरून पडताना दिसते त्यालाच आपण छोटे –मोठे धबधबे असे म्हणतो. पावसाळ्यात या भागात छोटे–मोठे असे अनेक धबधबे पहावयास मिळतात. ओढे–नाले, भात शेतातून येणारे पाणी हे सर्व दृश्य पर्यटकांना मोहून टाकते. पावसाळ्यात या परिसरात पर्यटकांची जास्त येजा बघण्यास मिळते. या भागाला पर्यटनचा वारसा लाभलेला आहे असं आपण म्हणू शकतो. पावसामुळे या भागाला अनमोल असा निसर्गरम्य परिसराचा ठेवा प्राप्त झाला आहे. रस्त्याच्या कडेला असणारे वृक्षही लक्ष वेधतात कारण हे वृक्ष अतिशय घनदाट असतात. येथील जंगलात अनेक प्रकारचे वृक्ष आढळतात. बऱ्याच ठिकाणी औषधी वनस्पती देखील आढळतात.

येथील मुख्य आकर्षण म्हणजे भंडारदरा धरण. पर्वतावरून कोसळणारे धवधवे ओढे–नाले या द्वारे येणारे पाणी भंडारदरा जलाशयाला येऊन मिळते. भंडारदरा धरण ब्रिटिश सरकारचे काळात बांधले असून विल्सन या नावाच्या इंग्रज अभियंत्याने याचे रेखांकन केले होते म्हणून या धरणाला विल्सन डॅम असेही म्हणतात. या धरणाची पाणीसाठवण क्षमता११ हजार ३९ दशलक्ष घनफूट इतकी आहे. या धरणाचे बांधकाम १९१६ साली सुरू झाले व १९२६ साली पूर्ण झाले. हे धरण फक्त १० वर्षाच्या कालावधीत बांधण्यात आलेले आहे. त्यावेळी या धरणाचे काम पूर्ण करण्यासाठी ८४ लाख १४ हजार १८८ रुपये खर्च आला होता. त्यानंतर १९७३ मध्ये पुन्हा त्यांचे बळकटीकरण करण्यात आले आहे. यावर्षी धरणाला ९४ वर्ष पूर्ण झाली आहेत. आजही त्याची तब्बेत भक्कम आहे. हे धरण साधारणपणे १५ ऑगस्टच्या दरम्यान भरते. त्यानंतर धरण ओसंडून वाहू लागते. या धरणाला पाणी सोडण्यासाठी एकूण ८ मोऱ्या आहेत. धरणाच्या पाण्यापासून वीजनिर्मिती केली जाते. येथील आकर्षण म्हणजे अंब्रेला फॉल. हा फॉल लांबून एखाद्या छत्रीसारखा दिसतो. याठिकाणी अनेक हिंदी–मराठी चित्रपटांचे चित्रिकरण झालेले आहे.

भंडारदरा धरणामधून झेपवणारे पाणी हे रंधा फॉलद्वारे प्रवरा नदी पात्रात जाते व तेथून ते निळवंडे धरणात जमा होते. हे सर्व दृश्य बघण्यासारखे असून अविस्मरणीय आहे. निळवंडे धरण ९ हजार दशलक्ष घनफूट इतक्या क्षमतेचे आहे. या धरणावर देखील वीजनिर्मिती प्रकल्प आहे. घाटघरचा कोकणकडा, साम्रदची सांदणदरी, पांजऱ्याचा फॉल, साम्रद रतनवाडीची देवस्थानं, साम्रद रतनवाडी या दरम्यानचा नेकलेस फॉल ही ठिकाणे पर्यटनाच्या दृष्टीने प्रसिध्द आहेत. साम्रदची सांदणदरी ही अशिया खंडातील दोन नंबरची व्हॅली आहे. या दरीचे वैशिष्ट्ये म्हणजे दरीमध्ये शक्यतो सूर्यप्रकाश पोहचतच नाही. प्रत्येक पर्यटकांला प्रश्न पडत असेल की कशी निर्माण झाली असेल बरं ही दरी ? हे एक मोठं आश्चर्य आहे. हरिश्चंद्रगड, छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला पट्टा किल्लाही अकोले तालुक्यातच आहे. पावसाळा संपला की येतो तो मग नवरात्र उत्सव. हा कालावधी येताच हा रानपरिसर फुलांनी सजतो. प्रत्येक रंगाची फुले आपल्याला पाहवयांस मिळतात. त्यामुळे पर्यटक त्यांकडे आकर्षिले जातात. मनमोहून टाकणारी ही दृश्यं असतात. महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर म्हणून नावजलेलं क्षेत्र म्हणजे कळसुबाईचं शिखर. यांची उंची १६४६ मीटर इतकी आहे. या ठिकाणी पर्यटक गिर्यारोहण करण्यासाठी येतात. शिखरावर माता कळसुबाईचे मंदिरदेखील आहे.

रतनगड किल्ला हा देखील खूप जुना आहे. हा किल्ला मुगल साम्राज्यातील आहे. अमृतवाहिनी प्रवरा नदीचा उगम रतनगडावरुनच झालेला आहे.

# शेतकरी आत्महत्यांची कारणे व उपाययोजना



कु. वैष्णवी रावसाहेब वाकचौरे
द्वितीय वर्ष वाणिज्य

शेतकऱ्या तुझी हाडं शेतामधी रे मुडले
मुडीसनी झाली राख तापी माईत पडले.

ग्रामीण कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी शेतकऱ्यांच्या जीवनाचे सारे वास्तव या कडव्यात मांडले आहे. माणसाला श्वसनासाठी जशी हवेची गरज असते, तशी पोट भरण्यासाठी अन्नाची गरज भासते. असा हा अन्नदाता आज अन्नान्न दशेला जाऊन पोहचला आहे. दुसऱ्यांना जीवदान देणारा मात्र स्वत: मृत्यूची भीक मागत आहे. अमरावती जिल्ह्यातील चांदुर बाजार तालुक्यातील २०० शेतकऱ्यांनी पूर्वी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्याकडे पत्राद्वारे इच्छामरणाची परवानगी मागितली होती.

आज अन्नदाता कुत्र्या-मांजरासारखा मरत आहे. शेतकऱ्यांची मुले गल्लीपासून दिल्लीपर्यंत राजकारण करत आहेत. पण घोड्यासारखी झापड लावून राजकारणी या घटनेकडे दुर्लक्ष करत आहेत. आळा नसलेली पेंढी जशी दिशाहीन भरकटते तशी शेतकऱ्यांची अवस्था बिकट बनली आहे.

याविषयी ग्रामीण कवी द.के.गंधारे लिहितात

'शिवरायांनी शेतकऱ्यांना अस्मानी सुलतानीत जपले
त्याचेच आयुष्य आज लटकत झाडावर खपले'

अशी भयावह अवस्था आज बनत चालली आहे. छत्रपती शिवरायांनी शेतकऱ्यांची देवतासमान पूजा केली. महात्मा फुले यांनी शेतकरी सुखी होण्याचे स्वप्न पाहिले. शेतकऱ्यांचे प्रश्न पहिल्यांदा त्यांनी वेशीवर टांगले. पण आज कुणाची तरी आई. बहिण, पत्नी , मुलगी, सून कपाळाचे कुंकू पुसून निराधार बनत आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या हे उज्वल भारतीय परंपरेचा झपाट्याने ऱ्हास होत असल्याचे लक्षण आहे. आज प्रत्येकजण भोगवादी संस्कृतीमध्ये गुंतून पडलेला आहे. पूर्वी सर्व जाती समाज परस्परांवर अवलंबून होता. गरीबातल्या गरीबाला लुबाडून श्रीमंत होत चाललेल्या देशाची संस्कृती आपल्याला प्रिय आहे.

भारत हा खेड्याचा देश आहे. तेथील जनतेचा विकास हाच भारताचा विकास आहे. पण आज शेतकऱ्यांच्या समस्या उग्र रुप धारण करत आहेत. त्यांच्या जगण्या मरण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा सामाजिक चिंतनाचा विषय बनला आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक दशके उलटली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात तर गगनभरारी घेतली. सावकार, भांडवलदार, पुढारी, व्यापारी कामगार ऐष आरामात जीवन जगत आहेत, पण अनेक पिढयांपासून शेतकरी मात्र हलाखी आणि उपासमारीत खितपत पडला आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर केरळ, आंध्रप्रदेश , पंजाब , कर्नाटक या राज्यातही शेतकरी आत्महत्येच्या मार्गाने आपला जीवन प्रवास संपवित आहेत.

आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध मार्ग अवलंबलेले आहेत. परंतू तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढतच आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्यकर्ते, कृषितज्ज्ञ, विचारवंत शास्त्रज्ञ सर्वच अपयशी ठरले आहेत. १९८८ ते २०१७ या काळात देशामध्ये दोन लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. राष्ट्रीय कृषी आयोगाचे अध्यक्ष स्वामीनाथन यांच्यापासून ते देशातील लहान-मोठ्या राजकीय पक्षांनी विदर्भात जाऊन आत्महत्यांचे अवलोकन केले. त्यालाही यश आले नाही. बी.बी.सी. लंडनच्या विभागाने विदर्भात भेट देऊन काही उपाय योजना सुचविल्या.

भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी विदर्भ दौरा करून आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना दिलासा दिला. विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी ३७५० कोटी रुपयांचे संपूट (पॅकेज) जाहीर केले. परंतु हे संपुट जाहीर झाल्यानंतरही आत्महत्यांचे सत्र चालूच आहे. आजही शासन जलसंधारणाच्या उपाययोजना राबवत आहे. कर्जमाफीसारख्या मलमपट्ट्या लावत आहे. त्यालाही अपयश आल्याचे आपणाला दिसत आहे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे :**

शेतकरी शेतीसाठी करीत असलेल्या उत्पादनाचा खर्च अधिक व उत्पन्न कमी अशी बिकट अवस्था बनली आहे. शासनाने शेतीमालाचे भाव कृत्रिमरित्या दाबून ठेवले आहेत. निर्यातीचे धोरण सतत शेतकऱ्यांच्या विरूध्द राहिल्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत देखील शेतीमालाचे भाव अन्य वस्तुंच्या तुलनेत कमी आहेत. आज भांडवलदार हे सर्वव्यापी बनलेले आहेत. त्याला नियंत्रित करणारी शक्ती म्हणजे जागतिकीकरण आहे. आपल्या देशात भांडवलाला नियंत्रित करणारी शक्ती संपुष्टात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत आहेत.

शेतकऱ्यांची शेती देशी व विदेशी भांडवलदारांनी काबीज केली आहे. याच बरोबर शेतकऱ्यांच्या आत्महत्येला कर्जबाजारीपणा, सावकारी, मुलींच्या लग्नांला खर्च, बिघडलेली गृहस्वास्थ ढासळलेली सामाजिक प्रतिष्ठा, ढळलेले मानसिक संतुलन, व्यसनधिनता भ्रष्टाचार ही कारणे कारणीभूत आहेत. शेतीमध्ये संशोधन करणारा शेतकरी हाडाचा कल्पक व जन्मत:च निसर्गाकडे व शेतीकडे ओढ असणारा आहे. पण त्याला शेती संशोधन कामी मदत केली जात नाही. त्यांच्या ज्ञानाचा इथे शेतकऱ्यांना उपयोगही करून दिला जात नाही. यामुळे शेतकऱ्यांचा विकास खुंटतो.

कृषी खात्यांचे फलोत्पादन, कृषी, जलसंधारण व विस्तार असे चार विभाग आहेत. परंतू यावर संचालक एकच आहे. याचे विकेंद्रीकरण न झाल्यामुळे शेती सुधारणा होऊ शकली नाही. शेतकऱ्यांचा विकास होण्याऐवजी शेती भकास झाली. शेतीचे धोरण ठरविणारे शेतकऱ्यातले नसल्यामुळे

शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले जात नाहीत. रासायनिक खतांच्या प्रचंड जाहिरातबाजीमुळे शेतकरी यांचा अधिक वापर करत आहे. परंतु खर्चापेक्षा उत्पन्न कमी व बाजारभाव नसल्यामुळे तो अधिक नागवला जात आहे.

रासायनिक खतांचा व संकरित बी–बीयाणे यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. ५० वर्षापासून यांचा वापर होत असल्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी झाली आहे. जमीन नापिक बनला आहे. यातच कुटुंबाचे आकरमान वाढल्याने व कुटूंब विभक्त झाल्याने लहान आकाराच्या क्षेत्रावर अधिक लोक अवलंबून राहू लागले या सर्वाचा परिणाम शेती उत्पादन कमी होण्यावर झाला. उत्पन्न कमी व गरजा वाढत गेल्यामुळे शेतकरी कर्जाकडे आकृष्ट होत गेला. यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला. त्यातूनच तो आत्महत्या करू लागला.

शेतकऱ्यांना शेतीमालाला त्याची गुंतवणूक भरून निघण्याइतकीही किंमत मिळत नाही. म्हणजेच उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही, म्हणून तो गुंतवणूकीसाठी घेतलेले कर्ज फेडू शकत नाही. त्याला जगण्यासाठी यातून काहीच राहत नाही. म्हणून त्याला पुन्हा कर्ज काढावे लागते व उत्पादन खर्चावर आधारित भाव न मिळाल्यामुळे तो कर्जाच्या विळख्यात अडकतो. पुढे कर्ज मिळण्याचेही सर्व मार्ग बंद होतात. कारण सर्व ठिकाणची त्याची पत संपलेली असते. दुसऱ्या बाजूला कर्ज वसुली व संबंधितांचे तगादे चालूच असतात. अशा वेळी सर्व बाजूंनी कोंडी झालेल्या व पूर्णपणे अगतिक झालेल्या शेतकऱ्याला आत्महत्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाही.

शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळून देण्यासाठी संपूर्ण देशात जे शेती मालाच्या विरोधी वातावरण निर्माण करण्यात येते त्यात कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा ठेका आमच्याकडेच आहे, असा दावा करणारे व पर्यायाने देशात साम्यवादी व समाजवादी व्यवस्था आणण्याचे जनतेला स्वप्न दाखविणारे डावे म्हणविणारे पक्ष तुलनेने अधिक जबाबदार आहेत. याचे कारण असे की सरकारी नोकर, बँका, सार्वजनिक उद्योग व इतरही आद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या व कामगारांच्या मुठभर संघटित वर्गाचे या डाव्या मंडळींनी नेतृत्व केले. यातून कष्टकरी समाज व शेतकऱ्यांवर विपरित परिणाम झाला. डाव्यांनी शेतमालाचा भाव वाढता कामा नये, वाढला तर गोरगरीबांचे हाल होतील हे धोरण अवलंबिले.

गॅट करारातील तरतुदीचे निमित्त करून १ एप्रिल २००१ रोजी आयात खुलीकरणाची प्रक्रिया केंद्र शासनाने पुरी करून एकूण दहा हजार परदेशी वस्तूंवरील संख्यात्मक निर्बंध काढून टाकले. कापूस, तेलबिया, तेल, भाजीपाला, बटाटे, नारळ, सफरचंद, लसूण, डाळिंबे, बेदाणे, दुध– भुकटी आदी अनेक शेतमाल– शेतमालावर आधारित व पशुजन्य वस्तू, कपडे पेन, वह्या, टी.व्ही, मोटारी आदी उत्पादीत वस्तू अशा सर्व वस्तूवरील आयात निर्बंध उठवण्यात आले. गॅट करारामुळे परकीय मालाचा भारतावर मारा सुरू होऊन शेतमालाच्या सुगीनंतरच्या किंमती एकदम कोसळल्या. ज्वारी, बाजरीचे भाव निम्मे झाले. खाद्यतेल, गहू, कापूस, रबर याबाबतीत असेच घडले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागची अजून ठळक कारणे म्हणजे नापिकी. पतपुरवठेचा अभाव. शेतीपुरक उद्योगांचा अभाव, बँकाकडून अपूरा कर्जपुरवठा होणे, सिंचन सुविधांचा अभाव. शेतीपुरक उद्योगांचा अभाव यामुळे शेतकरी संकटात सापडून शेतकरी आत्महत्या करतो. पाचवीला पुजलेले दारिद्रय, सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून विदर्भात जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

विदर्भात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची आकडेवारी पाहता यवतमाळ–२२१ अमरावती –१२५ बुलढाणा –११२ अकोला –१०२ वाशीम –७८ वर्धा –६९ नागपूर– ४७ चंद्रपूर –३६ भंडारा –२७ गोंदिया –१५ गडचिरोली –०४ अशी आहेत. सरकारी यंत्रणा विदर्भात कार्यरत असूनही आत्महत्या थांबू शकल्या नाहीत सिंचनाच्या सुविधा नसल्याने सर्वाधिक कोरडवाहू शेती असलेल्या विदर्भात शेतकऱ्यांसाठी अनेक आंदोलने होऊनही त्यांच्या समस्यांचे निराकरण होऊ शकले नाही. कापसाची वखार म्हणून प्रसिध्द असलेल्या आणि देशात सर्वाधिक कापसाचे उत्पादन होणाऱ्या विदर्भातच आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये कापूस उत्पदकांचीच संख्या सर्वाधिक असल्याची शोकांतिका आहे.

शेतकरी आत्महत्या करत असतानाच शेतकरी विरोधी कायद्याचा बडगा उगारला जात आहे. त्याला व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य नाही. न्यायालयात दाद मागता येणार नाही, मालमत्तेची मालकीचा प्रश्न, निर्यात बंदी असे शेतकऱ्यांचा गळफास आवळणारे कायदे अंमलात येत आहेत, त्याला विरोध झाला पाहिजे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याचे काही उपाय:**

महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांच्या विकासाचे अनेक उपाय सुचविले आहेत. पाणी हा शेतकऱ्यांचा आत्मा आहे. पाण्याचे नियोजन करण्यासाठी तलावांची निर्मिती करावी असे महात्मा फुले सुचवितात, पावसाच्या दयेवर शेतकऱ्यांचे भवितव्य अवलंबून असता कामा नये, त्यावर टांगते ठेवू नये कारण पाऊस हा लहरी बेभरवशाचा असतो, असा महत्वाचा उपाय महात्मा फुले यांनी सुचविला. देशातील ४५ टक्के शेती लागवडी खाली आली पाहिजे. यासाठी जलसंधारणाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या जाणे अतिशय गरजेचे आहे. नद्यांच्या पुराचे पाणी दरवर्षी समुद्राकडे वाहून जाते. हे जाणारे पाणी अडविले तर शेतकरी सुखी होईल.

पाणी ही नैसर्गिक संपदा आहे, तिचं मोल पैशात करण्याची पध्दत असली तरी पाणी अमूल्य आहे. पाणी नसेल तर आपले जीवन जगणे अशक्य होईल एवढी महती असूनही मुबलक उपलब्ध पाण्याला बाजारात किंमत नाही, आणि अजिबात उपयोगी नसलेल्या हिऱ्याला अतोनात किंमत आहे, असे ॲडम स्मिथ यांनी दोनशे वर्षापूर्वी हे विचार मांडले होते. त्याचा विचार अजूनही होत नाही.

शेतकऱ्यांनी आपली सामुहिक ताकद दाखविण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची आज निर्वाह व्यवस्था मोडकळीस आली आहे. शेतकरी, शेतमजुरांच्या भक्कम संघटना नसल्यामुळे त्यांना जमिनीवरचे, पाण्यावरचे, आपले हक्क शाबूत राखता येत नाहीत. याचबरोबर शेतकरी ग्राहक संघटना निर्माण केल्या पाहिजेत. व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट होत आहे. व्यापारी पाशातून शेतकरी सुटल्याशिवाय शेतकरी सुखी होणार नाही.

ग्रामीण भागात उद्योगनिर्मिती झाली पाहिजे. गावातले उत्पादन पड्या भावाने बाहेर जाते. कारखान्यात प्रक्रिया केलेला तोच माल चढ्या भावाने गावात पुन्हा येतो. यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान आहे. गोडतेल पेंड हे उद्योग खेड्यात सुरू होऊन उत्पन्नाचे मार्ग निर्माण होतील. तसेच सहकारी पध्दतीने घरे, शाळा व इतर सार्वजनिक इमारती सुतार, गवंडी, रंगारी यांच्या संघटनेमार्फत बांधल्या तर बांधकाम खर्च कमी होईल. रोजगार मिळेल व कमी खर्चात निवारा होईल.

शेती, पशुधन, फलोद्यान यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. पिकांना बांधील भाव असावा. सहकार क्षेत्राचे खाजगीकरण होता कामा नये. बी-बियाणे उपलब्ध करून द्यावीत. पिण्याच्या पाण्याचा खात्रीशीर पुरवठा व पाणलोट क्षेत्र विकास योजना कार्यक्षम कराव्यात. शेतकऱ्यांना लघू उद्योगांसाठी कर्जपुरवठा करावा. विमा योजनांची व्यापक तरतूद करावी. कृषी विद्यापीठांकडून संशोधन व मार्गदर्शन मिळावे.

याचबरोबर 'पाणी आडवा व पाणी जिरवा! काटकसरीने पाणी वापरा!' हा नारा देऊन जलसंवर्धनाला प्राधान्य दिले पाहिजे. तसेच घनमापन पध्दतीने सहकारी अथवा सामूहिक पध्दतीने पिण्याच्या पाण्याचे नियोजन करून पाण्याचा गैरवापर होणार नाही याची काळजी घ्यावी. शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे भाव ठरविण्याची नीती आखावी शेतासाठी वीज, पाणी, कर्ज, व त्यावरील व्याज. औषधे बी-बियाणे, औजारे खते, वाहतूक व साठवणूक खर्च आणि मजूरांचा प्रत्यक्ष येणारा खर्च हा उत्पादन खर्चाचा भाग मानला जावा. त्यासाठी अनुदानांचा प्रश्न येणार नाही. उत्पादक शेतकऱ्यांना पंधरा टक्के नफा मिळेल अशी तरतूद करावी. शेती उत्पादनाच्या प्रत्यक्ष खर्चावर आधारित किंमत असावी.

पीक काढणीच्या वेळी शेतकऱ्यांच्या मालाला किंमत नसते यासाठी शेतकऱ्यांकडे शेती उत्पादन साठविण्यासाठी स्वत:ची सोय नसते यासाठी गाववार साठवणूकीच्या सोयी शासनाने उपलब्ध करून देऊन व बँकांच्या शाखा खेड्यात निर्माण करून शेतकऱ्यांना अल्पव्याजदराने माल तारणावर कर्जपुरवठा करावा. याचबरोबर शेतकऱ्यांच्या विकासासाठी राष्ट्रीय किसान आयोग, कृषी मंत्रालय, नवी दिल्ली यांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी काही उपाय सुचविले आहेत. तंत्रज्ञान व सार्वजनिक धोरण यांचा प्रभावी मेळ घालणे सुशिक्षित तरूण शेतकरी शेतीक्षेत्राकडे आकर्षित होण्यासाठी पीक सर्वधन, फलोद्यान, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, कृषी-वनीकरण व संलग्न अशा पणनविषयक पायाभूत सुविधा राबविणे गरजेचे आहे. पतपुरवठ्याची सुविधा करणे, कोरडवाडू शेतकऱ्यांना शेती करता यावी म्हणून विशेष कार्यक्रम राबविणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, सिंचनाच्या पाण्याला अग्रक्रम देणे आदी उपाय करणे गरजेचे आहे. वरील उपाययोजना राबविल्या तर शेतकरी सुखी होईल व तो आत्महत्या करणार नाही.

"भारतीय जहां जाता है, वहां लक्ष्मी की साधना में लग जाता है। मगर इस देश में उगते ही ऐसा लगता है कि उसकी प्रतिभा कुंठित हो जाती है।. भारत जमीन का टुकड़ा नहीं, जीता-जागता राष्ट्रपुरुष है। हिमालय इसका मस्तक है, गौरीशंकर शिखा है। कश्मीर किरीट है, पंजाब और बंगाल दो विशाल कंधे हैं। दिल्ली इसका दिल है। विन्ध्याचल कटि है, नर्मदा करधनी है। पूर्वी और पश्चिमी घाट दो विशाल जंघाएं हैं। कन्याकुमारी इसके चरण हैं, सागर इसके पग पखारता है। पावस के काले-काले मेघ इसके कुंतल केश हैं। चांद और सूरज इसकी आरती उतारते हैं, मलयानिल चंवर घुलता है। यह वन्दन की भूमि है, अभिनन्दन की भूमि है। यह तर्पण की भूमि है, यह अर्पण की भूमि है। इसका कंकर-कंकर शंकर है, इसका बिंदु-बिंदु गंगाजल है। हम जिएंगे तो इसके लिए, मरेंगे तो इसके लिए"।

**---भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी**

# पालक व पाल्य यातील दुरावत चाललेला संवाद

कु. वैष्णवी रावसाहेब वाकचौरे
द्वितीय वर्ष वाणिज्य

शीर्षक वाचून कदाचित बऱ्याच जणांना असे वाटेल की या विषयावर लिहिण्यासारखे काय आहे? पण मला असे वाटते की आजकाल हा विषय फार गंभीर बनत चालला आहे. आज जर आपण बारकाईने समाजाचे निरीक्षण केले तर आपल्याला असे लक्षात येईल की हेच मूळ कारण आहे. आजची पिढी उध्वस्त होण्यामागे आजही समाजात कितीतरी घरे अशी आहेत की जिथे मुलांच्या मताला किंमत नसते. मुले कितीही मोठी झाली तरी त्यांना त्यांच्या पालकांच्या मर्जीप्रमाणे वागावे लागते. मग अशावेळी ती मुले आपले विचार, कल्पना या कधीही पालकांसमोर मांडत नाहीत. पण अशा पालकांमध्ये व मुलांमध्ये मोकळा संवाद होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण कितीतरी आयुष्य उध्वस्त केलीत, या न घडून आलेल्या संवादाने काहींना जगावसंच वाटलं नाही, त्यांनी थेट आत्महत्या केली आणि ज्यांना जगण्याची थोडी फार आस होती त्यांना या न घडलेल्या संवादाने घरापासून कायमचे दूर केले. आपण आज जेवढ्या सहजतेने हा विषय बोलतो किंवा व्यक्त करतो त्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त गंभीर आहे हा विषय.

'डीयर जिंदगी' या चित्रपटातले एक वाक्य होते की, आपण बाह्यांगावर झालेल्या इजेवर उपाय त्वरीत करतो. पण मेंदूला होत असलेल्या त्रासाकडे मात्र आपण दुर्लक्ष करतो. हे उदाहरण सांगण्यामागचे कारण म्हणजे मुले व पालक यांच्यातील दुरावत चाललेल्या संवादाचे बळी अनेकवेळा मानसिकरीत्याच जातात.

पालकांनी मात्र दरवेळी एकच वाक्य पाठ केलेलं असतं की, आम्ही मुलांसाठी जीवाचं रान करतो तर मुलांनी आमचं ऐकायला नको का? मान्य आहे की ते मुलांसाठी खूप कष्ट करतात पण प्रत्येक वेळी हया गोष्टी मुलांना ऐकवण्याची काहीच गरज नसते. यांचा मुलावर मानसिकरीत्या वाईट परीणाम होत असतो. कधीकधी काही निर्णय हे मुलांना त्यांच्या मर्जीप्रमाणेसुध्दा घेण्यास पालकांची पाठींबा द्यायला हवा. कारण हा प्रश्न मुलांच्या आयुष्याचा असतो. प्रसिध्द लेखिका माधवी घारपुरे यांच्या मते मुलांची आकलन व विचार करण्याची पध्दत ही फार वेगळी असते. आणि अशावेळी पालक आपली मते त्यांच्यावर लादतात, त्यांची मते जाणून घेत नाहीत त्यामुळे मुले आपली मते व्यक्त न करताच मनातल्या मनात कुढत असतात.

डॉ. मिलिंद ठोंवरे यांच्या मते, प्रत्येक पालकाने आपले मुल एकमेवाद्वितीय आहे, हे लक्षता घेऊन इतरांच्या मुलांशी त्यांची तुलना करणे थांबवले तर मुलांनाही पालकाशी मोकळेपणाने वागवण्यास सोपे जाईल. त्यासाठी मुलांचे मार्गदर्शक व मित्र बना पण प्रत्येक पालकाने हे लक्षात ठेवायला हवे की ते मुलांचे फक्त पालक आहेत मालक नाही आणि गोष्ट त्यांनी कधीही विसरता कामा नये.

खरेतर मुलांच्या दोष व चुका घालवून त्यांना गुणवान बनविण्यासाठी पालकांनी प्रयत्न करायला हवेत. पण याउलट आजचे पालक मुलांना महागडे कोचिंग क्लास, कपडे, मोबाईल इ. वस्तू विकत घेऊन दिल्या की आपली मुलांप्रती जबाबदारी संपली असे समजतात. व मुलांना, आम्ही तुम्हाला प्रत्येक गोष्ट पुरवतो, तरी तुम्हाला साधा अभ्यासही करता येत नाही? असे ऐकवत असतात. पण या पालकांना कोण सांगेल की मुलांना या गरजांपेक्षा आईवडीलांच्या मानसिक आधाराची जास्त गरज असते. मुलांना पालकांकडून काही वेगळ्या अपेक्षा असतात. आणि नेमक्या त्याच पूर्ण करायला पालक विसरतात व मुलांचे सुख व आनंद पैशात मोजण्याची चूक करून बसतात.

मुलांना आनंदी व तणावमुक्त ठेवायचे असेल तर आधी पालक स्वत: घरात आनंदी व तणावमुक्त राहिले पाहिजे. मुलांना कधीही तणावग्रस्त पालकांजवळ आपल्या भावना व्यक्त कराव्या वाटत नाहीत. अशावेळी मुलांच्या काही समस्या असतील तरी ते पालकांजवळ व्यक्त होण्याचे टाळतात. म्हणून पालकांनी घरात तणावमुक्त असायला हवे. घरात वागतांना स्वत:चे प्रोफेशन बाजूला ठेवून आपण घरात फक्त पालक पालक आहोत याचे भान ठेवायला हवे पालकांनी एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी की शरीरावरच्या जखमा भरून निघतात. पण मनावरच्या जखमा कधीही भरून निघत नाहीत. म्हणून मुलांच्याही मतांचा आदर करा. त्यांची मते उगीच मुलांवर लादू नयेत. मुले ही त्यांच्या वर्तमानात जगत असतात. त्यामुळे पालकांनीही परिस्थितीनुसार स्वत:ला बदलायला हवे. काही पालकांना स्वत:च्या भूताकाळात झालेल्या गोष्टींची तुलना मुलांच्या आजच्या वर्तमानाशी करायची सवय असते. ते सतत त्यांच्या भूतकाळात घडलेल्या गोष्टी मुलांना ऐकवत असतात. यांचा मुलांवर वाईट परीणाम होत असतो हे लक्षात असू द्या व आपला भूतकाळ कधीही मुलांवर लादू नका.

मुलं आणि पालक यांच्यातल्या संवादाचा विचार करतांना प्रथम घरामध्ये पालकांचा संवाद कसा आहे हेही महत्त्वाचे असते. पण आज जवळपास सर्वच घरात कोणी टी.व्ही. वर कोणी मोबाईल इ. साधनांमध्ये व्यस्त असतात आणि आजकाल एकमेकांशी बोलणं म्हणजे मला वेळ नाही, 'पप्पा मला पैसे हवेत', 'आई मला यायला उशीर होणार आहे.' इ. अशा मोजक्याच शब्दात झाले आहे. पण याला संवाद म्हणत नाहीत. आजकाल पालक आणि मुलांमध्येही फक्त परीक्षेच्या काळात संवाद घडून येतो तेही पालक मुलांना दोन-तीन प्रश्न विचारतात. उदा. परीक्षा कधी आहे? अभ्यास झाला का? किती मार्क्स मिळाले? इ. कधी कधी असा प्रश्न पडतो की नक्की मुलाला जन्म देताना पालकांचा उद्देश काय फक्त स्वत:चा नावलौकीक वाढविणे इतकाच असतो का? मग भलेही त्या मुलावर अभ्यासाचे कितीही ओझे आले तरी चालेल. काही मुलांना मात्र मुळातच अभ्यास करायचा नसतो. ती मुले अशा गोष्टींना अपवाद आहेत.

कधी कधी एका न झालेल्या संवादामुळे मुले अत्यंत चुकीच्या मार्गावर जाऊन पोहचतात व नंतर पालकांवर पश्चाताप करण्याचे वेळ येते. त्यामुळे आज मुलांशी बोला, त्यांना वेळ द्या, तरच ते उद्या भविष्यात तुमच्याशी बोलतील व वेळ देतील नाहीतर तुम्ही जर आज मुलांना फक्त पैसा पुरवाल तर उद्या तुमचेही भविष्य तेच आहे हे विसरू नका आणि हे वास्तव आहे.

# वनसंवर्धन काळाची गरज ..

**आदेश जनार्दन कर्पे**
द्वितीय वर्ष वाणिज्य

वनसंवर्धन म्हणजे काय? तर वनसंवर्धन म्हणजे वनाचे संरक्षण कसे करावे यालाच तर वनसवंर्धन असे म्हणतात. आज या भारताचा अनेक राज्य आहे. त्यातच एक विविधतेने नटलेलं आणि गाजलेलं राज्य म्हणजे महाराष्ट्र राज्य आहे. आणि या राज्यासाठी अनेक माणसांनी म्हणजेच तर महामानवांनी जे लढले त्या माणसांना विनम्र अभिवादन!

त्यातच आपले शिवाजी महाराज यांनी जे कष्ट केले त्या कष्टामुळे आज आपला महाराष्ट्र सुखी आहे. त्यांनीच हा तर महाराष्ट्र घडवला, नटवला, शिकवला बनवला आणि आज सुंदरतेने नटवलं आणि आज सुंदरतेने नटलेलं राज्य म्हणजेच तर हा महाराष्ट्र आहे. महाराष्ट्र या शब्दाचा अर्थ काय? तर महाराष्ट्र म्हणजे महान असे राष्ट्र यालाच तर महाराष्ट्र म्हणतात.

या महाराष्ट्रातील माती म्हणजे काय आहे तर या मातीला महाराष्ट्राची आई असे म्हणतात. या महाराष्ट्रातील माती आणि निसर्ग असा आहे की तो जितका पहावा तितका कमीच आहे. छत्रपती शिवरायांनी घडवलेले किल्ले या महाराष्ट्रात अनेक आहेत आणि या सह्याद्रीच्या कड्यातून अनेक नद्या निर्माण झाल्या आहेत. या नद्या म्हणजे महाराष्ट्राच्या जीवनवाहिन्या आहेत. महाराष्ट्राला घडवताना ज्या राजांनी, नेत्यांनी कष्ट केले त्या महामानवांना मी प्रथम अभिवादन करतो. महाराष्ट्रातल्या सृष्टीला, पर्यावरणाला जर जपायचे असेल तर वनसंवर्धन करणे काळाची गरज आहे. आणि ती केलीच पाहिजे.

आज या महाराष्ट्र राज्यात अनेक जिल्हे आहेत. आणि या जिल्ह्यात अनेक तालुके आहेत. आणि त्या तालुक्यात अनेक गावे आहेत. मराठवाडा, विदर्भात भीषण दुष्काळ पडला आहे. जिथे पिण्यासाठी पाणी उपलब्ध नाही, तिथे शेतीला कुठून कुठून मिळणार. सगळं जग शेतकऱ्याला जगाचा अन्नदाता/पोशिंदा असे म्हटले आहे. परंतु शेतकऱ्यांचे सध्या काय हाल आहेत हे आपण पाहतोच आहे.

लहान मुलांना जर विचारले की शेतकरी म्हणजे कोण तर ते म्हणतात फार्मर. पण या शब्दाचा अर्थ घेतला तर फार्मर म्हणजे शेतकरी नव्हे तर फार्मर म्हणजे 'फार काम करून मर' असा घ्यावा लागेल. आज कोणत्याही पक्षाचे सरकार जरी आले तरी ते फक्त शेतकऱ्यांना आश्वसनेच देते.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा म्हणून कायदे केले जातात पण त्याची काटोकोर अंमलबजावणी केली जात नाही. फक्त म्हणतात की तळागाळातल्याचा विचार केला जाईल, पण तळागाळात तर असतो फक्त शेतकरी तो तळातच राहून गाळातच रुततो तो वर येतच नाही. शेतकरी आत्महत्या करतो याचं कारण म्हणजे अतिवृष्टी, दुष्काळ ही आस्मानी संकटं तर आहेतच पण या संकटातून तो सुटलाच तर सुलतानी संकटातून त्याची सुटका नाही. त्याच्या शेतमालाला भाव मिळत नाही. परिणामी त्यानी केलेला भांडवली खर्चही निघत नाही आणि कर्जाचा डोंगर वाढतो. आणि मग आर्थिक विवंचनेत सापडलेला शेतकरी एक दिवस तो आत्महत्या करतो, त्याचं कुटुंब उद्धस्त होते.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जर आळा घालायचा असेल तर प्रथम जास्त उत्पन्न मिळणारी बियाणे बंद केली पाहिजेत. शून्य बजेट शेती केली पाहिजे. संकरित शेती बंद करून सेंद्रिय शेती केली पाहिजे. कमीत कमी उत्पन्न काढून जास्तीत जास्त बाजार भाव मिळाला तर चित्र बदलेल, शेतकरी सुखी होईल.

जी जमीन शेतीसाठी उपयोगी नाही. त्या जमीनीवर वृक्ष लागवड केली पाहिजे आणि जंगलतोड थांबवावी लागेल. वृक्ष लागवड केल्यानंतर जंगलाची वाढ होईल आणि मोठ्या प्रमाणात वनसंवर्धन होईल. आपलं राज्य हे दुष्काळ मुक्त तर होइलच, पण यामुळे पावसामुळे जमिनीची धूप थांबेल व भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. इंधनासाठी जंगलावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येला पर्यायी इंधन उपलब्ध करून द्यावे लागेल.

हे जर उध्वस्त होत असेल तर या गोष्टीला आळा घातला गेला तर ही सजीवसृष्टी राहील आणि ती जर टिकवायची असेल तर आपण स्वतः पासून सुरूवात केली पाहिजे. ही जबाबदारी फक्त सरकारची नसून समाजानेही यात सहभाग घेतला पाहिजे. सरकार आणि माणूस या दोन्ही गोष्टींची गरज आहे. आज पेट्रोलियम पदार्थांचे भाव आभाळाला भिडले आहेत. या कारणामुळे सामान्य माणूस गॅस वापरू शकत नाही. त्याला जळणासाठी लाकूड वापरावं लागतं म्हणून तो झाडे तोडतो. हे थांबवले तर जंगले टिकतील आणि राज्य दुष्काळमुक्त होण्यास निश्चित हातभार लागेल.

हिम्मतीने हारा पण हिम्मत हारू नका. परमेश्वर प्रत्येकाला हिरा बनवुनच जन्माला घालतो, पण चमकतो तोच जो घणाचे घाव सोसण्याची हिम्मत ठेवतो.



– विश्वासराव नांगरे पाटील

# मराठी विभाग

## पद्य

### अनुक्रमणिका


| कविता | कवी | पान नं. |
|---|---|---|
| १. आम्ही पंढरीचे वारकरी | धनंजय मोहिते | ४२ |
| २. बघ पिसाट कुत्रे फिरती रे | कु. वनिता नामदेव बोरसे | ४२ |
| ३. आई तुझ्या आठवणीनं | कु. जयश्री जयसिंग मोरे | ४२ |
| ४. कलीयुगाची कहाणी | कु. रुपाली बाळू घिक्षे | ४२ |
| ५. मन | देवा कुलकर्णी | ४२ |
| ६. भुंगा | रविंद्र दत्तू खाडे | ४३ |
| ७. बदलते कलियुग | कु. सोनाली संपत शेळके | ४३ |
| ८. विश्वास | दीपक सोमनाथ डगळे | ४३ |
| ९. आई | आदेश जनार्धन कर्पे | ४४ |
| १०. नको करू माणसा तू निसर्गाचा ऱ्हास | कु. श्रद्धा बगाड | ४४ |
| ११. तो बाप असतो | कु. वैष्णवी रावसाहेब वाकचौरे | ४५ |
| १२. कॉलेजमधला पहिला दिवस | | ४५ |
| १३. शब्द | कु. करुणा सुधाकर सरवदे | ४५ |



## आम्ही पंढरीचे वारकरी

धनंजय मोहिते (तृतीय वर्ष कला)

आम्ही वारकरी वारकरी, आम्ही पंढरीचे वारकरी
विठ्ठल पिता आमुचा माय सावळी रखुमाई
भक्तांची मांदियाळी पंढरपूरा देव सावळा उभा साजिरा
आम्ही वारकरी वारकरी, आम्ही पंढरीचे वारकरी
आषाढी कार्तिकी जाता रखुमावरा पाहता लोचनी
विठूरायाच्या मनी होतो संतोष सर्वांच्या
आम्ही वारकरी, वारकरी आम्ही पंढरीचे वारकरी
देव असे हा सर्वसामान्यांचा आहे तो भुकेला भक्तीचा
लागती चरणी विठूरायाच्या मंदिरी
आम्ही वारकरी, वारकरी आम्ही पंढरीचे वारकरी

## बघ पिसाट कुत्रे फिरती रे।

कु. वनिता नामदेव बोरसे

बघ पिसाट कुत्रे फिरती रे थांबा जरासे थांबा।
बेभान श्वास गुरगुरले रे हे इकडे-तिकडे फिरते रे
काही कुणा धरी हे शिरले रे थांबा जरासे।
कुत्र्यांची भटके टोळी हिंडे गल्ली बोळीने
भेदरली ये आरोळी रे थांबा जरासे।
नुसतेच करे भुभू रे करू नकोस रे वेड्या छू छू रे।
हो सावध सावध वेड्या
तू करून नकोस रे खोड्या
पणा थांबा जरासे।



## आई तुझ्या आठवणीनं

कु. जयश्री जयसिंग मोरे (तृतीय वर्ष वाणिज्य)

आठवण तुझी येताच। डोळे भरून येई।।
नाव तुझे घेताच । अश्रूंच्या धारा वाही।
कसे राहू तुझ्या विना। ना करमेना मला।।
सवय झाली तुला बघण्याची। सांगना देवा तिला तू।।
तिच्या सोबत जीवन माझे।। आनंदाने जळू दे।
नको करू तू दूर मला।।
तिच्या जवळ राहु दे। नको देवा बाकी काही।।
फक्त हवी मला माझी आई।

## कलियुगाची कहाणी

कु.रुपाली बाळू घिगे (प्रथम वर्ष कला)

कलियुगाची ऐका हो कहाणी
माणूस न राहिला माणसावाणी
दिसतात सगळीकडं माणसं
पण गेली माणुसकी हरवून
नात्या गोत्याला फासती काळीमा
करा वर्णावा कलीयुगाचा महिमा
इथं ऐकावं ते नवलंच
कलियुगाची ही नवी कहाणी
जे कधी न कल्पित मनी
ते हळूच पसरत कानोकानी
रक्त संबंध न राहिले
तमा त्याची ना कुणाला
केवळ नावाचीच नाती गोती
कलियुगाची महती कथिती
त्यागाची महिमा झाली लुप्त
जो तो इथे स्वार्थाने तृप्त
देऊन नेहमी दुसऱ्याचा बळी
कलियुगाची एकच हाळी
बळी तो कान पिळी

## मन

देवा कुलकर्णी

जुळले नाही कधी मनाचे
मनाला उमगले नाही
कधी जलाचे जलाला
मुंगीला आस असे एका कणाची
पाडसाला भिती एका वनाची
मनाला मनाचे घाव
कधी जाणले नाही मनात
रक्ताचे घाव वाहत होते
जीवाला मनाचे वेद जाणवत होते
ह्रदयाचा संबंध मनाला समजत होता.
मनाचे मनाला स्पर्शिवित होत होता
जाणवले तेव्हा मन धावत होते
आयुष्य संपले तेव्हा मन थांबले
होते संपूर्ण मन माळवले होते.
पुन्हा उदयास यावे मन सांगत होते.
हळुवार मन साद देत होते पण
मनाचे ह्रदय मंद झाले होते.
मन फुलण्यासाठी सक्षम होत होते पण
आयुष्य संपले होते. आयुष्य संपले होते.

### भुंगा

रविंद्र दत्तू खाडे (प्रथम वर्ष कला)

उमलतात आयुष्याच्या वेलीवर रंगबेरंगी फुले अन कळ्या
कळ्या असतात कोमल कळ्या असतात नाजुक
पण त्या कळ्यांच्या भोवती फिरतात दुष्ट काळे भुंगे
शोषतात कळ्यांतील सर्व काही निचेष्ट, निस्पंद
विखुरतात त्या कळ्या दुष्ट भुंगे गाठतात नीचतेचा कळस
अन् उमलणाऱ्या कळ्यांना फुलण्याआधी कुस्करतात
करतात अंत त्यांचा उमलण्याआधी...

### बदलते कलियुग

कु.सोनाली संपत शेळके (प्रथम वर्ष कला)

बदलत्या कलियुगाची बदलती आव्हाने
बदलाया विज्ञानाची बदलती रसायने
बदलत्या कलियुगाची बदलती कहाणी
बदलाया तरूणाईची बदलती जवानी
बदलत्या कलियुगाचे बदलते आविष्कार
बदलणाऱ्या राजकारणाचे बदलते सरकार
बदलत्या कलियुगाचे बदलते विचार,
बदलत्या गृहिणींचे बदलते आचार
बदलत्या कलियुगाची बदलती नांदी
बदलत्या समाजात बदलणारी जुगलबंदी
बदलत्या कलियुगाची बदलती रीत न्यारी
बदलणाऱ्या भाषेची बदलणारी बात प्यारी

### विश्वास

दीपक सोमनाथ डगळे (प्रथम वर्ष विज्ञान)

येतील कितीही क्षण तू डगमगू नकोस
तुझ्या स्वप्नांपासून दूर जाऊ नकोस
तुझा विचार तूच कर
सल्ला देणारे खूप असतात
पण करावे तर आपल्याला लागते
येतील असे काही क्षण विश्वास
तोडण्याचा प्रयत्न करतील
पण तू डगमगू नकोस
प्रत्येकाचे स्वप्न वेगळे असते
प्रत्येकाची वाटही वेगळी
कुणीही कोणता सल्ला देऊ दे
तुझ्या स्वप्नांपासून दूर तू जावू नकोस
तू डगमगू नकोस तुझा
आत्मविश्वास खचू देऊ नकोस.

## आई

आदेश जनार्दन कर्पे (प्रथम वर्ष वाणिज्य)

आई म्हणजे काय असतं ते कुणालाही माहित नसतं
ते कुणालाही कळंत नसतं आणि तेच आपलं मातृत्व असतं
पण ते आपल्याला कळत नसतं
आपल्याला समजवणारी आईच असते.
आणि आपल्याला रडवणारीही आईच असते.
आपल्याला हसवणारी आईच असते.
आपल्याला जग दाखवणारीही आईच असते.
पाण्यातून मासा जसा वर येतो,
आई तशीच आपल्याला जगात आणते
आणि उंच मानेने जगायला शिकवते.
तीच तर आपली आई असते.
पावसाचा एक-एक थेंब खाली पडत असतो
आणि एक दिवस ती सोडून जाते
अशीच तर ती आपली आई असते.
आणि तिची किंमत आपल्याला
ती गेल्यावर कळते
अशीच तर ती आई असते.




## नको करू माणसा तू निसर्गाचा ऱ्हास

कु. श्रध्दा बगाड (प्रथम वर्ष वाणिज्य)

नको करू माणसा तू निसर्गाचा ऱ्हास
निसर्गाविना रे तुझा गुदमरेल श्वास ।।१।।
निसर्गाचे देणं आहे अमाप
अनंत देऊनिया ज्ञान तुजला केले रे महंत
प्रगतीचा त्यानेच तुजला, लावियला ध्यास ।।२।।
दिली तुला बुध्दी, वाणी अन भाव गाणी
नात्यांचा जिव्हाळा रुजविला तुझ्या मनी
निसर्गाचे ऋण तुझ्या डोईवरी खास ।।३।।
निसर्गाने दिले तुज फळे-फुले पक्षी
जन्म-मरणाला तुझ्या तोच आहे साक्षी
तुला हवा आहे खरा त्याचा सहवास ।।४।।
नको तोडू रे जंगले, नको फोडू रे धरणी
होऊनी झुकावे निसर्गाच्या रे चरणी
निसर्गाचा कोप होता, होईल सर्वनाश ।।५।।
निसर्गाच्या इच्छेपुढे तुझे चाले काय रे
निसर्गाशी नाते तुटता रडशील हाय रे,
निसर्गाच्या स्नेहासाठी तोड मोहपाश ।।६।।
तुझ्या निसथार्थ कशी करितो तो रुप अक्राळ
बनुनी धरणी भूकंप महापूर नि दुष्काळ
तोच करी पेश।।७।।
केल्या जरी वाऱ्या तू आनंदी
पंढरी देव सामावला निसर्गात
करी प्राणीमात्रा साह्य
हा पुण्याचा विश्वास ।।८।।



**तो बाप असतो...**

कु. वैष्णवी रावसाहेब वाकचौरे (प्रथम वर्ष वाणिज्य)

आपल्या या जगात येण्यानं,
सर्वात जास्त आनंदी असतो.
आपल्याला लहानाचं मोठं करताना,
वेळप्रसंगी स्वत: लहान होत असतो.
आपलं पोट भरावं यासाठी
स्वत: मात्र, पाणी पिऊन उपाशी झोपत असतो.
स्वत:च्या पायाच्या जखमा लपवून
आपल्याला नवीन चप्पल आणत असतो.
कधीतरी आपल्यावर ओरडल्यावर
नंतर आपल्या मनाचा विचार करत असतो.
स्वत:चा खिसा रीकामा असूनही
आपल्या हातावर मात्र पैसे ठेवत असतो.
मुलीच्या लग्नासाठी अन मुलाच्या
नोकरीसाठी लोकांचे उंबरठे झिजवत असतो.
मुलाला नोकरी लागल्यावर जो,
गावभर ओरडून संगत असतो.
आणि मुलगी सासरी गेल्यावर
एकटाच रडत असतो.
पण आपल्याला मात्र हा बाप
कधी माहीतच नसतो.
कारण एवढं सगळं करूनही
जो नहमी निस्वार्थ भावनेनं जगत असतो,
तो बाप असतो..

* शिक्षक असावेत द्रोणाचार्यासारखे अर्जुन घडवणारे
* शिक्षक असावेत रामकृष्ण परमहंसासारखे विवेकानंदांना घडवणारे
* शिक्षक असावेत साने गुरूजीसारखे मुलांवर प्रेम करणारे
* शिक्षक असावेत समर्थ रामदासांसारखे शिवराय घडवणारे
* शिक्षक असावेत रामनंदासारखे कबीर घडवणारे

**कॉलेजमधला पहिला दिवस**

आज कॉलेजचा पहिलाच दिवस
वर्गात ठेवले पहिले पाऊल
सहजच लागली तीची चाहूल
लेक्चर संपलं सर गेले,
सहजच माझ्या मनात आले
माझ्या इशाऱ्याला होकार आला,
मग दोघेही गेलो कँन्टीनला,
चहा घेतला ठेवला कप,
तरीही आम्ही दोघेही गप्प
माझ्या मनात प्रश्न आला,
विचारावे का नाव तिला?
तिने सांगितले नाव राधा,
म्हणाली उद्या भेटूया दादा,
दादा ऐकताच चक्कर आली,
कळलच नाही ती कधी निघून गेली.

**शब्द**

कु. करूणा सुधाकर सरवदे (द्वितीय वर्ष कला)

शब्द दिली तर हाक,
शब्द मागितली तर मदत.
शब्द उच्चारला तर अर्थ,
शब्दानेच होतो अनर्थ.
शब्द पेटवितात आग,
शब्दच विझवतात आग.
शब्द नसते तर ..
अर्थ नसता कळला कशाचा.
शब्द अन् अर्थ
येतात दोन्ही बरोबर
एकावाचून दुसऱ्याला
अर्थ कशाचा
शब्द आम्हां आधार
भावनांच्या अभिव्यक्तिचा !

# हिंदी विभाग

## गद्य

## अनुक्रमणिका


| लेख | लेखक | पन्ना नं. |
|---|---|---|
| १. संत कबीर के सामाजिक विचार | कु. स्वाती अशोक तळपाडे | ४७ |
| २. पर्यावरण के प्रति मेरी भूमिका | कु. सुलोचना मारुती वाजे | ४८ |
| ३. हिंदी और रोजगार | प्रा. डॉ. बी. टी. शेणकर | ४९ |

# संत कबीर के सामाजिक विचार



कु. स्वाती अशोक तळपाडे
प्रथम वर्ष कला

संत कबीरदास भक्तिकाल की संत ज्ञानाश्रयी शाखा तथा निर्गुण भक्तिधारा के प्रवर्तक माने जाते है। कबीर का जन्म एवं मृत्यु आदि के विषय में अनेक मतमतांतर प्रचलित है। जनश्रृति के अनुसार इनका जन्म विधवा ब्राह्मणी की कोख से हुआ था। जो लोकलाज के कारण अपने इस शिशु को लहराते तालाब के निकट छोड गई थी। भाग्य से जुलाह दम्पती निरू और निमा वहाँ से गुजर रहे थे। उन्होने इस बालक को उठा लिया और इसका पालन पोषण किया और इसका नाम कबीरदास रखा। कबीर का जन्म सन १४५५ में तथा मृत्यु सन १५७५ में मगहर में हुई। रामानंद कबीर के गुरू है। कबीर के परिवार के संबंध में अनेक जन श्रुतियाँ प्रचलित है। कहते हैं, उनकी पत्नी का नाम लोई था। तथा उनके पुत्र का नाम कमाल और पुत्री का नाम कमाली था। कबीर का मन गृहस्थी जीवन में नहीं लगा। वे आजीवन एक फक्कड के रूप में समाज सुधारक और भक्ति और ज्ञान का उपदेश करते रहें। जब उनकी मृत्यु १५७५ में मगहर में हुई तब उनके दाहसंस्कार को लेकर हिंदू-मुस्लिमों में विवाद हुआ। हिंदू इन्हें जलाना चहाते थे और मुसलमान इनको दफनाना। इस घटना को लेकर लोकविश्वास है, कि इस झगडे के समय कबीर का मृत शरीर लुप्त हो गया था, और वहाँ पर सिर्फ फुल रह गये थे।

कबीर निर्भिक, उदार, सत्यवादी, अहिंसावादी, प्रेम के समर्थ का बाह्यडम्बर विरोधी, क्रांतिकारी समाज सुधारक थे। उनमें साहस एवं विश्वास था। वे तत्कालीन शासक, सिकंदर लोदी के सामने झुके नही और न हिंदू मुस्लिमों के रोष से विचलित हुए। कबीर पढे लिखे नहीं थे। उन्होंने दूर-दूर के प्रदेशों की यात्रा करके, समाज और धर्म रूपों का विस्तृत अध्ययन किया। कबीर के बीजक तीन भाग-है- साखी, सबद और रमैनी।

कबीर ने निर्गुण निराकार परमात्मा को अनेक नामों से पुकारा है। जैसे अल्लाह, खुदा, रहीम, केशव, राम, गोविंद, हरि आदि। उनके राम दशरथ के पुत्र राम नहीं है, बल्कि उनका ब्रह्म निर्गुण निराकार एवं अरूप है। उसका न मुख हैं, न माथा, न रुप है। वह पुष्प गंध से भी सूक्ष्म तत्व है। अत: वह घट-घटवासी है। उसे बाहर ढूँढने की आवश्यकता नही है।

कबीर का जन्म ऐसे समय में हुआ था, जब समाज अनेक बुराइयों से ग्रस्थ था। छुआछुत, अंधविश्वास रुढियों का बोल बाला था। और हिंदु-मुस्लिमों में दंगाफसाद हो रहा था। धार्मिक पाखंड बढ रहा था। हिंदु-मुस्लिम एकता के लिए उन्होंने दोनों धर्मो के पाखंडो का खंडन किया। कबीर ने हिंदूओं से कहा की तुम अपने को श्रेष्ठ मानते हो। अपना घडा किसी को छूने नहीं देते परंतु तब तुम्हारी उच्चता कहाँ चली जाती है जब वेश्यागमन करते हो। इसी प्रकार उन्होंने मुसलमानों के नमाज पर जोरदार प्रहार किया

प्रवरा मेडिकल ट्रस्ट, प्रवरानगर यांचे वतीने महाविद्यालयात आयोजित सर्वरोग निदान शिबिरात रुग्णांची नोंदणी करताना पी.एम.टी. प्रवरानगर येथील कर्मचारी व रुग्णांची झालेली गर्दी




हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे वतीने मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमात शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. विनंती केसरकर (एच.पी.सी.एल. मुंबई) समवेत संस्थेचे सचिव मा. टी. एन. कानवडे, प्राचार्य डॉ. बी. एस. देशमुख



हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे वतीने मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमात शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांसमवेत मा. विनंती केसरकर (एच.पी.सी.एल. मुंबई) समवेत संस्थेचे सचिव मा. टी. एन. कानवडे, प्राचार्य डॉ. बी. एस. देशमुख, मा. एस. टी. येलमामे, मा. श्रीराम पन्हाळे

## A few things your mom may not have told you:

Miss. Kajal Deshmukh
12 th Commerce

She loves you more than herself,
She has watched you while you were asleep
Everytime you're upset, her heart sinks.
You make her life meaningful
She inspire her and give her hope.
She smile knowing you are her child
You could NEVER disappoint her
She thinks you are one in a million
You're the best thing that
has ever happened to her.



## My Mother

Miss. Shubhangi Papal
12 th Commerce



Mom is mine I am mom's.
She brought me in to this world
She'd do lot of hardship to raise me
Mom is mine, I am mom's
I' ll look beautiful, just because of her
I' ll learn a lot, just because of her
I' ll lead the world, just because of her
I' ll make my life, just because of her
She'd teach me to stay strong
She'd fight with the world for me
No one will stand behind me, but she
She'll be friend me. yes-yes she.
Thank you very much, my dear mother
God is second first is mother
Tears rolling down, while writing the poem
I bow to bowing down, dear mother.

## Thoughts of My Life

*Miss. Pranali Bhanudas Bhor*
*11 th science*

### Imagine

Imagination is the begining
of creation we imagine
What we desire, we will
What we imagine,
and at last we create what we will

### Dreams

Your vision is the promise
of what you will one day be
your idea is the prophecy of what
you shall at last unveil.

## College

*Miss. Komal Sunil Shelke*
*12 th Science*

I want a college
Which gives me
so much knowledge
having so many freedom
Like my own kingdom
also have some discipline
all at mosphere is neat & clean
My principal is too cool
Garden is also most beautiful
Teachers are my good friends
who is with me till the ends
At recepies in my canteen
to much tasty & healthy food
I have seen my library is so helpful
I really forget my school
my college campus is fresh
& have so greenery here.
no problem about money
our teaching is very well
we never wait for the bell
my college is not like cage
In education no limit of age
my college is like a fantasy
world it is not less than a add
I am busy in my college
any one wanna come to
get knowledge.

## LIFE IS ACCOUNTANCY

*Miss. Kajal Deshmukh*
*12 th Commerce*

Life is Accountancy
What comes I debit What goes I credit
My birth is my opening stock
my ideas are my Assets
My views are my liabilities
my happiness is my profit
my sorrow is my loss
Heat is friend Assets
soul is my good coil
Duties are my income
working is my outstanding
expenses friendship is
my hidden adjustment
character is my capital
Bad things always depreciate
good things always appreciate
knowlege is my instrument
practice is my habit
my mind is my bank balance
Thinking is my current assets
Behavior is my journal entry
Aim is my tally balance sheet
Death is my closing stock

## Friendsheep

*Miss. Komal Sunil Shelke*
*12 th science*

Friendship is not a game to play
It is not a word to say.
It does not start in March & in May
It is yesterday, today tomorrow
and everyday.

# वार्षिक अहवाल

## सन
## २०१८ - २०१९

## अनुक्रमणिका


१. वार्षिक अहवाल

१. विद्यार्थी विकास मंडळ – प्रा. एस. डी. कडलग
२. राष्ट्रीय सेवा योजना – डॉ. आर. आर. सोनवणे
३. राष्ट्रीय छात्र सेना – ले. आर. सी. मुठे
४. वादविवाद व वक्तृत्व – प्रा. एस. बी. शिंदे
५. कला मंडळ – प्रा. डॉ. द. के. गंधारे
६. विज्ञान मंडळ – प्रा. डी. व्ही. धोक्रट
७. सहल विभाग – प्रा. पी. टी. करंडे
८. नॅक विभाग – प्रा. डॉ. बी. के. टपळे
९. परीक्षा विभाग – प्रा. एल. एल. वाळे
१०. संगणक विभाग – प्रा. ए. बी. आवारी
११. जिमखाना विभाग – प्रा. व्ही. बी. नवले
१२. आरोग्य विभाग – प्रा. के. जे. काकडे
१३. स्थावर मालमत्ता विभाग – प्रा. एल. बी. काकडे
१४. ग्रंथालय विभाग – प्रा. ए. एस. शाळीग्राम
१५. वाणिज्य विभाग – प्रा. डॉ. सौ. आर. ए. कढणे
१६. विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास विभाग – प्रा. डॉ. सौ. आर. ए. कढणे
१७. महाविद्यालय तक्रार निवारण समिती – प्रा. डॉ. बी. वाय. देशमुख
१८. इंग्रजी वाङ्मय मंडळ – प्रा. ए. डी. सातपुते
१९. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ – प्रा. एस. डी. कडलग
२०. शिक्षक प्रबोधिनी विभाग
२१. बहि:शाल शिक्षण केंद्र

२. वैयक्तिक अहवाल
३. महाविद्यालयास मान्यवरांच्या भेटी
४. प्रथम क्रमांकाचे मानकरी
५. विद्यापीठ गीत
६. पसायदान

# वार्षिक अहवाल

**शैक्षणिक वर्ष २०१८ - २०१९**

*** विद्यार्थी विकास मंडळ - प्रा. एस.डी.कडलग**

या विभागामार्फत अनेक योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या हिताचे व उपयोगाचे अनेक कार्यक्रम राबविण्यात आले. यामध्ये गरीब होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेंतर्गत २५४ विद्यार्थी-विद्यार्थिनींना कामे देण्यात आली. बागबगीचा, गांडुळखत, नर्सरी, फळबाग, भाजीपाला, जलतरण तलाव, ग्रंथालय, महाविद्यालय परिसर स्वच्छता इ. कामांमधून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

*** २०१८ - २०१९ या शैक्षणिक वर्षात विभागामार्फत खालील उपक्रम राबविले.**

आपत्ती व्यवस्थापन शिबीर, निर्भय कन्या अभियान शिबीर, विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास शिबीर, आपत्कालिन मदत निधी, मतदार नोंदणी अभियान, विशेष मार्गदर्शन योजनेंतर्गत विविध विषयांसाठी व्याख्यानमाला, पर्यावरण दिन, वृक्षारोपण, महात्मा गांधी जयंती, दक्षता जागरूकता सप्ताह, युवक महोत्सव, राज्यस्तरीय गिर्यारोहण शिबीर सहभाग, संविधान दिन तसेच या विभागामार्फत विद्यार्थिनी मंच, तक्रार निवारण, ॲन्टी रॅगिंग कमिटी यांच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या समस्या सोडविण्यात आल्या. तर राजर्षि शाहू महाराज गुणवंत विद्यार्थी, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती मिळण्यासाठी प्रयत्न केले.

*** राष्ट्रीय सेवा योजना** - डॉ. आर. आर. सोनवणे

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महाविद्यालयास ३०० विद्यार्थ्यांचे युनिट मंजुर केले आहे. या विभागाअंतर्गत स्वच्छता अभियान, भंडारदरा पर्यटकांना मार्गदर्शन, पर्यावरण, एडस जनजागृती, भारतीय पर्यावरण दिन, सार्वजनिक स्वच्छता, गणेशोत्सवात राजूर पोलीसांना मदत, या वर्षाचे विशेष हिवाळी शिबीर दि. १३ डिसेंबर २०१८ ते १९ डिसेंबर २०१८ या कालावधीत शेलद, ता.अकोले, येथे पार पडले. शिबीरात १५० स्वयंसेवकांनी स्वच्छता अभियानांतर्गत जनजागृती घडवून आणली.

कु. धनंजय मोहिते याचा पुणे ते पंढरपुर दिंडीत सहभाग तसेच सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणीत सहभाग.

कु. मुकुंद पवार याचा प्रजासत्ताक दिन पूर्वनिवड चाचणीत सहभाग तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे आपत्ती व्यवस्थापन शिबीरात सहभाग.

नियमित कार्यक्रमांत वृक्षारोपण, जागतिक योग दिवस, स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान, मतदान नोंदणी अभियान, जागतिक आदिवासी दिन, संविधान दिन, स्वातंत्र दिन, रस्ता सुरक्षा अभियान, राष्ट्रीय सेवा योजना दिन, महात्मा गांधी जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, सावित्रीबाई फुले जयंती, रक्षाबंधन इ. विविध उपक्रम राबविण्यात आले.

*** राष्ट्रीय छात्र सेना** - ले. आर. सी. मुठे

या शैक्षणिक वर्षात ५७ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अहमदनगर यांचे कडून ५० छात्र सैनिकांना मान्याता मिळाली. सदर वर्षात एकूण ६ मुलींना प्रवेश देण्यात आले. या वर्षी वृक्षारोपण, जागतिक योग दिवस, स्वच्छ व स्वास्थ भारत अभियान, मतदान नोंदणी अभियान, जागतिक आदिवासी दिन, संविधान दिन, स्वातंत्र दिन, रस्ता सुरक्षा अभियान. इ. विविध उपक्रम राबविण्यात आले. एस.यु.ओ. पवार मुकुंद शामराव व सीक्युएमएस फापाळे वैभव यांनी औरंगाबाद येथे ईबीएसबी- १ राष्ट्रीय शिबीरात सहभाग नोंदविला. कॅडेट कुरकुटे समीर व कॅडेट साबळे प्रसाद यांनी थलसैनिक शिबीर. अमरावती येथे सहभाग.

*** वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा** - प्रा. एस.बी. शिंदे

या विभागाने २८/१२/२०१८ व २९/१२/२०१८ या कालावधीत कै. माधवराव दिगंबर उमराणी स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धा व कै. होनाजी तुकाराम कोंडार स्मृती करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा आयोजित केल्या. तसेच या विभागामार्फत विविध महाविद्यालयांमध्ये स्पर्धेसाठी विद्यार्थी संघ पाठविले. आयुर्वेद महाविद्यालय संगमनेर व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय दोडी येथे संघ पाठविले.

**※ कलामंडळ - प्रा. डॉ. द. के. गंधारे**

या शैक्षणिक वर्षात दि. ६ सप्टेंबर २०१८ रोजी गीतकार गोपी वाकचौरे यांच्या हस्ते कला मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. कलामंडळामार्फत अनेक उपक्रम राबविण्यात आले. दि. २९ जानेवारी २०१८ रोजी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त या मंडळाने विविध गुणदर्शनांचा कार्यक्रम आयोजित केला.

**※ विज्ञान मंडळ - प्रा. डी. व्ही. धोक्रट**

या शैक्षणिक वर्षात मा. प्राचार्य डॉ. बी.एस देशमुख यांच्या हस्ते विज्ञान मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच विभागातर्गत भित्तीचित्र स्पर्धा, सायन्स क्विज व आवर्त सारणी पाठांतर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

**※ सहल विभाग - प्रा. पी. टी. करंडे**

या विभागांतर्गत विविध शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. भूगोल विभागाची सहल कोकण दर्शन येथे आयोजित करण्यात आली. रसायनशास्त्र विभागाची सहल दि. ११ व १२ जानेवारी २०१९ रोजी सुदर्शन केमिकल्स, रोहा येथे आयोजित करण्यात आली. द्वितीय वर्ष विज्ञान वर्गाची सहल गणपती पुळे - हरिहरेश्वर येथे आयोजित करण्यात आली आहे. विद्यार्थिनी वसतीगृह विभागाची सहल दि. ३० डिसेंबर २०१८ रोजी लेण्याद्री- भिमाशंकर येथे आयोजित करण्यात आली होती. वाणिज्य विभागाची सहल अगस्ती सह. साखर कारखाना येथे आयोजन करण्यात आली. तृतीय वर्ष वनस्पतीशास्त्र या विषयाची सहल कोकण दर्शन येथे आयोजित करण्यात आली.

**※ नॅक विभाग - प्रा. डॉ. बी. के. टपळे**

१) शैक्षणिक वर्ष २०१८ मध्ये स्टाफ साठी नॅक नवीन गाईडलाईन या विषयी तज्ञांचे व्याख्याने आयोजित करण्यात आले. दि. १०/८/२०१८ रोजी. प्रा. डॉ. कमलाकर भट आणि प्रा. डॉ. बी.एम. गायकर यांनी नॅकची नवीन गाईडलाईन आणि नॅक तयारी या विषयावर महाविद्यालयात येवून मार्गदर्शन केले.

२) महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी Short Term Courses सुरू करण्यात आले.

३) AAA आणि SSS या विषयी IQAC सदस्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

४) सन २०१७ -२०१८ चा AQAR नॅक कार्यालय, बेगलोर ला दि. २७/१२/ २०१८ रोजी पाठविण्यात आला.

५) IQAC विभागात 'Central Processing Unit' कार्यरत असून महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वेगवेगळ्या उपक्रमामध्ये सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे संग्रहित केले जातात.

६) दि. ५/व ६ जानेवारी २०१९ रोजी कला शाखेकडून सामाजिक शास्त्रे विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सदर प्रसंगी आंतरराष्ट्रीय जर्नल अजंता मध्ये शोधनिबंधांचे प्रकाशन करण्यात आले.

७) दि. १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी विज्ञान विभागामार्फत 'Recent Trends In Environmental Science' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सदर प्रसंगी आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये ५५ शोधनिबंधाचे प्रकाशन मा. पंडित विद्यासागर, कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि मा. प्राचार्य , टी.एन.कानवडे, सचिव, सत्यनिकेतन यांचे हस्ते करण्यात आले.

८) सन २०१८ - २०१९ मध्ये RUSA या संस्थेकडे वेगवेगळ्या रोजगाराभिमुख कोर्सेससाठी प्रस्ताव पाठविण्यात आले.

९) सन २०१८ - २०१९ या वर्षात HRD, New Delhi विभागाकडे प्रस्ताव करण्यात आला.

**※ परीक्षा विभाग - प्रा. एल. एल. वाळे**

विद्यापीठ मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयात मार्च २०१८ विद्यापीठ परीक्षा, ऑक्टोबर २०१८ व सत्रांत परीक्षा सुरळीतपणे पार पाडल्या गेल्या.

*** संगणक विभाग – प्रा. ए. बी. आवारी**

या शैक्षणिक वर्षात संगणक विभागामार्फत प्रथम वर्ष कला. विज्ञान व वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी संगणक साक्षरता कार्यक्रम राबविण्यात आला. इ.११ वी व १२ वी विज्ञान व वाणिज्य तृतीय वर्ष विज्ञान व एम.एस्सी. भाग १ व २ विद्यार्थ्यांना संगणक साक्षरतेचे प्रात्यक्षिक देण्यात आले. विभागामार्फत शिक्षक, शिक्षकेतर व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी संगणकीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

*** जिमखाना विभाग – प्रा. व्ही. बी. नवले**

या शैक्षणिक वर्षात जिमखाना विभागामार्फत आंतरमहाविद्यालयीन जलतरण मुली व मुले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यात कु. प्रियंका शिंदे, पथवे सोमनाथ, मुकुंद पवार, घारे प्रविण यांची आंतरविभागीय जलतरण स्पर्धेमध्ये अहमदनगर जिल्ह्याच्या संघात निवड, सत्यनिकेतन संस्थेच्या विद्यमाने व अ‍ॅड. एम.एन.देशमुख महाविद्यालय जिमखाना विभागाच्या वतीने साई कुस्ती केंद्र चालविले जाते. आज मितीस ५० मुले व ७ मुली कुस्ती प्रशिक्षण घेत आहेत.

*** आरोग्य विभाग – प्रा. के. जे. काकडे**

या विभागामार्फत प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य, एम.एस्सी व महाविद्यालयीन वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तसेच या विभागामार्फत मुलींची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली.

*** स्थावर मालमत्ता विभाग – प्रा. एल. बी. काकडे**

या शैक्षणिक वर्षात स्थावर मालमत्ता विभागाने महाविद्यालयातील पाणी व्यवस्था, साफसफाई, जिमखाना, जलतरण तलाव, विज्ञान भवन, ग्रंथालय, पार्किंग व सर्व वसतिगृहे यांचे यशस्वी व्यवस्थापन केले.

*** ग्रंथालय विभाग – प्रा. ए. एस. शाळीग्राम**

या शैक्षणिक वर्षात ग्रंथालयात आजपर्यंत एकूण १८६०० इतकी ग्रंथ संख्या आहे. त्यामध्ये शब्दकोश, चारित्रग्रंथ, ज्ञानकोश, स्पर्धा परीक्षा, सामान्य ज्ञान, चालू घडामोडी व अद्यायावत माहिती देणारे ग्रंथ यांचा समावेश आहे. Inflibnet कडून इलेक्ट्रॉनिक नियतकालिके ग्रंथालयात पहावयास उपलब्ध आहेत. ग्रंथालय विभाग संगणकीकृत करण्यात आला आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्रपणे अभ्यासिका अस्तित्वात आहेत.

*** वाणिज्य विभाग – डॉ. आर. ए. कढणे**

दि. २४/८/२०१८ रोजी वाणिज्य मंडळाचे उद्घाटन डॉ. एस.बी. शिंदे, नेवासा महाविद्यालय यांच्या हस्ते करण्यात आले. ८ डिसेंबर रोजी एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. दि. २३/१/२०१९ रोजी कॉमर्स फेस्टिवल चे आयोजन करण्यात आले. वाणिज्य विभागांतर्गत वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

*** विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास विभाग – डॉ. आर. ए. कढणे**

विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास विभागांतर्गत मा. सुनीता कोडे, डॉ. गाडेकर, अ‍ॅड, गडाख आणि मा. स्मिता गुणे यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थिनींसाठी रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, पाककला स्पर्धा, इ, स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनी निर्भय होण्यासाठी कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

*** महाविद्यालय तक्रार निवारण समिती – डॉ. बी. वाय. देशमुख**

शैक्षणिक वर्ष २०१८ ते –१९ मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी समितीने प्रयत्न केले.

*** इंग्रजी वाङ्मय मंडळ**

इंग्रजी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन ११ सप्टेंबर २०१८ रोजी डॉ. तासिलदार, संगमनेर कॉलेज यांचे हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी स्पोकन इंग्लीश कोर्स सुरू करण्यात आला. दि. १७ जानेवारी २०१९ रोजी मा.प्रा. चं. का. देशमुख यांचे सामाजिक संस्थेमार्फत गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लीशची पुस्तके व डिक्शनरींचे मोफत वितरण करण्यात आले.

**※ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्र राजूर**

महाविद्यालयात सुरू असलेल्या यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्र राजूर मध्ये शै. वर्ष २०१८ –१९ मध्ये एकूण ५२७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर केंद्राकडून बी. ए. पदवी अभ्यासक्रम शिकविला जातो. सदर केंद्रामार्फत १०० विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिटही चालविले जाते.

**※ शिक्षक प्रबोधिनी विभाग**

महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक प्रबोधिनी विभागामार्फत शै. वर्ष २०१८ –१९ मध्ये मा. डॉ. बी.एम. गायकर व डॉ. कमलाकर भट, अहमदनगर महाविद्यालय यांचे नॅक विषयी मार्गदर्शनपर व्याख्यान. डॉ. प्रणाली निर्मळ, घाटकोपर मुंबई यांचे आयुर्वेद व आरोग्य विषयपर मार्गदर्शन.

**※ बहि:शाल शिक्षण केंद्र**

महाविद्यालयात बहिशाल शिक्षण केंद्र कार्यरत असून विभागाअंतर्गत दि. ७,८,व ९ डिसेंबर २०१८ या कालावधीत शेलद गावी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व ॲड. एम.एन.देशमुख महाविद्यालय राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला संपन्न झाली. सदर व्याख्यानमालेत श्रीमती अनुराधा आहेर, प्रा. विलास दिघे व श्री. भापकर गोरक्ष यांची व्याख्याने झाली.

# वैयक्तिक अहवाल

**शैक्षणिक वर्ष २०१८ - २०१९**

**१) प्राचार्य डॉ. बी.एस.देशमुख**

इंडोनेशिया येथे आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग घेऊन शोधनिबंधाचे वाचन.

**२) प्रा. डॉ. द. के. गंधारे**

- महाविद्यालयात कलामंडळ प्रमुख
- रतनगड नियतकालिक सहसंपादक पदी नेमणूक
- विविध महाविद्यालयामध्ये मराठी विषयाच्या मुलाखतीसाठी विषयतज्ञ म्हणून निवड.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरात शिबीरार्थींना शेलद येथे व्याख्यान
- दि. २८ व २० डिसेंबर २०१८ रोजी साहेबराव ढमढेरे महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे पुणे येथे राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.
- दि. १९ जानेवारी २०१९ रोजी अकोले महाविद्यालय येथे राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.

**३) प्रा. डॉ. आर.डी. ननावरे**

- ज्ञानोदय बहुउद्देशिय संस्था टाकळीभान यांचेकडून राज्यस्तरीय शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार प्राप्त.
- राजर्षी शाहू महाराज आदर्श प्राध्यपक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महाविद्यालयात कला शाखा प्रमुख तसेच जनमाहिती अधिकारी म्हणून कार्यरत.
- अगस्ती महाविद्यालय येथे विषयतज्ञ म्हणून उपस्थिती .
- तळेगाव ढमढेरे आणि दहेगाव. ता. नेवासा येथील महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन
- अकोले महाविद्यालय. एस.एस.जी.एम महाविद्यालय कोपरगाव आणि दादापाटील राजळे महाविद्यालय पाथर्डी येथे राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.
- शाहू मंदिर महाविद्यालय पुणे व के.टी.एच.एम. महाविद्यालय नाशिक येथे आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.
- कादंबरीकर माधव कोंडविलकर भाग १, हा स्वलिखित समीक्षा ग्रंथ प्रकाशित.

४) डॉ. बी.के. टपळे
- International Peer-revieved Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Chief Editor पदी निवड.
- शैक्षणिक वर्ष २०१८ -१९ पासून IQAC समन्वयक पदी कार्यरत.
- महाविद्यालय विकास समिती सदस्य.
- कला व वाणिज्य महाविद्यालय बेलापूर आणि खा. गोविंदराव आदिक लॉ कॉलेज श्रीरामपूर येथे नॅक नवीन गाईडलाईन साठी मार्गदर्शनपर व्याख्यान.
- दि. ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी गृहविज्ञान महाविद्यालय लोणी येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत सक्रिय सहभाग.
- दि. ७ व ८ जानेवारी २०१९ रोजी के.जे. सोमय्या महाविद्यालय कोपरगाव येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.
- दि. १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी अॅड एम.एन.देशमुख महाविद्यालय येथे दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन व प्रकाशन.
- शै. वर्ष २०१८ - १९ मध्ये महाविद्यालयाने लघुसंशोधन प्रकल्पास १६५००/- रु. अनुदान मंजूर
- विविध International Journal मध्ये ३ शोधनिबंध प्रकाशित.

५) डॉ. बी.टी.शेणकर
- भारतीय दलित साहित्य अकादमी नवी दिल्ली यांचे वतीने महात्मा ज्योतिबा फुले फेलोशिप सन्मान प्रदान.
- महाविद्यालय विकास समिती सदस्य पदी निवड.
- दि. १७ सप्टेंबर २०१८ रोजी औरंगाबाद महाविद्यालय येथे राष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग.
- दि. २१ व २२ डिसेंबर २०१८ रोजी पारनेर महाविद्यालय येथे राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- दि. ११ व १२ जानेवारी २०१९ रोजी नारायणगाव महाविद्यालयात येथे राष्ट्रीय चर्चाससात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- दि. १८ जानेवारी २०१९ रोजी राहता महाविद्यालय येथे राष्ट्रीय चर्चासात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- दि. १९ जानेवारी २०१९ रोजी नाशिक महाविद्यालय येथे राष्ट्रीय चर्चासात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.

६) प्रा. पी.टी.करंडे
- दि. ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी राज्यस्तरीय कार्यशाळा सहसंयोजक म्हणून नेमणूक.
- दि. १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रीय कार्यशाळेत संयोजन समिती सभासद पदी नेमणूक.
- दि. २१ व २२ जानेवारी २०१९ रोजी शिरपूर महाविद्यालय येथे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग.
- दि. १५ जानेवारी २०१९ रोजी अकोले महाविद्यालयात भूगोल दिननिमित्त व्याख्यान.

७) प्रा. एल. बी. काकडे
- महाविद्यालयाच्या स्थावर मालमत्ता अधिकारी पदी निवड.
- दि ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी अॅड्. एम.एन.देशमुख महाविद्यालय राजूर राज्यस्तरीय कार्यशाळेत शोधनिबंधाचे वाचन.
- दि. ८ व ९ जानेवारी २०१९ राजी एस.एम.बी.एस.टी. महाविद्यालय संगमनेर येथे राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.
- दि. ११ व १२ जानेवारी २०१९ रोजी बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव येथे राज्यस्तरीय कार्यशाळेत शोधनिबंधाचे वाचन.

८) प्रा. डॉ. आर.आर. सोनवणे
- भारतीय दलित साहित्य अकादमी नवी दिल्ली यांच्याकडून महात्मा ज्योतिबा फुले फेलोशीप सन्मान २०१८ पुरस्कार प्राप्त
- ज्ञानोदय बहुउद्देशीय संस्था टाकळीभान यांचेकडून राज्यस्तरीय शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार प्राप्त.
- के.जे. सोमया कॉलेज कोपरगाव व बी.एस.टी. कॉलेज संगमनेर येथे झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सक्रिय सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- पारनेर पाथर्डी येथे झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- गांधी महाविद्यालय कडा व बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव येथे राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.

९) प्रा. एस.डी.कडलग
- विद्यार्थी विकास मंडळ समन्वयक पदी निवड.
- रायपुर, छत्तीसगड येथे आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग, शोधनिबंधाचे वाचन.
- दि. १८ व १९ जानेवारी २०१९ राजी अॅड. एम.एन.देशमुख महाविद्यालय येथे दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंधाचे प्रकाशन
- विद्यार्थी विकास मंडळ निर्भय कन्या अभियान योजना अंतर्गत विविध प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन.
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाच्या आयोजित केलेल्या सर्व कार्यशाळांना उपस्थिती.
- शै. वर्ष २०१८ - १९ मध्ये महाविद्यालयाने लघुसंशोधन प्रकल्पास १००००/ रु. अनुदान मंजूर

१०) प्रा. डॉ. बी. वाय. देशमुख
- शारजा विद्यापीठ दुबई येथे आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधाचे वाचन व समन्वयक म्हणून काम पाहिले.
- बहि:शाल वक्ते व केंद्र कार्यवाह यांचे संयुक्त कृती सत्रात सहभाग.
- सत्यनिकेतन कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती.
- इंडियन इकॉनॉमिक्स असोसिएशनच्या १०१ व्या राष्ट्रीय परिषदेसाठी आय.एस.आय.डी. कॅम्पस नवी दिल्ली येथे शोध निबंधाचे वाचन व प्रकाशन.
- बाबुरावजी घोलप महाविद्यालयात पी.एचडी. तोंडी परीक्षेस संशोधक मार्गदर्शक म्हणून उपस्थिती .
- एस.एम.बी.एस.टी. महाविद्यालय संगमनेर येथे एम.फिल. तोंडी परीक्षा विषयतज्ज्ञ म्हणून उपस्थिती.
- विविध महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेंतर्गत व्याख्यान.

११) प्रा. डॉ. एम. बी. शिंदे
- दि. २२ जून २०१८ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्याकडून पी.एचडी. पदवी प्रदान.
- दि. ४ व ५ जानेवारी रोजी अॅड, एम.एन.देशमुख महाविद्यालयात झालेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
- दि.८ व ९ जानेवारी २०१९ रोजी एस.एम.बी.एस.टी. महाविद्यालय संगमनेर येथे राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.

१२) प्रा. एम. एस. साळुंके
- ज्ञानोदय बहुउद्देशीय संस्था टाकळीभान यांचेकडून राज्यस्तरीय शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार प्राप्त.
- दि. १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सक्रिय सहभाग.
- दि. ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी गृहविज्ञान लोणी येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत सक्रिय सहभाग.

१३) प्रा. एस. के. थोरात
- ज्ञानोदय वहुउद्देशीय संस्था टाकळीभान यांचेकडून राज्यस्तरीय शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार प्राप्त.
- महाविद्यालय विकास समितीत शिक्षक प्रतिनिधी म्हणून निवड
- शै. वर्ष २०१८ - १९ मध्ये महाविद्यालयाने लघुसंशोधन प्रकल्पात २००००/ - रु अनुदान मंजूर.
- डॉ. पं. रविशंकर विद्यापीठ रायपूर (छत्तीसगढ) येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत उत्कृष्ट पेपर प्रथम क्रमांक प्राप्त.
- कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नारायणगाव येथे शॉर्ट टर्म कोर्स पूर्ण.
- पारनेर महाविद्यालय येथे झालेल्या आंतराष्ट्रीय परिषदेमध्ये शोधनिबंधाचे वाचन.
- नारायणगाव महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेमध्ये व्याख्यान.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरात शिबीरार्थींना शेलद येथे व्याख्यान
- विविध International Journal मध्ये चार शोधनिबंध प्रकाशित.

१४) प्रा. व्ही. बी. नवले
- कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नारायणगाव येथे शॉर्ट टर्म कोर्स पूर्ण
- दि. २५ जून ते १५ जुलै २०१८ या कालावधीत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इंदापूर येथे रिफ्रेशर कोर्स पूर्ण.

१३) प्रा. एल. एल. वाळे
- ॲड एम.एन.देशमुख महाविद्यालय राजूर येथे दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत सक्रिय सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- अहमदनगर कॉलेज, अहमदनगर येथे झालेल्या महाविद्यालयीन परीक्षा अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत सहभाग.

१४) प्रा. बी. एम. पवार
- दि. १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये शॉर्ट टर्म कोर्स पूर्ण.

१५) प्रा. बी. आर. होले
- दि. २०/११/२०१८ ते १०/१२/२०१८ या कालावधीमध्ये इंग्रजी विषयाचा रिफ्रेशर कोर्स पूर्ण.

१६) डॉ. डी.बी.तांबे
- भारतीय दलित साहित्य ॲकडमी, दिल्ली तर्फे दिला जाणारा वीरांगना सावित्रीबाई फुले फेलोशिप राष्ट्रीय पुरस्कार २०१८ प्राप्त.
- दि. १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या सहसमन्वयक पदी नेमणूक आणि शोधनिबंधाचे वाचन व प्रकाशन
- दि. ७ व ८ जानेवारी २०१९ रोजी के. जे.सोमय्या महाविद्यालय कोपरगाव येथे राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन व सक्रिय सहभाग. विविध International Journal मध्ये ४ शोधनिबंध प्रकाशित.

१७) प्रा. आर. सी. मुठे
- १८ व १९ जानेवारी २०१९ जानेवारी २०१९ रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सक्रिय सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- महाविद्यालय IQAC सदस्य पदी कार्यरत.
- अहमदनगर येथे झालेल्या राष्ट्रीय छात्र सेना वार्षिक शिबीरात सहभाग.

१८) डॉ. आर. ए. कढणे
- दि. १४ व १५ डिसेंबर २०१८ सी. डी. जैन महाविद्यालय श्रीरामपूर येथे राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- दि. २१ डिसेंबर २०१८ सौ. सुशिलाबाई काळे महाविद्यालय येथे राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंधाचे वाचन.
- दि. ४ व ५ जानेवारी रोजी ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात झालेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन विविध International Journal मध्ये ६ शोधनिबंध प्रकाशित.

१९) प्रा. एस. आर. अस्वले
- दि. २२ व २३ जानेवारी २०१९ रोजी सोनई महाविद्यालय येथे झालेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.
- दि. २८ व २९ जानेवारी २०१९ रोजी तळेगाव दिघे येथील महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.
- दि. ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी ॲड्. एम.एन.देशमुख महाविद्यालय राजूर राज्यस्तरीय कार्यशाळेत शोधनिबंधाचे वाचन.

२०) प्रा. एन. यू. देशमुख
- दि. १८ व १९ जानेवारी रोजी अगस्ती महाविद्यालय अकोले येथे झालेल्या चर्चासत्रात सहभाग.
- दि. २२ व २३ जानेवारी रोजी सोनई महाविद्यालय येथे झालेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.
- दि. ४ व ५ जानेवारी रोजी ॲड. एम.एन. देशमुख महाविद्यालयात झालेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन.

२१) श्री. आर. एम. देशमुख
- दि. १६/२/२०१८ रोजी संगमनेर महाविद्यालयात आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभाग.
- दि. ३/९/२०१८ रोजी न्यू आर्टस कॉलेज अहमदनगर येथे आयोजित केलेल्या बिंदूनामवली कार्यशाळेत सहभाग.

२२) श्री. यु. ए. पवार

- अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथे एकदिवसीय लेखाविषयक कार्यशाळेत सहभाग.
- शैक्षणिक वर्ष २०१८ मध्ये संगमनेर महाविद्यालय येथे राज्यस्तरीय कार्यशाळेत सक्रिय सहभाग.

२३) श्री. सूरज साबळे

- दि. ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी गृहविज्ञान लोणी येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत सक्रिय सहभाग. कला व
- वाणिज्य महाविद्यालय बेलापूर आणि खा. गोविंदराव आदिक लॉ कॉलेज, श्रीरामपूर येथे नॅक नवीन गाईडलाईनसाठी संगणकीय कामकाजाचे मार्गदर्शन.





## महाविद्यालयास मान्यवरांच्या भेटी

सन २०१८ - २०१९

१) मा. श्री. दहिफळे बी. के. , विभागीय सचिव, एच.एस.सी. बोर्ड पुणे विभाग

२) मा. श्री. राहुल द्विवेदी , जिल्हाधिकारी, अहमदनगर

३) प्रा. एस. टी. गायकवाड , रसायनशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

४) मा. मनीषकुमार सिन्हा , प्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, अकोले

५) मा. विवेक सदगीर , प्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, राजूर

६) मा. प्रा. चं. का. देशमुख , संस्थापक अध्यक्ष, संत गाडगेबाबा भानुप्रभाकर सेवा प्रतिष्ठान, संगमनेर

७) मा. डॉ. सतीश व्ही. देवरे , जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार

८) मा. डॉ. मधुकर बी. पाटील , जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार

९) मा. डॉ. अविनाश सिरसाठ , निलया ग्रुप ऑफ एज्यूकेशन, पुणे

१०) मा. मनोज डी. शिंदे , लेखाधिकारी, सहसंचालक, नाशिक

११) मा. डॉ. विजयप्रसाद अवस्थी , एच. पी. टी. महाविद्यालय, नाशिक

१२) मा. प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे , अध्यक्ष, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद

१३) मा. डॉ. कोकाटे प्रकाश रघुनाथ , सदस्य प्राणीशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे

१४) मा. प्रा. डॉ. सुधाकर मुरलीधर कुऱ्हाडे , सदस्य, प्राणीशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे

१५) मा. उध्दव कानडे , मराठी साहित्य परिषद, पुणे

१६) मा. संदीप सांगळे , सदस्य मराठी अभ्यास मंडळ व सदस्य, मानविज्ञान विद्याशाखा , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

१७) मा. डॉ. पंडीत विद्यासागर , माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड

१८) मा. डॉ. संग्राम डी. काळे, शास्त्रज्ञ महात्मा फुले कृषी विद्यापीठ , राहुरी

१९) मा. डॉ. बालाजी घारूळे , रा. से. यो. समन्वयक, अहमनगर

२०) मा. सौ. सुनीता कोडे , सामाजिक कार्यकर्ती, संगमनेर

२१) मा. प्रकाश देशमुख , कार्यक्रम समन्वयक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

२२) मा. श्री. महेंद्र घागरे , सामाजिक कार्यकर्ते

२३) मा. श्री. बंडा जोशी , आकाशवाणी कलाकार, पुणे

२४) मा. श्री. अजित देशमुख , सचिव, महसूल, मंत्रालय, मुंबई

२५) मा. विनंती केसरकर , एच. पी. सी. एल., मुंबई

## प्रथम क्रमांकाचे मानकरी

सन २०१८ - २०१९

**१) दिघे प्रतिभा दगडू** - प्रथम वर्ष कला या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**२) धिंदळे मंगल गोपाळा** - द्वितीय वर्ष कला या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**३) बांडे अमित निवृत्ती** - तृतीय वर्ष कला या वर्गात गुणानुक्रमे प्रथम तसेच कै. राधुजी शंकर पवार यांचे स्मरणार्थ त्याच्या परिवाराने ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून व कै. नथुराम दगडू मुंढे यांचे स्मरणार्थ त्यांच्या परिवाराने ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून पारितोषिक

**४) चौधरी आदित्या भाऊसाहेब** - प्रथम वर्ष विज्ञान या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**५) गुडनर सुरेश भगवान** - द्वितीय वर्ष विज्ञान या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**६) भालेराव सुनील वाळीबा** - तृतीय वर्ष विज्ञान या वर्गात गुणानुक्रमे प्रथम तसेच कै. सी. गं. शेंडे (संस्थापक अध्यक्ष, सत्यनिकेतन) यांनी ठेवलेल्या कायम स्वरुपी ठेवीच्या व्याजातून व मॉडर्न सायंटिफिक कंपनी संगमनेर श्री.बी.एन. दिघे यांनी ठेवलेल्या कायम स्वरुपी ठेवीच्या व्याजातून पारितोषिक

**७) वालझाडे गौरी विष्णू** - तृतीय वर्ष विज्ञान या वर्गात (मुलींमध्ये) गुणानुक्रमे प्रथम व कै. ज्योती लक्ष्मण वाळे यांच्या स्मरणार्थ प्रा. लक्ष्मण लहानू वाळे यांनी ठेवलेल्या कायम स्वरुपी ठेवीच्या व्याजातून पारितोषिक

**८) जाधव कुसुम नामदेव** - तृतीय वर्ष विज्ञान या वर्गात वनस्पतीशास्त्र या विषयात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल श्रीमती शारदा चंद्रकांत बिडवे यांनी त्याचे पती कै. प्रा. सी. एन. बिडवे यांचे स्मरणार्थ ठेवलेल्या कायम स्वरुपी ठेवीच्या व्याजातून पारितोषिक

**९) तांबोळी तबस्सुम लियाकत** - प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**१०) केळकर प्रियंका ज्ञानेश्वर** - द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**११) भोर शाम सुरेश** - तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**१२) मोहिते प्रियंका वसंत** - एम. एस्सी. - भाग १ या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**१३) भागवत धनंजय लक्ष्मण** - एम. एस्सी. - भाग २ या वर्गात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पारितोषिक

**१४) चौधरी राजेंद्र भाऊसाहेब** - तृतीय वर्ष कला या वर्गात राज्यशास्त्र या विषयात गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल सौ. समता ज्ञानेश्वर काकडे यांनी त्याचे वडील कै. कॉ. मुरलीधर नवले यांचे स्मरणार्थ ठेवलेल्या कायम स्वरुपी ठेवीच्या व्याजातून पारितोषिक

**१५) सुकटे सोनाली वसंत** - तृतीय वर्ष कला या वर्गात इंग्रजी या विषयात मुलींमध्ये गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल मा. ॲड्. मनोहरराव देशमुख साहेब (अध्यक्ष, सत्यनिकेतन) यांनी त्याच्या मातोश्री कै. अनुसयाबाई नानासाहेब देशमुख यांचे स्मरणार्थ रोख पारितोषिक

**१६) भांगरे गौरी दिलीप व पिचड स्वाती ज्ञानदेव** - तृतीय वर्ष कला या वर्गात इंग्रजी या विषयात मुलींमध्ये गुणानुक्रमे प्रथम (विभागून) आल्याबद्दल मा. प्राध्यापक बी. आर. होले यांनी कै. उत्तमराव कारभारी गाडेकर यांचे स्मरणार्थ ठेवलेल्या कायम स्वरुपी ठेवीच्या व्याजातून पारितोषिक

**१७) तातळे सखुबाई युवराज** - तृतीय वर्ष कला या वर्गात हिंदी या विषयात मुलींमध्ये गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल कै. का. शां केळकर यांनी ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून पारितोषिक तसेच श्री. वसंत रंगनाथ बोऱ्हाडे यांनी कै. मोहन वसंत बोऱ्हाडे यांचे स्मरणार्थ ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून पारितोषिक

**१८) जाधव भरत शिवराम** - तृतीय वर्ष कला या वर्गात अर्थशास्त्र या विषयात मुलांमध्ये गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल श्री. दिगंबर कांतीलाल जोशी पुणे यांनी त्याच्या वडिलांच्या स्मरणार्थ ठेवलेल्या कायम ठेवीच्या व्याजातून पारितोषिक

**१९) वाळुंज पुष्पा सुभाष** - तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील कै. अनुसयाबाई नानासाहेब देशमुख मुलींच्या वसतिगृहातील आदर्श विद्यार्थिनीस कै. सौ. सुभद्रा हिंदुराव यादव यांच्या स्मरणार्थ प्रा. श्रीमती ललिता यादव यांच्याकडून रु. १५१/- व पारितोषिक

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठातुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतों
हृदयातुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्त्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

- मंगेश पाडगांवकर

# ॥ पसायदान ॥

आतां विश्वात्मकें देवे । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥१॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥२॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥३॥
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥४॥
चलां कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणीचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयुषाचे ॥५॥
चंद्रमे चे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥६॥
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥७॥
आणि ग्रंथोपजीवियें । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ॥८॥
तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥९॥

## ॥ श्री संत ज्ञानेश्वर माऊली ॥

## शमुख महाविद्यालयात 'स्वच्छता पधरवाडा

पुण्यनगरी, १९-८-२०१७

राजूर/प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण राष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत अभ्यास केंद्र ॲड. एम. देशमुख कला वाणिज्य विद्यालय, राजूर येथे समंत्रक विद्यार्थी यांनी राजूर येथील स्थानक परिसर, स्मशानभूमी महाविद्यालयीन परिसरातील स्वच्छता करून शासनाच्या १ ट २०१७ ते १५ ऑगस्ट ७ 'स्वच्छता पंधरवाडा' रा करण्यात आला.

राजूर गावात यशवंतराव ण महाराष्ट्र मुक्त अभ्यास



राजूर : ॲड. एम.एन. देशमुख महाविद्यालयात स्वच्छता अभिया पंधरवाडा अभियान राबविण्यात आले. यावेळी बसस्टँड परिसरा सफाई करण्यात आली. (छाया : विलास तुपे

## पदवीरूपी पंखांना ज्ञानाचे बळ द्या

दिव्य मराठी, २७-२-२०१९

### उपसचिव अजित देशमुख यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

प्रतिनिधी | अकोले

भारतीय तरुणांमधील प्रचंड शक्ती वाया जाण्याचा भीती या उदात्तीकरणामुळे निर्माण झाली. त्यामुळे विद्यार्थिदशेपासून पदवीरूपी पंखांना ज्ञान, विज्ञान व व्यवहार ज्ञानाचे बळ द्या, असे आवाहन महसूल व वनविभागाचे उपसचिव अजित देशमुख यांनी केले.

राजूर येथील एम. एन. देशमुख महाविद्यालयाच्या चतुर्थ पदवीदान दीक्षांत समारंभात ते बोलत होते.



राजूरच्या देशमुख महाविद्यालयात बोलताना उपसचिव अजित देशमुख.

सचिव प्राचार्य टी. एन. कानवडे होते. या वेळी सत्यनिकेतन संस्थेचे सहसचिव मिलिंद उमराणी, एस. टी. येलमामे, नंदकुमार बेल्हेकर, प्राचार्य डॉ. बी. एस. देशमुख उपस्थित होते.

यांनी केले. पदवीप्राप्त विद्यार्थ्यां यादीचे वाचन प्रा. एल. एल. यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पी. करंडे यांनी केले. यासाठी प्रा. के. थोरातांनी परिश्रम घेतले. आ

## सामाजिक शास्त्रातील संशोधनाचा दर्जा सुधारण्याची गरज-डॉ.पाटील



राजूर-येथील ॲड.देशमुख महाविद्यालयात सामाजिक शास्त्र या दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्य उद्घाटनप्रसंगी डॉ.के.के. पाटील. समवेत प्राचार्य डॉ.बाबासाहेब देशमुख, टी.एम.कानवडे, प्रा.भ शमुख आदी.

पुण्यनगरी, १४-१-२०१९

पुण्यनगरी वृत्तसंस्था/राजूर

सामाजिक शास्त्रातील संशोधनामुळे देशातील विविध आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडविता येतात. एवढेच नाही तर देशातील धोरणाची दिशा सामाजिक शास्त्रामधून निश्चित होते. संशोधन असे व्हावे की, त्यावर पीएचडी करता आली पाहिजे. यासाठी सामाजिक शास्त्रात संशोधनच्या दर्जात सुधारणा होण्याची गरज आहे, असे मत डॉ.के. के.पाटील (जेष्ठ अर्थशास्त्रज्ञ अर्थ शास्त्र विभाग प्रमुख, नांदेड विद्यापीठ) यांनी मांडले. ॲड. एम. एन. देशमुख

विद्यापीठ स्तरावर अर्थसाह्य उपलब्ध करु तसेच संशोधनचा दर्जा सुधारणा करण्यासा

## शुभम लांडगे यास कुस्तीत सुवर्णपदक

लोकमत, २९-९-२०

लोकमत न्यूज नेटवर्क



शुभम लांडगे

राजूर : येथील ॲड. एम.एन.देशमुख महाविद्यालयात सुरु असणाऱ्या साई कुस्ती केंद्रात प्रशिक्षण घेत असलेला कुस्तीपटू शुभम् लांडगे यांनी राज्यस्तरीय कुमार अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले.

वर्धा येथे सुरु असलेल्या ४१ वी कुमार अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत या राज्यातील वेगवेगळ्या वजनी गटातील कुस्तीपटूंची निवड झाली होती. ४८ किलो वजनी गटातील अंतिम सामन्यात पैलवान शुभम लांडगे याने प्रतिस्पर्ध्यावर डावपेच टा अजिंक्यपद मिळविले. कुस्तीत करियर करण्याची जिद्द असल्याने आपण या केंद्रात प्रशिक्षण असल्याचे त्याने सांगितले. शुभम येथील देशमुख महाविद्यालय क्रीडा संचालक प्रा.विकास नवले साई कुस्ती केंद्राचे प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय पदक विजेते वस्ता तानाजी नरके यांचे मार्गदर्शन लाभ संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव देशमुख, पुणे येथील चॅम्पियन स्पोर्ट्सचे प्रमुख तथा कोषाध्यक्ष विवेक मदन, सचिव टी.एन.कानवडे सहसचिव मिलिंद उमराणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब देशमुख आदींनी शुभम व त्याच्या मार्गदर्शकांचे कौतुक केले.

## कष्टाला जीवनात पर्याय नाही - श्रीमती केसरकर

सार्वमत, ४-४-२०१९

राजूर (वार्ताहर) - यश मिळविण्यासाठी कठोर परिश्रम करा. नेत्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपले भविष्य उज्वल करा, असे



राजूर येथील ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशनच्यावतीने १६ लाख रुपयांचा शिष्यवृत्तीचा धनादेश प्रदान करताना श्रीमती विनंती केसरकर. समववेत टी. एन. कानवडे, प्राचार्य बी. एस. देशमुख, प्रा. एल. बी. काकडे आदी. (छाया- विलास तुपे)

मुलांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन आपला शैक्षणिक विकास करावा. त्यांनी ही स्पर्धा परीक्षेच्या युगात यश संपादन करावे. शैक्षणिक वर्ष १०१८-१९ मध्ये महाविद्यालयातील बी. ए., बी. एस. सी., बी. कॉम.,.एम. एस. सी. या वर्गात शिक्षण घेणाऱ्या गरीब व होतकरू अशा तीनशे सहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे

हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी जगातील एक अग्रगण्य कंपनी असून ती आदिवासी भागात मानवतावादी दृष्टिकोनातून काम करीत आहे. या शिष्यवृत्तीमुळे आदिवासी मुले आपली शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावर नेत आहे, असे मत सत्यनिकेतन संस्थेचे सचिव टी .एन. कानवडे यांनी व्यक्त

शिष्यवृत्ती मिळवून देण्यास प्रयत्न करणारे प्रा. एल. काकडे, प्रा. बी. एच. तेल सूरज साबळे यांचाही गौ करण्यात आला. याप्रसंगी श्री पन्हाळे, एस. टी. येलमामे प्राचार्य डॉ. बी. एस. देश उपस्थित होते. सूत्रसंचालन पी. टी. करंडे यांनी केले. व्ही. एन. गिते यांनी आ

## हास्य हा आनंदी जीवनाचा पाया-जोशी

पुण्यनगरी, ५-२-२०१९

पुण्यनगरी वृत्तसंस्था / राजूर

हास्य हा आनंदी जीवनचा पाया है आणि त्यासाठी विनोद गरजेचा है, असे प्रतिपादन प्रसिद्ध हास्यकवी ा जोशी यांनी केले.

ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षातील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात जोशी बोलत होते. त्यांच्या हस्ते वार्षिक पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी एकपात्री विनोदी कार्यक्रम सादर केला. यात त्यांनी ू घडामोडीवर केलेल्या मार्मिक विनोदांमुळे विद्यार्थ्यांमध्ये हास्याची रंजी फुलली.

सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव देशमुख अध्यक्षस्थानी . याप्रसंगी संस्थेचे सचिव टी.



राजूर : ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवीनिमित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलताना हास्यकवी बंडा जोशी. समवेत ॲड. मनोहरराव देशमुख, टी. एन.कानवडे, प्राचार्य डॉ. बी. एस. देशमुख आदी.

पदाधिकारी, श्रीमती देशमुख, श्रीमती जोशी व इतर मान्यवर उपस्थितीत होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बी. एस. देशमुख यांनी केले. या वर्षीचा महाविद्यालयाचा 'बेस्ट स्टुडंट ऑफ दी इयर' हा पुरस्कार धनंजय मोहिते

हा पुरस्कार विकास सोनवणे यांना प्रदान करण्यात आला. महाविद्यालयातील विशेष गुणवत्ताप्राप्त पुरस्कारप्राप्त शिक्षकांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. वार्षिक अहवालवाचन प्रा. विकास नवले व कनिष्ट

प्रा. गवळी यांनी केले. पुरस्कार वाचन प्रा. संजय कडलग यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पी. टी. करंडे व डॉ. रेखा कढणे यांनी केले. आभार विद्यार्थी प्रतिनिधी सुरेश गुडनर याने मानले. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

असतो मा सद्गमय

सत्यनिकेतन संचलित

# ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर

ता. अकोले, जि. अहमदनगर

वार्षिक नियतकालिक

# रतनगड

सन २०१९-२०



राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) द्वारा पुनर्मूल्यांकनात 'अ' श्रेणी
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा 'सर्वोत्कृष्ठ महाविद्यालय' पुरस्कार
राष्ट्रीय सेवा योजनेस महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ठ एकक' पुरस्कार
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा विद्यार्थी कल्याण मंडळास 'उत्कृष्ठ महाविद्यालय' पुरस्कार


दूरध्वनी : ०२४२४-२५१०८०
*e-mail : mndcollegerajur@gmail.com*
*Visit us at : www.mndcollegerajur.org*




